
अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक


जानेवारी २०१० | किंमत १५रु.


# मेहता मराठी ग्रंथजगत










आमच्या सर्व वाचकपरिवाराला नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

# मेहता पब्लिशिंग हाऊसची
# राज्य पुरस्कार प्राप्त पुस्तके



◆ जानेवारी २०१०
◆ वर्ष दहावे
◆ अंक पहिला

# मेहता मराठी ग्रंथजगत

— *अनुक्रमणिका* —

**संपादकीय** ४
**साहित्यवार्ता** १२
**पुस्तक परिचय**
**अनादि-अनंत :** अनु. उषा देसाई ४४
**खेळणी विज्ञानाची :** डी.एस.इटोकर ५२
**अदान ॲण्ड ईव्हा**
: अनु. उज्ज्वला गोखले ५६
**फ्रँकलिन कासवाच्या गमती-जमती**
: अनु. मंजूषा आमडेकर ६४
**साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे ७२
**पुरस्कार** ८४
**वाचकांचा प्रतिसाद** ९५
**श्रद्धांजली** ९९
**बालनगरी** १०४

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
वंदना घाटगे

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
**Email** - info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु. ३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## डिजिटल बुक्स : चीनही स्पर्धेत उतरला

जागतिक ग्रंथ व्यवहाराच्या दृष्टीने इ. स. २००९ हे एक महत्त्वाचे वर्ष म्हणून नोंदवावे लागेल. जगातील कुठल्याही भाषेतील कुठलेही पुस्तक डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प गुगलने कोर्टकचेऱ्यांचा आदर राखून बराच पुढे रेटला. डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात फ्रान्समधील न्यायालयाने गुगलला कॉपीराइट कायद्याचा भंग केल्याबद्दल दोषी ठरवले आणि गुगलवर दंडात्मक कारवाई करण्याचा पवित्रा घेतला.

ॲमेझॉन डॉट कॉमच्या किंडल या ई-बुक रीडरची सुधारित आवृत्ती पुढे बाजारात आली. बार्न्स अँड नोबलसारख्या अग्रगण्य ग्रंथ विक्री क्षेत्रातील संस्थेने डिजिटल बुक्सच्या क्षेत्रात पदार्पण करून लक्षावधी पुस्तके केवळ ई-रीडर उपकरणावरच नव्हे तर कुठल्याही वैयक्तिक संगणकावर आणि आयपॉडसारख्या साधनावर डाऊनलोड करून वाचकांना मिळू शकतील या दृष्टीने तंत्रज्ञानाचा वापर करण्याची क्षमता प्रकट केली.

इंटरनेट या माध्यमामुळे एकूणच ग्रंथनिर्मिती, ग्रंथसंपादन, ग्रंथवितरण या सर्वच बाबतीत नवीन प्रयोग चालू आहेत. ई-बुक्स या संकल्पनेला आरंभी मिळालेला प्रतिसाद फारसा उत्साहदायक नव्हता; परंतु २००९ मध्ये ई-बुक्स ही गाष्ट यापुढे अटळ, अपरिहार्य आहे यावर शिक्कामोर्तब झाले. ई-बुक्स क्षेत्रात पुढे कशी मुसंडी मारता येईल या दृष्टीने संगणकनिर्मिती क्षेत्रातील तज्ज्ञ व संस्था तसेच संज्ञापन क्षेत्रातील तंत्रज्ञ आपल्या कल्पकतेचे घोडे दौडवू लागले. फ्रँकफर्ट बुक फेअर, लंडन बुक फेअर यात ई-बुक्स, डिजिटल बुक्स, ग्रंथव्यवहाराचे व पुस्तक प्रकाशनाचे भवितव्य यावर चर्चासत्रे झडली. अमेरिका आणि युरोपमधील देश यामध्ये इंटरनेटचा प्रसार मोठ्या प्रमाणावर असल्याने ई बुक्स किंवा डिजिटल बुक्स यांचा वापर तेथे जास्त असणार, आपल्याकडे ती लाट यायला अजून खूप अवकाश आहे असा विचार भारत, चीन, ब्राझील, मेक्सिको वगैरे देशांतील प्रकाशन संस्थांनी आणि माध्यम क्षेत्रातील जाणकारांनी केला असला तर त्यात काही अवास्तव नाही; परंतु

त्या सर्वांना आपण गाफील राहून कालापव्यय करणे आत्मघातकीपणाचे ठरेल असे जाणवू लागले आहे.

चीनमधील शांडा लिटरेचर या प्रकाशन संस्थेने या दृष्टीने घेतलेली आघाडी आशियाई प्रकाशकांना पथदर्शक ठरायला हरकत नाही.

अवघ्या दोन वर्षांपूर्वी म्हणजे इ. स. २००७ मध्ये 'शांडा लिटरेचर' ही संस्था बत्तीस वर्षे वयाच्या हाऊ झिओकिंग (Hou Xiaoqiang) या तरुणाने सुरू केली. तो वाङ्मयाचा पदवीधर. तसेच कॉम्प्युटर इंजिनिअर. सिना डॉट कॉम या चीनमधील सर्वात मोठ्या इंटरनेट पोर्टलवर त्याने सहा वर्षे काम केले. त्यानंतर इंटरनेटच्या माध्यमातून पुस्तक प्रसार करण्याच्या दृष्टीने आणि नवनवीन लेखकांना लेखनासाठी प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने त्याने 'शांडा लिटरेचर'ची प्रतिमा जनमानसामध्ये रुजविण्यासाठी आरंभापासूनच मोहिम आखली. 'विकिपीडिया' या ऑनलाइन मुक्त ज्ञानकोशाच्या धर्तीवर कोणाही सर्वसामान्य व्यक्तीला या प्रकल्पात सहभागी होण्याची संधी व मुभा त्याने दिली. वेब २.० या तत्त्वज्ञानाचा आदर्श समोर ठेवून आपल्या पोर्टलचा वापर करणाऱ्यांनीच त्याला आशय पुरवावा आणि सक्रिय सहभागाची सुसंवादी संस्कृती जोपासावी अशी कार्यपद्धती त्याने आरंभापासूनच अमलात आणली. 'विकिपीडिया' या ज्ञानकोशात आज दहा लाख लोक स्वेच्छेने विविध विषयांवर लेखन करीत असतात. दहा लाखांवर लेख त्यात आहेत आणि त्यात सतत भर पडत आहे. या सर्च इंजिनला दररोज एक कोटी लोक भेट देत आहेत; या संस्थेत सातत्याने वाढ होत आहे. हा नमुना 'शांडा लिटरेचर'च्या समोर असावा. फक्त शांडा लिटरेचरने विश्वकोशासारखे उद्दिष्ट पुढे न ठेवता ललित-ललितेतर साहित्याची निर्मिती आणि प्रचार हे उद्दिष्ट पुढे ठेवले आहे. स्वत:चे ई रीडर विकसित करून तंत्रज्ञानात व यंत्रणेत खूप गुंतवणूक केली आहे. त्योन मान्यवरांची पुस्तके डाऊनलोड केली. जादा मजकूर सामावून घेण्याची व्यवस्था केली.

शांडा लिटरेचरने अग्रगण्य चिनी लेखकांची पुस्तके आपल्या पोर्टलवर उपलब्ध करून दिली. वाचकाला ठराविक शुल्क देऊन ती पुस्तके डाऊनलोड करून वाचता येतील अशी व्यवस्था केली. लेखकांकडून पुस्तकाचे सर्व हक्क घेताना उत्पन्नाचा पन्नास टक्के भाग मानधन म्हणून देण्याचे करार केले. इंटरनेटवर पुस्तके उपलब्ध करून देणे, पारंपरिक रूढ पद्धतीने मुद्रित आवृत्त्या काढणे, मोबाईलवर पुस्तक वाचता येईल अशा प्रकारे त्यांची मांडणी करणे हे मार्गही चोखाळले. मोबाईल, गेमिंग, टीव्ही आणि चित्रपट यांना त्यांचा वापर करता यावा म्हणून परवाने देणे सुरू केले. केवळ प्रस्थापित लेखकांची पुस्तके काढणे एवढेच उद्दिष्ट न ठेवता 'विकिपीडिया' प्रमाणे कोणाही व्यक्तीला आपले लेखन वा पुस्तक 'शांडा'च्या पोर्टलवर टाकण्याची मुभा दिली. त्या कल्पनेलाही अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. आठ लाख व्यक्ती आज

'शांडा'ला लेखन सहाय्य करतात. त्यात ज्यांचे लेखन लोकप्रिय ठरते, जास्त वेळा ज्यांच्या साइटला भेट दिली जाते त्यांना अर्थातच जास्त मानधन मिळत जाते. आज या पोर्टलवर दररोज ५ कोटी शब्दांची भर पडत आहे. आणि दररोज ४० कोटी पाने वाचक-ग्राहक बघतात. पहिल्याच वर्षात म्हणजे इ. स. २००८ मध्ये शांडा लिटरेचरला १ कोटी युरोंचे उत्पन्न झाले. शांडा ब्रँडचा प्रसार अधिकाधिक व्हावा म्हणून प्रयत्न चालू आहेत. विविध उत्पादनांच्या जाहिराती दाखवून त्यातूनही कमाई होते. नवोदित, हौशी लेखकांना एक प्रचंड आवाका व व्याप्ती असलेले व्यासपीठ शांडा लिटरेचरने उपलब्ध करून दिले आहे. प्रतिभावंतांना त्याद्वारे थेट वाचक रसिकांपर्यंत सुलभपणे पोचता येते.

एक ताजे उदाहरण देण्यासारखे आहे.

सप्टेंबर २००९ मध्ये चीनमधील टॉप टेन बेस्ट सेलरर्सच्या यादीत एका फँटसी कादंबरीने स्थान पटकावले. या फँटसीचा नायक हा १५ वर्षे वयाचा टीनएजर कुमार. कुंग फू, बुद्धिझम आणि रहस्यमय घटना यांच्याशी संबंधित साहसांमुळे तो वाचकांना आपलाच प्रवक्ता वा प्रतिनिधी वाटला. 'शांडा'ने या कादंबरीला मिळणारा प्रतिसाद पाहून ती पुस्तकरूपातही प्रसिद्ध केली.

शांडाने इंटरनेट लिटरेचर क्षेत्रातील अग्रगण्य संस्था म्हणून चीनमध्ये आपला दबदबा प्रस्थापित केला आहे. इंटरनेटक्षेत्रात ॲमेझॉन, गुगल, मायक्रोसॉफ्ट, याहू, फेसबुक यांच्याप्रमाणेच 'शांडा' हे नावही यापुढे सहजपणे आपल्या नजरेला पडू लागेल. एखादी भारतीय कंपनीही या मालिकेत स्थानापन्न व्हावी असे आपल्याला वाटायला हरकत नाही. आपण डिजिटल बुक्स क्षेत्रात मागे राहून चालणार नाही.

## सभासदांना सूचना

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता,फोन नंबर लिहून पोस्टकार्डद्वारे मासिकाच्या पत्त्यावर पाठवावा. ही विनंती.

**टी बुक क्लब १८ मधील दुसरे पुस्तक**

# द ॲटर्नी

**स्टीव्ह मार्टिनी**

अनु. **अजित ठाकूर**

किंमत ३५०रु.
टी बुक क्लब सभासदांना १७५रु.
पोस्टेज ३०रु.





पॉल माद्रियानी यांच्याकडे आपली निर्वाणीची समस्या घेऊन जोना हेल आला तेव्हाच सॅन डियागोमध्ये शांतपणे आयुष्य घालवायचं स्वप्न आता दूर ठेवावं लागणार आहे हे पॉलच्या लक्षात आलं. तथाकथित स्त्रीवादी झोलांडा स्वेडच्या मदतीने मादक द्रव्याची चटक लागलेल्या जोनाच्या मुलीने, त्याच्या आवडत्या नातीला, अमांडाला पळवून नेलं होतं.

नातीचा सांभाळ करायला जोना असमर्थ आहे, एवढंच नव्हे तर जोनाने नातीवर अत्याचारही केले आहेत, असे आरोप अमांडाच्या आईने केले हे सांगताना पॉलच्या नवीन अशिलाचा चेहरा संतापाने फुलून गेला होता. नंतर 'झो'चा खून आणि खुनाच्या आरोपावरून पोलिसांनी जोनालाच अटक केली. त्या दृष्ट माणसानं खून केला नसेलच अशी पॉललाही खात्री देता येत नाही; पण दुसरी एक व्यक्ती अमांडाला आणि तिच्या आईला खलास करू इच्छीत होती. ही माहिती मिळताच त्या व्यक्तीला शोधण्यासाठी आणि निरपराध जोनाला वाचवण्यासाठी पॉलने शर्थीचे प्रयत्न सुरू केले...

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**आगामी**




# द फर्म

**जॉन ग्रिशॅम**
अनु. अनिल काळे

एक माफिया फॅमिली :
विविध प्रकारच्या गुन्ह्यांमधून जमवलेला प्रचंड काळा पैसा पांढरा करणारी...
त्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकणारी...

एका वकिलांची फर्म :
माफिया फॅमिलीचा सभ्य धुवट चेहरा असलेली...
फॅमिलीच्या काळ्या पैशाचं बेमालूमपणे 'शुद्धीकरण' करणारी...


एक वकील :
नुकताच शिक्षण घेऊन बाहेर पडलेला अत्यंत हुशार, चलाख तरुण फर्ममध्ये नोकरी मिळवतो. त्याला आणि त्याच्या सुंदर बायकोला स्वप्नं पडतात ती फक्त उज्ज्वल भविष्यकाळ, भरपूर पैसा, बीएमडब्ल्यू... यांची.

प्रत्यक्षात मात्र दोघंही
एकीकडे माफिया फॅमिली, तर दुसरीकडे एफबीआय,
अशा कात्रीत सापडतात...
आणि जीव वाचवण्यासाठी पळत सुटतात... दिशा मिळेल तिकडे.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

आगामी

# वन शॉट




**ली चाइल्ड**

अनु. बाळ भागवत

सहा शॉट्स. पाच ठार.
काही तासांत बिनतोड पुराव्याच्या आधारावर
गुन्हेगाराला अटक होते, पण तो तोंडातून अक्षर काढत नाही.
खूप प्रयत्नांनंतर तो बोलतो, 'तुम्ही चुकीच्या माणसाला पकडले आहे...
माझ्यासाठी जॅक रीचरला बोलवा.'
रीचर तेरा वर्षे मिलिटरी पोलीस असतो. तपास करण्यात, माग काढण्यात तरबेज. त्याला अडकवण्यासाठी निरपराध व्यक्तीचा खून करण्यापर्यंत मजल जाते. संतापलेला रीचर बचाव पक्षाच्या तरुण आणि सुंदर वकिलाला घेऊन खरा गुन्हेगार शोधायला लागतो. प्रत्येक पावलाला गोळीचे उत्तर गोळीनेच द्यायला हवे.
हे त्याला ठाऊक असते.
जॅक रीचरचा शोध घेणे सोपे नसते.
पण टी.व्ही.वरच्या बातम्या बघून रीचरची
खात्री असते की काहीतरी घोटाळा आहे.
गुन्हेगार हा लष्करातला नेमबाज असताना त्याचा शॉट चुकलाच कसा? आणि शहरात पोहोचल्यावर आपले या शहरातले अस्तित्व कुणाला तरी खुपते आहे हे रीचरच्या लक्षात येते.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**आगामी**

# क्रिटिकल




**रॉबिन कुक**
अनु. प्रमोद जोगळेकर

वैद्यकीय क्षेत्रातील बदलत्या सेवानियमांचा व्यावसायिक फायदा घेण्यासाठी अनेक कंपन्या पुढे सरसावतात.

अशा कंपन्यांमध्ये आपला काळा पैसा जिरवणं शक्य आहे, हे माफिया टोळ्यांना उमगतं.


'एन्जल्स हेल्थ केअर' कंपनीच्या रुग्णालयांमध्ये एस.आर.एस.एस. या रोगजंतूच्या संसर्गामुळे एकामागोमाग एक मृत्यू होऊ लागतात.

वैद्यकीय निरीक्षक लॉरी मॉंटगोमेरी त्या मागची कारणं उलगडायला प्रारंभ करते. कारण अशाच एका रुग्णालयात तिच्या नवऱ्यावर शस्त्रक्रिया होणार असते. तिचा शोध पुरा होऊ नये म्हणून कॉर्पोरेट आणि माफिया ठक प्रयत्न करतात. ते लॉरीला पळवून नेतात. सिमेंट घातलेल्या बादलीत पाय अडकवून 'सिमेंटचे बूट' चढवून लॉरीला बोटीतून फेकण्याची तयारी सुरू होते. अचानक...

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

नवे कोरे

# कॅच मी इफ यू कॅन




**फ्रँक अबॅग्नेल / स्टॅन रेडिंग**
अनु. ज्योत्स्ना लेले

**२००रु. पोस्टेज २५रु.**

फ्रँक अबॅग्नेल...
ऊर्फ फ्रँक विल्यम्स, रॉबर्ट कॉन्रॅड, फ्रँक ॲडॅम्स, रॉबर्ट मोन्जो.

बनावट सह्या, कागदपत्रे बनवणाऱ्या, दुसऱ्या नावाने वावरणाऱ्या, कुठल्याही परिस्थितीतून सहीसलामत सुटणाऱ्या त्या काळातल्या अनेक धाडसी गुन्हेगारांपैकी एक.
त्याच्या गुन्हेगारीच्या काळात त्याने वैमानिकाचा गणवेश घालून पॅन ॲमचे जेट विमान सहवैमानिकाच्या जागेवर बसून बेधडक चालवले. एका रुग्णालयात बनावट रेसिडेण्ट डॉक्टर म्हणून काम केले. जवळ परवाना नसताना वकिली केली, कॉलेजातून समाजशास्त्राचा प्राध्यापक बनला आणि चेक्समध्ये बदल करून पंचवीस लाख डॉलर्स मिळवले.
आणि हे सगळं तो एकवीस वर्षांचा होण्याच्या आत!

कल्पितापेक्षा अद्‌भुत असलेली सत्यकथा!
फसवणुकीतला बादशहा, तोतयेगिरीमधला तज्ज्ञ, बनावट कागदपत्रे, चेक्स बनविण्यात हातखंडा असलेल्या या माणसाचे अद्‌भुत चरित्र!

## * 'वॅन-इफ्रा'चे ६२ वे अधिवेशन - माध्यमांचे भवितव्य

दहशतवादापासून हवामानातील बदलापर्यंतच्या अनेक समस्या जगाला भेडसावत आहेत. माध्यमांनी फक्त त्या समस्या मांडण्यापेक्षा त्यावरील उपाययोजनाही सांगाव्यात. त्यासाठी आवश्यक ते जनमत तयार करावे, तसेच शाश्वत विकासासाठी पुढाकार घेऊन आग्रही भूमिकाही मांडावी,'' अशी अपेक्षा राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी आंतरराष्ट्रीय वृत्तपत्र माध्यमांकडे व्यक्त केली.

हैदराबाद इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये 'वर्ल्ड असोसिएशन ऑफ न्यूज पेपर्स ॲण्ड न्यूज पब्लिशर्स' (वॅन-इफ्रा)च्या ६२व्या जागतिक परिषदेचे पाटील यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. अध्यक्षस्थानी 'वॅन-इफ्रा'चे अध्यक्ष गॅविन ओ रेली होते. व्यासपीठावर आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री के. रोशय्या, 'वर्ल्ड एडिटर्स फोरम'चे अध्यक्ष झेवियर विदाल फोह, केंद्रीय माहिती व नभोवाणी राज्यमंत्री मोहन जठुआ, आंध्र प्रदेशच्या पर्यटनमंत्री जे. गीता रेड्डी, 'इंडियन न्यूजपेपर्स सोसायटी'चे अध्यक्ष टी. वेंकटराम रेड्डी, 'वॅन-इफ्रा'चे उपाध्यक्ष व 'सकाळ पेपर्स लिमिटेड'चे अध्यक्ष प्रतापराव पवार आदी मान्यवर होते. या परिषदेला ८७ देशांतील नऊशेहून अधिक माध्यम प्रतिनिधी उपस्थित होते. माध्यमांचे बदलते स्वरूप, त्यांच्यासमोरील आव्हाने, स्वातंत्र्य, तंत्रज्ञानातील प्रगती आणि तंत्रज्ञानाचा माध्यमांसह समाजावर पडणारा प्रभाव या विषयांवर परिषदेत चर्चा झाली.

कमीतकमी ऊर्जेचा वापर करणारे पर्यावरणाला अनुकूल तंत्रज्ञान वापरण्यावर भर द्यावा, असे आवाहन करून राष्ट्रपती म्हणाल्या, ''जनतेच्या सवयी अधिक पर्यावरणानुकूल बनविण्यात, उत्पादनाची नवी प्रारूपे तयार करण्यात माध्यमे प्रभावी ठरू शकतात. यातूनच शाश्वत विकासासाठी माध्यमांचा सहभाग महत्त्वाचा ठरू शकतो. माध्यमांनी जनतेच्या प्रश्नांना हात घातला पाहिजे. देशाची प्रगती होताना स्रोतापासून ते तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीपर्यंत अनेक आव्हाने समोर येत असतात. लोककल्याणकारी दृष्टिकोनातून त्यांवर मोकळी चर्चा घडविण्याची ताकद माध्यमांत आहे. लोककल्याणकारी राजवटीसाठी ही ताकद उपयोगी पडते. ही ताकद माध्यमे पुरेशी वापरत आहेत का, ते आपल्या भूमिकेला न्याय देत आहेत का, याचा विचार

करण्याची वेळ आली आहे.''

''तंत्रज्ञानाच्या बदलाबरोबर पत्रकारितेचाही विकास होत आहे. तंत्रज्ञानामुळे माध्यमांचे स्वरूप व्यापक होते आहे. या काळातही विश्वासार्हतेच्या बळावर वृत्तपत्रे आपले अढळ स्थान टिकवून आहेत. त्यांचा वाचक वाढत आहे,'' असे गौरवोद्‌गार काढून त्या म्हणाल्या, ''जनमत घडविणारी विकासाभिमुख पत्रकारिता आज हवी. जागतिकीकरणामुळे जग जवळ येत आहे. दहशतवाद, वातावरणातील बदल आणि पर्यावरणाला धोका या आव्हानांसह दळणवळणाचा वेग आणि आर्थिक अवलंबित्व यांमुळे जग खऱ्या अर्थाने खेडे बनले आहे. या आव्हानात्मक काळात माध्यमांनी पुढाकार घेऊन शांततापूर्ण आणि सुरक्षित जग निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यांनी नुसत्या समस्यांची समाजाला माहिती देण्यापेक्षा ते सोडविण्याचे उपाय सांगावेत.''

पाकिस्तानातील दहशतवादी वातावरणातही निर्भय पत्रकारिता करणारे 'फ्रायडे टाइम्स' आणि 'डेली टाइम्स'चे संपादक नजम सेठी यांना यंदाचा 'गोल्डन पेन' पुरस्कार 'वर्ल्ड एडिटर्स फोरम'चे अध्यक्ष फोह यांच्या हस्ते देण्यात आला. ''भारत आणि पाकिस्तानातील माध्यमांनी द्विपक्षीय संबंधकडे अधिक जबाबदारीने पाहिले पाहिजे,'' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

हैदराबादेतील संयोजनाबद्दल 'वॅन-इफ्रा'चे अध्यक्ष ओ रेली म्हणाले, ''गेल्या काही वर्षांत जगाच्या पटलावर स्वतंत्र ताकद म्हणून भारताचा उदय झालेला आहे. सक्षम, ताकदवान स्वतंत्र माध्यमांचा त्यामध्ये मोठा सहभाग आहे. जगातील एकूण वृत्तपत्र खपापैकी वीस टक्के खप एकट्या भारतात आहे,'' असे रेली यांनी नमूद केले. 'इंडियन न्यूजपेपर्स सोसायटी'चे अध्यक्ष रेड्डी यांनी स्वागत केले. प्रतापराव पवार यांनी आभार मानले.

### * 'वॅन'परिषदेत कॉपीराईटवर चर्चा

'गुगल'ने कॉपीराईट कायद्याची कडक अंमलबजावणी करावी, अशी मागणी जगभरातील वृत्तपत्रांनी आणि प्रकाशनांनी 'वर्ल्ड असोसिएशन ऑफ न्यूज पेपर्स अँड न्यूज पब्लिशर्स'च्या (वॅन-इफ्रा)च्या ६२व्या जागतिक परिषदेतील एका चर्चासत्रात केली.

डच वृत्तपत्र प्रकाशक संघटनेचे केस स्पान यांच्या अध्यक्षतेखाली 'गुगलबाबत करायचे काय?' हे चर्चासत्र झाले. त्यामध्ये वृत्तपत्रांनी स्वत:चे सर्च इंजिन तयार करावे, इथपासून अनेक सूचना पुढे आल्या. 'गुगल'चे मुख्य कायदा सल्लागार आणि वरिष्ठ उपाध्यक्ष डेव्हिड डुमॉंड हेही त्यात सहभागी होते.

''आशयसंपन्नतेसाठी वृत्तपत्रे खर्च करतात. आशय कशा पद्धतीने वितरीत

व्हावा आणि त्यातून किती उत्पन्न मिळावे, हे ठरविण्याचा अधिकार वृत्तपत्रांना आहे,'' अशी भूमिका 'वॅन-इफ्रा'चे अध्यक्ष गेविन ओ रेली यांनी मांडली. ते म्हणाले, ''यासाठीच तीनशे वर्षांपूर्वी कॉपीराईट कायदा जन्माला आला. तो आज एकविसाव्या शतकातही तितकाच उपयोगी आणि परिणामकारक आहे. आम्ही प्रकाशकांनी वेबसाईटवर कॉपीराईटच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष केले. परिणामी आम्ही मूर्ख ठरलो.''

कॉपीराईटचा भंग केल्याच्या आरोपाचा डुमॉन्ड यांनी साफ इन्कार केला. ते म्हणाले, ''गुगलने कॉपीराईट कायद्याचा भंग केला किंवा नाही असा प्रश्न नाही; वेबसाईटसाठी कॉपीराईट लागू करण्यासंदर्भातला हा प्रश्न आहे. वेब संकल्पनेच्या प्राथमिक स्वरूपात आहे. वेब ज्या पद्धतीने तयार झाले, त्या पद्धतीत आहे. गुगलला वृत्तपत्रांसोबत काम करायचेच आहे.'' गुगल न्यूजसाठी स्वतंत्र 'क्राउलर' सुरू करीत असल्याची घोषणा डुमॉन्ड यांनी केली. यामुळे 'गुगल न्यूज' आणि 'गुगल सर्च'मध्ये आपल्या बातम्या कशा पद्धतीने दिसाव्यात, याच्या सूचना वृत्तपत्रांना करता येतील, अशी माहिती त्यांनी दिली. या चर्चेत डच वृत्तपत्र संघटनेचे अध्यक्ष केस स्पान, कोरियातील माईल बिझनेस न्यूजपेपरचे अध्यक्ष दायी वान चँग यांनीही भाग घेतला.

*** 'वॅन-इफ्रा' जागतिक परिषदेतील सूर : वाचक हाच केंद्रबिंदू**

जागतिक मंदीच्या लाटेत 'अमेरिकी बिझनेस मॉडेल' अपयशी ठरत असताना, 'भारतीय बिझनेस मॉडेल' मात्र देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असल्याने यशस्वी ठरत असल्याचा विश्वास 'वर्ल्ड असोसिएशन ऑफ न्यूज पेपर्स अॅन्ड न्यूज पब्लिशर्स'च्या जागतिक परिषदेत व्यक्त करण्यात आला.

संपादकांच्या खास बैठकीत 'इन्फोसिस'चे अध्यक्ष एन. आर. नारायणमूर्ती यांनी आपले विचार व्यक्त केले. त्याचबरोबर परिषदेतील 'पॉवर ऑफ प्रिंट' या चर्चासत्राचे अध्यक्षस्थान भूषविण्याचा मान 'सकाळ माध्यम समूहा'चे व्यवस्थापकीय संचालक अभिजित पवार यांना देण्यात आला. या चर्चासत्रात पोर्तुगालमधील 'आय' या दैनिकाचे प्रकाशक आणि मुख्य संपादक मार्टिन फिगरेडो, ऑस्ट्रेलियातील न्यूजपेपर पब्लिशर्स असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क हॉलंड्स, जर्मनीतील मॅनरोलॅन्ड या प्रिंटिंग मशिन्स कंपनीचे कार्यकारी उपाध्यक्ष पीटर क्युस्ले आणि टाइम्स समूहाच्या प्रकाशन विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवी धारिवाल सहभागी झाले.

'वाचकाला केंद्रस्थानी ठेवून त्याचा जाहिरातीशी योग्य समतोल ठेवल्याने भारतीय वृत्तपत्रे यशस्वी ठरल्याचा मुद्दा संपादकीय धोरणात महत्त्वाचा आहे. वाचकांना काय हवे, याची योग्य ती दखल संपादकांनी घेऊन त्यांना आशयसंपन्न वृत्तपत्र सादर

केल्याने गेल्या दशकभरात जगभरात वृत्तपत्रांचा खप घटत असताना भारतात मात्र तो केवळ टिकलाच नाही, तर अधिक वाढला आहे,' असे मत चर्चासत्रात व्यक्त करण्यात आले. युरोप आणि अमेरिकेतील वृत्तपत्रसृष्टी वाचविण्यासाठी 'बदल' या संकल्पनेवर आधारित काही मॉडेल्स यशस्वी झाल्याचे श्री. फिगरेडो आणि श्री. हॉलंड्स यांनी सोदाहरण स्पष्ट केले. अर्थात हे प्रयत्न अपुरे असल्याची खंतही युरोपीय वक्त्यांनी बोलून दाखविली. नारायणमूर्ती यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीवर प्रकाश टाकला. देशातील बड्या उद्योगांपासून ते बचतगटांपर्यंत सर्वांच्या योगदानाचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

''पत्रकारितेचा गाभा तसाच आशयसंपन्न राहील; परंतु पारंपरिक पठडीतील विचारसरणी मात्र बदलावी लागेल. नव्या वाचकाला नव्या तंत्रज्ञानाच्या आधारे आकर्षित करावे लागेल. पत्रकारांना हे तंत्रज्ञान स्वीकारावेच लागेल,'' अशा आशयाची मते संपादकांच्या बैठकीत व्यक्त करण्यात आली. येथेही भारतीय मॉडेलचा उल्लेख करण्यात आला. पत्रकारांसाठी माध्यम व्यवसायाच्या विशेष मार्गदर्शनाची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. संपादकांच्या बैठकीत अमेरिकेतील 'पेड कंटेन्टऑर्ग'चे मुख्य कार्यकारी अधिकारी रफत अली, सिक्स अपार्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी (युरोप) ऑलिव्हर क्रिश, फ्रान्सच्या शिबस्टेड इंटरनॅशनलचे संपादक फ्रेड्रिक फिलक्स आणि जागरणचे मुख्य संपादक संजय गुप्ता सहभागी झाले.

*** 'अक्षरधारा'ला दिली दीड लाख वाचकांनी भेट**

वाचनसंस्कृतीचा वसा घेऊन गेल्या १५ वर्षांपासून काम करणाऱ्या अक्षरधाराच्या ३३३व्या मायमराठी शब्दोत्सवात एक महिन्याच्या कालावधीत तब्बल दीड लाख वाचकांनी भेट दिली, अशी माहिती संचालक रमेश राठिवडेकर यांनी दिली. यंदा आरोग्यविषयक पुस्तकांना अधिक मागणी होती, असे निरीक्षणही त्यांनी नोंदवले.

आचार्य अत्रे सभागृहात १४ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत हे प्रदर्शन भरले होते. अक्षरधाराच्या एक पुस्तक विकत -एक पुस्तक मोफत या योजनेलाही वाचकांचा मोठा प्रतिसाद लाभला. एक होता कार्व्हर, प्रकाशवाटा, लूज युवर वेट, गजाआडील दिवस, बोराक ओबामा, १८५७चे स्वातंत्र्यसमर, संभाजी, बोर्डरूम, दोस्ती करूया पक्ष्यांशी आणि आहे मनोहर तरी ही पुस्तके टॉप टेन ठरली, असे राठिवडेकर म्हणाले.

अनेक कलावंतांशी, लेखकांशी संवाद साधण्याची संधीही वाचकांना या प्रदर्शनामध्ये मिळाली. राजा शिवछत्रपती मालिकेचे निर्माते, दिग्दर्शक आणि कलाकार, निसर्गमित्र अतुल धामणकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, खासदार सुप्रिया सुळे, डॉ. अच्युत गोडबोले, व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, आहारतज्ज्ञ डॉ. वर्षा जोशी, बालकलाकार

शरद गोयेकर, सक्षम कुलकर्णी आणि अश्विन चितळे यांनी वाचकांशी गप्पा मारल्या.

*** 'माझी जन्मठेप'वर एकांकिका स्पर्धा**

सावरकर विचार मंचातर्फे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या 'माझी जन्मठेप' या आत्मचरित्रातील एका किंवा अनेक प्रसंगांवर आधारित एकांकिकांची राज्यस्तरीय स्पर्धा महाविद्यालयीन व खुला, अशा दोन गटात होणार असल्याची माहिती मंचचे अध्यक्ष ॲड. शरद बनसोडे यांनी दिली. ही स्पर्धा सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिरात २१ ते २५ फेब्रुवारी दरम्यान घेण्यात येणार आहे. उत्कृष्ट अभिनय, दिग्दर्शन, प्रकाश योजना, पार्श्वसंगीत आणि संहितेसाठी पुरस्कार म्हणून प्रत्येकी १५००, १००० आणि ५०० रुपये दोन्ही गटांसाठी दिले जातील. सहभागी नाट्यसंस्थेस दोन हजार रुपये खर्चापोटी दिले जातील. माहितीसाठी सावरकर विचार मंच, १०ए पहिला मजला, शिवस्मारक शॉपिंग सेंटर, गोल्डफिंच पेठ येथे अथवा विजय कुलकर्णी (९४२३५९०३४४), अमीर तडवळकर (९३२२८८७०५०, ९९७०३६५३१९) यांच्याशी संपर्क साधावा.

*** महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन**

सशक्त भारताच्या निर्मितीसाठी, अखिल मानवजातीच्या समानतेसाठी, दीन, दलित, कष्टकरी, उपेक्षित दुर्लक्षित घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी, शेतकऱ्यांच्या समस्या सुटण्यासाठी, सामाजिक जडणीघडणीसाठी, वंचित घटकांना शिक्षित करण्यासाठी मानवतावादी लेखनाची आवश्यकता आहे. त्याकरिता साहित्यिकांनी फुले, शाहू, आंबेडकरी साहित्य निर्माण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. मा. म. देशमुख यांनी दुसऱ्या महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनात केले.

सासवड (ता. पुरंदर) येथे अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेतर्फे दुसऱ्या राज्यस्तरीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्वागताध्यक्ष आमदार विजय शिवतारे, सोपानकाका बँकेचे अध्यक्ष संजय जगताप, सुदाम इंगळे, नामदेव जाधव, शिवशाहीर गुलाब वळसे-पाटील, साहित्यिक बाबा सौदागर आदी उपस्थित होते.

प्रा. देशमुख म्हणाले, ''आजकाल समाजामध्ये विचारनिष्ठ माणसे आढळत नाहीत. सगळीकडे व्यक्तिनिष्ठता आली आहे. संकुचितपणा सोडण्याची गरज आहे. आपले प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेची आवश्यकता आहे. संघटन म्हणजे शक्ती, तसेच संघटनेमध्ये शिस्त असेल तर ती महाशक्ती होते. परंतु पद, पैसा, प्रसिद्धी, प्रतिष्ठेकरता मिरवणाऱ्यांना संघटनेमध्ये स्थान देऊ नका. कारण ते संघटनेचे विघटन करतात.''

इतिहास संशोधक नामदेव जाधव म्हणाले, ''समाजातील काही लोकांना सामाजिक चळवळीपेक्षा निवडणुका महत्त्वाच्या वाटू लागल्या आहेत. बापापेक्षा नेतेमंडळी मोठी वाटू लागली आहेत. याकरिता साहित्यिकांनी समाजाचे प्रबोधन होईल असे साहित्य निर्माण केले पाहिजे.'' स्वागताध्यक्ष विजय शिवतारे यांनीही मनोगत व्यक्त केले.

*** टी-शर्टवरील मराठी काव्य - आणखी एक पायरसी**

कॉपीराइट कायदा किंवा पोलिसांची कारवाई यांची पर्वा न करता विंदा करंदीकर, सुरेश भट, कुसुमाग्रज यांच्या काव्यपंक्ती असलेले टी शर्ट बाजारात आले आहेत

कवितेतल्या निवडक ओळी टी शर्टवर प्रिण्ट करायला सर्वांत आधी सुरुवात केली ती ठाण्याच्या उन्मेष जोशी यांनी. अच्युत पालव यांच्या कॅलीग्राफीने या ओळींना साज चढवला आणि बघता बघता असल्या टी शर्टची क्रेझ युवकांमध्ये आली. ३५ ते ४० डिझाइन्स बाजारात आली. या टी-शर्टना डिमाण्ड आहे हे लक्षात आल्यावर पायरसीला सुरुवात झाली.

'पायरसी अशासाठी, की टी-शर्टवर हे डिझाइन तयार करण्यासाठी १० हजार रुपयांचा खर्च येतो. या ओळींचे कॉपीराइट मिळवण्यासाठी बरीच रक्कम लागते.

मराठी टी-शर्टची पायरसी होत असल्याबद्दल दादर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यात आली आहे.

मूळ टी-शर्टवरचे डिझाइन स्कॅन करायचं आणि हलक्या दर्जाच्या टी-शर्टवर ते प्रिण्ट करून बाजारात विकण्याचा उद्योग अनेकांनी सुरू केला. त्यात परप्रांतीय आघाडीवर आहेत. वास्तविक कवितांचे सर्व हक्क कवींकडे असतात. त्यांची परवानगी घेणं बंधनकारक आहे. पायरसी करणारे त्या फंदातच पडत नाहीत. कवीची परवानगी घेतल्यानंतर त्याचं रीतसर पत्र विक्रेत्याकडं असायला हवे. त्याची मागणी करताच ते दाखवायला हवे. पण या सर्व गोष्टींना पायरसीद्वारे हरताळ फासण्यात येत आहे.

*** संस्कृतींच्या अभ्यासासाठी जगभर भटकंती**

''लंडनमध्ये वास्तव्य करीत असताना तेथे बहरलेल्या विविध संस्कृतींना जवळून पाहण्याचा योग आला. त्यामुळे मनात संस्कृतीबद्दल आकर्षण निर्माण झाले. या संस्कृतीचा अभ्यास करावा आणि त्यातील आनंद सर्वांना वाटून द्यावा अशी भावना मनात निर्माण झाली. त्यामुळेच जगभराची भटकंती घडली'' असे मत लेखिका डॉ. मीना प्रभू यांनी व्यक्त केले.

उत्कर्ष प्रकाशन संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त ज्येष्ठ भूगोलतज्ज्ञ डॉ.

सुरेश गरसोळे यांच्या 'प्रवासी पुणे जिल्हा' या नकाशा पुस्तकाचे प्रकाशन व पुणे जिल्ह्याच्या नकाशाचे अनावरण करण्यात आले. या निमित्ताने मंगला गोडबोले यांनी प्रभू यांची मुलाखत घेतली.

प्रवास वर्णन, लेखन व परकीय देशांच्या पर्यटन व्यवसायातील सोयीसुविधा ते भारतातील पर्यटन व्यवसायाची प्राथमिक स्थिती या संदर्भात मीना प्रभू म्हणाल्या की, वैयक्तिक आवड आणि कुतूहलापोटी मी अनेक देशांची भ्रमंती केली. त्यावेळी मला ज्ञानाचा विस्तार आणि त्या तुलनेत स्वत:ची कमतरता जाणवली. पाश्चिमात्त्य संस्कृतीच्या छटा आणि पौर्वात्य संस्कृतीच्या छटा पाहताना इतरांबद्दल आदर वाढीस लागला आणि या प्रवासातून एक प्रकारचा नम्रपणा मानसिकतेत रुजला. लंडन, चीन, रशिया, इजिप्त, इराक येथील सोयी-सुविधा पाहता त्या तुलनेत भारतातील पर्यटनव्यवस्था अत्यंत प्राथमिक पातळीवर असल्याचे जाणवते. आधुनिक सुविधांच्या बाबतीत आपण अजूनही मागास असून, स्वच्छतेकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे.

*** आंतरराष्ट्रीय बहुसांस्कृतिक शिक्षण कार्यशाळा**

पुणे विद्यापीठ शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग व नॉर्वे येथील नॉतेडॅम, टेलिमार्क विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. संजीव सोनवणे, तर प्रमुख पाहुणे म्हणून टेलिमार्क विद्यापीठाच्या प्रा. ॲना मारिया होत्या. बहुसांस्कृतिक शिक्षण कार्यशाळेची सुरुवात भारतीय संस्कृतीप्रमाणे सरस्वती पूजनाने झाली. टेलिमार्क विद्यापीठाच्या प्रा. ॲना मारिया यांनी म्हटले की, भारत हा बहुविध आणि बहुसांस्कृतिक देश शिक्षण आणि शिक्षकाला मान देणारा, गुरूला सन्मान देणारा आहे. भारतीय संस्कृतीबद्दलची जिज्ञासा शिक्षक आणि शिक्षणाच्या वैचारिक देवाणघेवाणीतूनच पूर्ण करता येईल म्हणून आम्ही पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र व विस्तार विभागाला भेट देत आहोत, असे सांगितले. याप्रसंगी विभागाच्या प्रपाठक डॉ. मेघा उपलाने, प्रा. गीता कांबळे, प्रा. निशा वळवी उपस्थित होत्या.

*** अनुवादावर चर्चासत्र**

भारतामध्ये अनुवादाची प्रक्रिया जुनी आहे. त्यात अनेक प्रयोग झाले. पण भाषांतर प्रक्रिया ही कधी संस्थेमध्ये अवतरली नाही. आपल्याकडे जी बहुभाषिकता आहे, तिला भाषांतराचा एक वेगळा आधार मिळाला नाही. एका बाजूला युरोपमध्ये १७व्या शतकात वेगवेगळे समूह वेगवेगळ्या भाषांनी बांधले गेले व राष्ट्रे निर्माण झाली; तिथे एक प्रकारची भाषेची अस्मिता जागृत झाली, असे उद्गार प्रसिद्ध भाषाभ्यासक डॉ. प्रमोद तलगेरी यांनी काढले. पुणे विद्यापीठाचा मराठी विभाग आणि

अक्षरभारती अनुवाद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'हिंदी कादंबऱ्यांची मराठी भाषांतरे : स्वरूप व दिशा' या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र घेण्यात आले.

यាप्रसंगी डॉ. मनोहर जाधव, डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ विद्यागौरी टिळक, डॉ. आनंद यादव, डॉ. हरिश्चंद्र थोरात, डॉ. शशिकला राय, डॉ. श्रीकांत चौगुले, डॉ. गजानन चव्हाण, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. अनिल सपकाळ, माधव राजगुरू, डॉ. मु.ब. शहा, डॉ. संदीप सांगळे व प्रभाकर देसाई हे उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीकांत चौगुले व आभारप्रदर्शन डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी केले.

*** अनुवादाची प्रक्रिया ही निर्मितिप्रक्रियाच असते**

''अनुवाद करणे ही अनुवादकाच्या निर्मिती व प्रतिभेची कसोटी असते. साहित्यासंबंधी ज्यांना आस्था असते, तेच लोक अनुवाद करत असतात, अनुवादामुळे दोन प्रमुख गोष्टी साध्य होतात. एक म्हणजे जीवन समजून घेणे व दुसरी म्हणजे परंपरा समृद्ध करणे.'' असे मत बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी पुणे विद्यापीठ, मराठी विभाग व अक्षरभारती अनुवाद अकादमी पुणे आयोजित 'हिंदी कादंबऱ्यांची मराठी भाषांतरे : स्वरूप व दिशा' या चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले की, 'राष्ट्रीय चळवळ सुरू झाल्यानंतर त्याचा काही एक परिणाम अनुवादावर झालेला दिसतो. आंतरभारतीची जी चळवळ सुरू झाली, ती वेगवेगळ्या भाषांत विभागलेले प्रदेश यात आदान-प्रदान व्हावी, अशी धारणा साने गुरुजींची होती, सामाजिक ऐक्य, एकात्मतेची निर्मिती करण्याच्या दृष्टीने आपण अनुवाद केला पाहिजे. आज अनुवाद व्यवहार गुंतागुंतीचा झाला असून त्यातील बारकावे समजावून घ्यावे लागतील.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मनोहर जाधव यांनी केले. श्रीकांत चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गजानन चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले.

*** मुलांनी केलेले अंगणवाड्यांचे सर्वेक्षण**

बाल हक्क कृती समिती, बालकामगार विरोधी अभियानाच्या प्रोत्साहनातून तयार झालेल्या अहवालाचे नुकतेच प्रकाशन झाले.

या अहवालासाठी राज्यातल्या विविध ठिकाणच्या १०० छोट्या सर्वेक्षकांनी काम केले आहे. ही सर्व मुले १०-१८ वयोगटातील आहेत. कोणत्या समस्या अहवालात समाविष्ट करून घ्यायच्या, कोणत्या अडचणींवर दाद मागायची याचे निर्णयही मुलांनीच घेतले आहेत. यासाठी खुद्द मुलांनीच विदर्भ, सोलापूर, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात विविध ठिकाणी सर्व्हे केला आणि त्याचे

निष्कर्ष या अहवालात मांडले.

अंगणवाड्यांमध्ये कोणत्या दर्जाचे जेवण मिळते... शिक्षक कसे शिकवतात, गावात स्वच्छतागृहांची सुविधा आहे का, वस्तीवरच्या मुलींना शाळेत पाठवले जाते का, अशा अनेक प्रश्नांवरचा अहवाल मुलांनी तयार केला आहे.

सर्वेक्षण करताना आम्ही मुलांना पूर्ण स्वातंत्र्य दिले. तसेच, त्यांच्यावर माध्यमाचेही बंधन घातले नाही. डेटा जमा करताना तो लिहूनच दिला पाहिजे, अशी सक्ती त्यांना केली नाही. जर, एखाद्याला चित्राच्या माध्यमातून माहिती द्यायची असेल तर, ती तशी देण्याची मुभा मुलांना होती. त्यांच्या कामात आम्ही कोणताही हस्तक्षेप केला नाही, त्यामुळे हा अहवाल वस्तुनिष्ठ असल्याचे समितीचे समन्वयक मनीष श्रॉफ यांनी नमूद केले.

जगण्याचा हक्क, विकासाचा हक्क, संरक्षणाचा हक्क, सहभागाचा हक्क यात विभागून ही माहिती मांडण्यात आली आहे. यात मुलांच्या जन्माच्या नोंदीचे प्रमाण ग्रामीण भागात कमी असल्याचे आढळून आले आहे, शाळांमधून देण्यात येणाऱ्या जेवणाच्या दर्जाबाबत मुलांनी असमाधान व्यक्त केले. वस्त्यांमधील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबाबतही आवाज उठवण्यात आला आहे. स्वच्छतागृहांच्या दुरवस्थेबद्दलही नोंदी आहेत. ठिकठिकाणच्या शाळांमधील शिकवण्याच्या पद्धतींवरही मुलांनी प्रकाश टाकला आहे.

*** थिएटर ॲकॅडमी आयोजित संगीत एकांकिका स्पर्धा**

तीन पैशाचा तमाशा, बेगम बर्वे, पडघम, घाशीराम कोतवाल, लेकुरे उदंड झाली... या नाटकांमध्ये काय साम्य आहे? ही नाटके तशी रुढ संगीत नाटके नव्हेत; पण त्यातून संगीत वेगळे काढणेही अशक्य. संगीत नाटकांची परंपरा टिकवायची असेल तर ती अशाच अभिनय कल्पनांमुळे टिकेल, या विचाराने थिएटर ॲकॅडमीने व्होडाफोनच्या सहकार्याने 'रंगसंगीत' ही संगीत एकांकिका स्पर्धा आठ ते अठरा जानेवारी दरम्यान आयोजित केली आहे.

संगीत नाटक म्हणून जे पहायला मिळते ते त्याच जुन्या पठडीतील असते. तेही व्हावे, पण नव्या प्रयोगांनाही चालना मिळावी, यासाठी ही स्पर्धा आयोजित केल्याचे थिएटर ॲकॅडमीचे अध्यक्ष प्रसाद पुरंदरे यांनी स्पष्ट केले. संगीत हा ज्यांच प्राण आहे, अशी नवी संगीत रंगभाषा शोधणारी नाटके या स्पर्धेतून रसिकांसमोर यावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

एकांकिकेचा विषय, संगीताचा प्रकार गायनशैली यावर कोणतेही बंधन या स्पर्धेमध्ये नाही. देशोदेशीच्या लोकसंगीताचा, शास्त्रीय संगीताचा वापरही यात करता येऊ शकतो; पण या नाटकातील संगीत म्हणजे गायन ते नटनट्यांनी

स्वत:च सादर करायचे आहे. ध्वनिमुद्रित गाण्याला पार्श्वसंगीत मानले जाईल. संहिताही नवीच असली पहिजे, जुन्या नाटकातील प्रवेश चालणार नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

अधिक माहितीसाठी theatreacademy-pune@gmail.com येथे संपर्क साधता येईल.

*** दहावी, बारावी अभ्यासासाठी 'संवाद'**

दहावीच्या परीक्षेला बसणारे विद्यार्थी आता अभ्यासाला लागले असून त्यांच्या मदतीला संवाद प्रकाशनातर्फे विशेषांक प्रकाशित करण्यात आले आहेत. १२वी सायन्सच्या विद्यार्थ्यांनाही अभ्यासासाठी उपयुक्त ठरतील असे चार अंक तयार करण्यात आले आहेत. किमान पास होण्यापासून ते गुणवत्तावाढीसाठी संपूर्ण राज्यातून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका अंकात देण्यात आल्या आहेत.

सर्वच पातळीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत करण्यासाठी गेली १३ वर्षे संवादतर्फे हे अंक प्रकाशित केले जात आहेत. संवाद प्रकाशन, ४४७ अमित कॉम्लेक्स, टिळक रोड, सदाशिव पेठ पुणे ३०. फोन नं. २४४६५०७९, ९८२२७७९२५९.

*** बसमधले 'मॅजिक स्कूल'**

कल्याण तालुक्यात वीटभट्ट्यांवर काम करणाऱ्या मजुरांच्या मुलांना प्रेमसेवा महिला मंडळ गेली आठ वर्षे अनौपचारिक शिक्षणाचे धडे देत आहेत.

प्रेमसेवा महिला मंडळाच्या अध्यक्षा स्टेला मोराईस यांनी सांगितले की, कल्याण तालुक्यातील वरप, नांदिवली, बापगाव, उंबर्डे, भिवंडी-खामनरोड या परिसरातील वीटभट्ट्यावर काम करणाऱ्या तब्बल ८०० मुला-मुलींना बाराखडी, अंक ओळख, वैयक्तिक आणि परिसर स्वच्छता आदी विषयांबाबत प्राथमिक स्वरूपाचे शिक्षण मंडळाचे कार्यकर्ते त्यांच्या निवासाच्या स्थानी जाऊन देतात. मुंबई रेडक्रॉस आणि मॉन्टेला कंपनीच्या सहकार्याने मंडळाने अद्ययावत सुविधा असणारी एक बस घेऊन मॅजिक स्कूल हा मोबाईल शिक्षणाचा प्रयोग सुरू केला आहे. या मॅजिक बस स्कूलमध्ये टी.व्ही, बायोस्कोप, निरनिराळी खेळणी आणि शैक्षणिक साहित्याचा समावेश आहे. 'अनाडी बनके अंदर आवो, और साक्षर बनके बाहर निकलो' अशी या मोबाईल स्कूलची जादू आहे. प्रत्येक वस्तीवर दोन तास बसचे वर्ग भरतात. साठ मुले या बसमध्ये बसू शकतात. दोन तास मुलांचे ज्ञानरंजन करून बस पुढील वस्तीवरील मुलांसाठी निघून जाते. टाटा मोटर्स कंपनीनेही विशेष सवलत दिल्यामुळे साडेबारा लाखांचा हा प्रकल्प साकार झाला. एव्हरेस्ट सर करणारी महाराष्ट्र कन्या

कृष्णा पाटील हिच्या हस्ते या मॅजिक स्कूलचे उद्घाटन झाले. या मॅजिक स्कूलची ब्रॅन्ड ॲम्बेसेडर म्हणून काम करण्याची तयारीही तिने दर्शविली आहे.

*** माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील बदल स्वीकारण्याची गरज**

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होत आहेत. या बदलांचा स्वीकार करण्याची तयारी ठेवली तरच आपण भविष्यात या क्षेत्रात टिकाव धरू शकू, असे उद्गार माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ डॉ. अच्युत गोडबोले यांनी काढले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी पुणे, संत ज्ञानेश्वर - तुकाराम महाराज स्मृती व्याख्यानमाला न्यास व युनेस्को अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. गोडबोले म्हणाले की, पूर्वीच्या काळी शेती, उद्योग व व्यापार अशा तीन क्षेत्रांमधून लोकांना रोजगार मिळत होता. परंतु, १९६० पासून माहिती तंत्रज्ञान व संगणक प्रणाली विकसित होण्यास सुरुवात झाली. त्यानंतर १९७०च्या दशकात संगणकाचा विकास झाला आणि संगणकाच्या किमती कमी झाल्या. त्यामुळे संगणकाच्या वापराचे प्रमाण वाढत गेले. त्यावेळेस काही महत्त्वाच्या कंपन्या किंवा बँकिंग अशा क्षेत्रांमध्येच संगणकाचा वापर होऊ लागला. १९८० ते १९९० या दशकात इंटरनेट सेवा सुरू झाली आणि खऱ्या अर्थाने माहिती तंत्रज्ञानाचा वापर अधिक प्रमाणात होऊ लागला. २००० साली कॉलसेंटर व बीपीओसारख्या प्रणाली विकसित होऊ लागल्या. त्यामुळे ई-मेल, कम्युनिकेशन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर माहितीचा साठा उपलब्ध होऊ लागला.

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात होत असलेल्या नवनवीन बदलांचे ज्ञान आत्मसात करण्यासाठी संघटनात्मक कार्य, तंत्रज्ञान, व्यक्तिमत्त्व विकास व बदलत्या परिस्थितीचे ज्ञान यांची गरज आहे. तरच जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकाव धरता येईल.

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामुळे भारतातील पुणे, बंगलोर, हैदराबाद, चेन्नई व कोलकात इत्यादी आठ शहरांचा विकास झाला, परंतु त्या ठिकाणच्या जागेच्या व इतर गोष्टींच्या किमती भरमसाट वाढल्या आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपली निर्यात मोठ्या प्रमाणावर आहे. अमेरिकेत माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात चढउतार झाला की त्याचा परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर होतो. हे चालतच राहणार आहे. त्यासाठी चीनने अंतर्गत बाजारपेठेची पद्धत वापरली आहे. ती भारतानेही वापरली तर आपण माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये निश्चितच यशस्वी होऊ.

आजच्या मितीला प्रत्येकाच्या घरामध्ये एक तरी आजारी माणूस आहे. याला कारण चंगळवाद. त्यामुळे आंतरिक अशांतता निर्माण झाली आहे. ती दूर करायची असेल तर माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून चांगला माणूस तयार केला पाहिजे, असेही ते म्हणाले.

प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. मिलिंद पांडे यांनी सूत्रसंचालन केले. संजय उपाध्ये यांनी आभार मानले.

*** कवी बा. भ. बोरकर यांची जन्मशताब्दी**

मराठी रसिक मनावर चंद्रफुलांची छत्री धरणाऱ्या काव्यसृष्टीचे निर्माते कवी बा. भ. बोरकर (बाकीबाब) यांच्या जन्मशताब्दीनिमित्त भेंडीबाजार घराण्याच्या प्रसिद्ध गायिका सुहासिनी कोरटकर यांनी बोरकरांच्या हिंदी कविता 'दिल चाहे सो गाओ' या कार्यक्रमात सादर केल्या. राजीव परांजपे, राजू जावळकर, श्याम पोरे, ज्ञानेश दाऊतखाने आणि विनया देसाई (निवेदन) यांनी त्यांना साथ केली. बोरकरांच्या कन्या पद्मा वज्रम यांनी त्यांच्या आठवणी सांगितल्या.

वज्रम म्हणाल्या, ''आबा कविता लिहीत नसत. कविता गात, गुणगुणत त्यांच्या मुखातून बाहेर पडत असे. नव्या बाळाचे कौतुक करावे, तसे कौतुक त्यांच्या कवितेविषयी वाटत असे. 'तेथे कर माझे जुळती' ही कविता त्यांनी वयाच्या तेविसाव्या वर्षी लिहिली होती. ते एकटाकी लिहीत असत. मराठीप्रमाणेच त्यांनी हिंदी, कोकणी आणि पोर्तुगीज भाषेतही लिहिले.''

''मुलीला 'मेघदूत' समजावे म्हणून त्यांनी मेघदूताचा अनुवाद मराठीत केला होता. गोव्याच्या स्वातंत्र्य चळवळीत ते सक्रिय होते,'' असे त्या म्हणाल्या.

*** बालकुमार संमेलनाच्या अध्यक्षपदी पाडगावकर**

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था आणि संगमनेर नगरपालिका यांच्या संयुक्त सहकार्याने २२वे मराठी बालकुमार साहित्य संमेलन ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांच्या अध्यक्षतेखाली संगमनेर येथे आयोजित करण्यात येणार आहे. २९ ते ३१ जानेवारी २०१० दरम्यान हे संमेलन होईल.

ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांना या संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती संयोजकांतर्फे करण्यात आली आणि त्यांनी तिला मान्यता दिली. बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी कोणतीही निवडणूक होत नाही, तर हे पद सन्मानाने दिले जाते. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी संगमनेरच्या नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे असून; तसेच बाळासाहेब थोरात आणि संजय मालपाणी यांचेही सहकार्य संमेलनाला मिळाले आहे. मुलांना मातृभाषेविषयी गोडी वाटावी, वाचनसंस्कृतीचा प्रसार व्हावा, या उद्देशाने या संमेलनात प्रत्येक मुलाच्या हाती पुस्तक देण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

*** पणजी येथे साधना साहित्य संमेलन**

दुसरे 'साधना साहित्य संमेलन' १९ आणि २० डिसेंबरला गोव्यात पणजी येथे

झोले. या वर्षी 'कविता' या साहित्य आकृतिबंधाला ते वाहिलेले होते.

या संमेलनाचे आयोजन गोमंतक साहित्य सेवक मंडळ, पणजी यांनी केले होते. कवी बा. भ. बोरकर यांची जन्मशताब्दी नुकतीच सुरू झाली आहे. त्याचे औचित्य राखून या वर्षी 'कविता' या साहित्यप्रकाराचा सर्वांगीण आढावा या संमेलनात विविध कार्यक्रमांतून घेण्यात आला. संमेलनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांच्या भाषणाने झाले. ज्येष्ठ कवी आणि समीक्षक वसंत आबाजी डहाके यांनी 'बीजभाषण' केले. या वेळी कवी मंगेश पाडगावकर यांना बा. भ. बोरकर स्मृतिसन्मान प्रा. जाधव यांच्या हस्ते प्रदान केला गेला. त्यानंतर कवयित्री नीरजा आणि संतोष शेणई यांनी पाडगावकर यांची प्रकट मुलाखत घेतली.

कवी पु. शि. रेगे, बा. भ. बोरकर, बा. सी. मर्ढेकर आणि चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या साहित्यावर प्रश्नमंजूषा स्पर्धा झाली. स्पर्धेचे संचलन अरुणा ढेरे व संजय जोशी यांनी केले. कविसंमेलनात विष्णू सूर्या वाघ, पुष्पाग्रज, रेखा ठाकूर, गिरिजा मुरगोडी, माधव सटवाणी, अवधूत कुडतरकर, शांता लागू, चित्रसेन शबाब यांचा सहभाग होता. दुसऱ्या दिवशी 'कवितेबरोबर जगणे वाढणे' यात दासू वैद्य, अरुण शेवते, डॉ. विठ्ठल ठाकूर, विनोद गायकवाड यांनी भाग घेतला.

### * पुणे विद्यापीठातील भजन महोत्सव

महाराष्ट्रात संतांची मोठी परंपरा आहे. या सर्वच संतांनी जातीच्या भिंती तोडून समाजाला उपदेश केला असून, ही संतपरंपरा कायम ठेवण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे, असे मत पोलिस आयुक्त सत्यपाल सिंह यांनी संत नामदेव अध्यासनाच्या वतीने आयोजित केलेल्या भजन महोत्सवात व्यक्त केले. प्रभारी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. महापौर मोहनसिंग राजपाल, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. गो. बं. देगलूरकर व अध्यासनाच्या प्रमुख डॉ. वीणा मनचंदा या वेळी व्यासपीठावर उपस्थित होत्या.

डॉ. सिंह म्हणाले, ''ज्यांना मोह, माया नाही, ज्यांच्या अंगी ज्ञानाची उपासना व ध्यानाची शक्ती असते ते खऱ्या अर्थाने संत असतात. संतांना देवाची उपमा देऊ नये. संत कधीही देव होऊ शकत नाहीत. मुळात ईश्वराला अवतार घेण्याची गरज पडत नाही. जन्म-मरणाच्या फेऱ्यात ईश्वर अडकत नाही.''

डॉ. अडसूळ, महापौर मोहनसिंग राजपाल, डॉ. देगलूरकर व डॉ. देखणे यांची भाषणे या प्रसंगी झाली. दिवसभर झालेल्या महोत्सवात इस्कॉन सत्संग भजनी मंडळ, माउली भजनी मंडळ, नामदेव भजनी महिला मंडळ, मंगलाताई चितळे, यादवराज फड यांनी भजन, भारूडे सादर केली.

संत नामदेव अध्यासनाला मिळालेल्या देणगीतून पुरस्कार व शिष्यवृत्ती लवकरच सुरू करण्याची घोषणा डॉ. वीणा मनचंदा यांनी केली.

*** प्रसारमाध्यमविषयक परिषद**

प्रसारमाध्यमांमधील 'बाजारप्रधानता' वाढू लागल्याने समाजाशी असणारी बांधिलकी हळूहळू कमी होत चालली आहे. त्यामुळे येत्या काळात विश्वासार्हता टिकवून ठेवणे हेच प्रसारमाध्यमांपुढे सर्वांत मोठे आव्हान असणार आहे, असे मत माहिती आयुक्त विजय कुवळेकर यांनी प्रबोधन मंचाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय प्रसारमाध्यमविषयक परिषदेत प्रकट केले. अध्यक्षस्थानी भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते खासदार प्रकाश जावडेकर होते. ज्येष्ठ पत्रकार अरुण टिकेकर यांचे बीजभाषण झाले. या वेळी रायपूरच्या पत्रकारिता विश्वविद्यालयाचे कुलगुरू सच्चिदानंद जोशी, पत्रकार रमेश पतंगे आदी उपस्थित होते.

कुवळेकर म्हणाले, ''प्रसारमाध्यमांमध्ये 'पेड न्यूज' हा नवा प्रकार मूळ धरू लागला आहे. गेल्या दोन निवडणुकांत त्याला 'पॅकेज' असे नवे नाव देण्यात आले आहे. एकीकडे प्रसारमाध्यमे नैतिकतेची मूल्ये शिकवितात, भ्रष्टाचाराविरुद्ध लिहितात व दुसरीकडे सर्रास पॅकेजेस घेतली जातात. या दोन्हींची सांगड कशी घालायची, हा खरा प्रश्न आहे. व्यवसायातून आर्थिकतेला महत्त्व येत गेल्याने साहजिकच बांधीलकी कमी होऊ लागली आहे. त्याचा परिणाम होत आहे तो विश्वासार्हतेवर. जर असेच चालत राहिले तर आपल्या शब्दांचा प्रभाव राहील का? हे सारे एकाच रात्रीच घडले नसून टप्प्याटप्प्याने घसरण होत आली आहे. पत्रकारिता हा व्यवसाय मागणी तसा पुरवठा या आर्थिक तत्त्वावर उभा राहिलेला नाही. त्याचे नाते समाजाशी आहे. त्यामुळे केवळ आर्थिक बाबींचा विचार हा पत्रकारितेच्या मूळ अधिष्ठानाला धक्का देणारा आहे.

प्रसारमाध्यमांमध्ये स्पर्धा प्रचंड वाढली आहे. त्याला दृश्यात्मकतेची जोड मिळाली आहे. संख्या वाढते आहे; परंतु आशयात्मक गुणात्मकता वाढते आहे का? समाजातील मूलभूत प्रश्नांपेक्षा रंजकतेला प्राधान्य दिले जात आहे. समाजातील 'बघे' वाढत चालले आहेत. भडक व सनसनाटी बातम्यांमध्ये मानवी मूल्य आणि संवेदनशीलतेचा विसर पडत आहे. विधायकतेपेक्षा विध्वंसाला अधिक महत्त्व येत आहे. 'ब्रेकिंग न्यूज'मुळे गतिमानता वाढली आहे. परंतु, त्यामुळे वस्तुनिष्ठेला दुय्यम स्थान मिळत आहे. उथळपणा व सवंगपणा वाढत चालला आहे. वैचारिक प्रबोधन, मंथन कमी होत आहे. त्यातून सुमारांची संस्कृती जोपासली जात आहे. टेकड्यांना हिमालय बनवले जात आहे. उदारमतवादाचा संकोच होत असून त्याला सामर्थ्याचा दर्प येत आहे,'' असे मत कुवळेकर यांनी व्यक्त केले.

डॉ. टिकेकर यांचे बीजभाषण झाले. जागतिकीकरणाने निर्माण केलेली स्पर्धा आणि बदलती आर्थिक समीकरणे यांमुळे प्रसारमाध्यमे जास्तीत जास्त व्यावसायिक स्वरूप धारण करतील, असे मत डॉ. अरुण टिकेकर यांनी व्यक्त केले. व्यावसायिकता सांभाळताना संपादकांचे स्वातंत्र्य अबाधित राहून माध्यमांचे समाजाशी असलेले नाते तुटू नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

डॉ. टिकेकर म्हणाले, सध्याची प्रसारमाध्यमे स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात अपयशी ठरत आहेत. प्रत्येक वृत्तवाहिनी आणि वृत्तपत्र त्याच त्या प्रकारच्या बातम्या देण्यात व्यस्त आहे. जागतिकीकरणाने परिस्थितीत मोठे बदल घडून येत आहेत. त्यासोबत वाढलेल्या स्पर्धेने आर्थिक समीकरणेही बदलली आहेत. त्यामुळे अधिकाधिक बाजारपेठ काबीज करणे हे माध्यमांपुढील महत्त्वाचे काम ठरत आहे. मात्र, मालक, जाहिरातदार यांच्या हस्तक्षेपांमुळे बातम्यांचा आशय बिघडत चालला आहे. प्रसारमाध्यमांवर जनतेचा विश्वास आहे. तो टिकण्यासाठी संपादकांचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे.

वृत्तपत्रांमध्ये पॅकेज संस्कृती वाढल्याने विश्वासार्हता कमी होत आहे असे म्हटले जात असले तरी असे प्रकार पूर्वीपासूनच चालत आले आहेत; मात्र त्याचे स्वरूप उघड नव्हते. प्रसारमाध्यमांच्या बदललेल्या स्वरूपाचे ते निदर्शक आहे, असेही ते म्हणाले.

### * 'प्रसारमाध्यमे सामान्यांच्या प्रश्नांपासून दूर

प्रसार माध्यमे सामान्य माणसांच्या प्रश्नांपासून दूर जात व्यावसायिकतेकडे झुकत चालली आहेत. ही व्यावसायिकता माध्यमांना धोक्याच्या दिशेने घेऊन जात असल्याने त्याचा वेळीच विचार केला पाहिजे, असे मत चर्चासत्रामध्ये मांडण्यात आले.

सामाजिक कार्यकर्ते अनिल अवचट, पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन विभागचे प्रमुख विश्राम ढोले. रायपूर विश्वविद्यालयाचे सच्चिदानंद जोशी, ज्येष्ठ पत्रकार आनंद आगाशे, 'साप्ताहिक विवेक'चे संपादक रमेश पतंगे, आमदार डॉ. नीलम गोऱ्हे तसेच अरुण करमरकर यांनी चर्चासत्रात भाग घेतला.

'सध्याची माध्यमे व सामाजिक आव्हाने' या विषयावर अवचट म्हणाले, ''सामाजिक प्रश्नांना माध्यमांनी जागा देणे आवश्यक आहे. पत्रकारितेतून गरिबांच्या संवेदनांना वाचा फोडली गेली पाहिजे.''

माध्यमांमध्ये अलीकडच्या काळामध्ये सुरू झालेले मोठ्या प्रमाणावरील जाहिरातीकरण व पॅकेज पद्धती त्यांना वेळीच आळा घातला नाही, तर माध्यमांमध्ये लोकांसाठी काहीही राहणार नाही, असे मत पतंगे यांनी व्यक्त केले.

ढोले म्हणाले, ''माध्यमे सध्या व्यावसायिक होत आहेत. त्याचा परिणाम

समाजावर होतो आहे. माध्यमांनी समाज व त्यातील वाचकांचा विचार प्रामुख्याने करणे गरजेचे आहे.''

''माध्यमांनी आपल्या सीमा आखून समाजाच्या दृष्टीने काम केले पाहिजे,'' असे आगाशे म्हणाले.

'माध्यमांचे स्वातंत्र्य, नियंत्रण व स्वनियमन' या विषयावर बोलताना सच्चिदानंद जोशी म्हणाले, ''लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाची ध्येयं सध्या बदलली आहेत. त्याचा गांभीर्याने विचार करून योग्य दिशेने पत्रकारिता झाली पाहिजे.'' करमरकर म्हणाले, ''गरिबांच्या प्रश्नावर माध्यमांनी आवाज उठविला पाहिजे. मात्र, त्याकडे आवश्यक त्या प्रमाणात लक्ष दिले जात नसल्याचे दिसते आहे.''

गोऱ्हे म्हणाल्या, ''जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे विकास पत्रकारिता कमी होत आहे. सामान्य माणसांचे प्रश्न त्यामुळे बाजूला पडत आहेत.''

*** खळे यांचे सांगीतिक चरित्र**

दत्ता मारुलकर लिखित ज्येष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे यांच्या 'अंतर्यामी सूर गवसला' या सांगीतिक चरित्राचे प्रकाशन मुंबईत केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर, सांस्कृतिक संचालनालयाचे अजय आंबेकर तसेच संगीतकार अनिल मोहिले या वेळी उपस्थित होते. हे पुस्तक मॅजेस्टिक प्रकाशनतर्फे प्रकाशित करण्यात आले आहे.

*** औरंगाबदला लेखिका साहित्य संमेलन**

लिहिणाऱ्या सर्वांना प्रमाण मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे, असे मत मराठवाडा साहित्य परिषदेच्या पहिल्या लेखिका साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा श्रीमती अनुराधा वैद्य यांनी व्यक्त केले.

त्या म्हणाल्या, ''इलेक्ट्रॉनिक माध्यमांची भरमसाट वाढ झाल्यामुळे जग फार लहान झाले आहे. अनेक जागतिक भाषांनीयुक्त संपर्काची एवढी साधने झालेली आहेत, की त्यामध्ये मराठीसारख्या प्रादेशिक भाषेला दुय्यम स्थान मिळणे साहजिकच आहे. कुणी काही लिहीत असेल, तर ते वाचले जाईलच याची शाश्वती राहिलेली नाही. अत्याधुनिक जगाच्या संपर्कात राहण्यासाठी इंग्रजी ही जागतिक भाषा अवगत असणे तर अत्यंत आवश्यक होऊन बसले आहे. ते योग्यही आहे; पण त्यामुळे मराठी भाषा लयाला जात असेल तर ती चिंतेची बाब आहे. मराठीच्या संगोपनाची आणि संवर्धनाची नितांत आवश्यकता आहे. विविध बोलीभाषांमधून, प्रादेशिक बीज असणाऱ्या मराठीतून जरूर लेखन व्हावे, पण तरीही लिहिणाऱ्या सर्वांना प्रमाण मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. परदेशस्थ, परभाषिक जेव्हा मराठी भाषा

शिकू इच्छितील, तेव्हा त्यांना शिकविण्यासाठी एक आदर्श, प्रमाण मराठी भाषा उपलब्ध असणे गरजेचे आहे.

''मराठी भाषा जिवंत ठेवणे हे मराठी भाषकांचेच कर्तव्य आहे. घरात आवर्जून मराठीच बोलणे, मुलांना मराठीचे उत्तम ज्ञान प्राप्त करून देणे, मराठी साहित्य वाचणे, वाचायला लावणे, मराठीतून अभिव्यक्त होणे या गोष्टी निष्ठेने केल्यास मराठीला निश्चितच उज्ज्वल भवितव्य आहे. हेही काम स्त्रियाच अधिक उत्तम प्रकारे करू शकतील.''

''साहित्य हा समाजाचा सांस्कृतिक दस्तऐवज आहे. आता समाज बदलला आहे. स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. समजदार व परिपक्व स्त्री लेखनातून स्त्रीला समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न चालला आहे,'' असे विचार प्रख्यात लेखिका श्रीमती रोहिणी कुलकर्णी यांनी उद्घाटक म्हणून प्रकट केले.

*** लेखिका संमेलनातील ठराव**

हिंदी एकमेव राष्ट्रभाषा नसून राज्यघटनेत नमूद केलेल्या २२ भाषाही राष्ट्रभाषा आहेत. हिंदी राष्ट्रभाषा आहे या भ्रमातून महाराष्ट्राच्या विधिमंडळात हिंदी भाषेला स्थान देणे अनुचित आहे. उत्तर प्रदेश आणि इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्र विधिमंडळानेही महाराष्ट्राच्या राजभाषेतून आणि लोकभाषेतून म्हणजे मराठीतून शपथ घ्यावी, असा नियम राज्य सरकारने करावा, असा ठराव मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे आयोजित लेखिका संमेलनात संमत करण्यात आला.

मराठवाडा लेखिका संमेलनाचा समारोप खुल्या अधिवेशनाने झाला. या अधिवेशनातील ठरावांचे वाचन परिषदेचे कार्यवाह के. एस. अतकरे यांनी केले. उत्तर प्रदेशामध्ये हिंदी लोकभाषा आणि राजभाषा आहे. उत्तर प्रदेश विधिमंडळाच्या सदस्याने लोकभाषा आणि राजभाषा हिंदीतूनच शपथ घ्यावी असा नियम केलेला आहे. महाराष्ट्राशिवाय इतर भाषिक राज्यांनी त्या-त्या राज्याच्या राजभाषेत आणि लोकभाषेत शपथ घ्यावी असा नियम आहे. हिंदी राष्ट्रभाषा आहे हा भ्रम हिंदी भाषिकांनी महाराष्ट्रात पद्धतशीरपणे पसरविला आहे, असा आरोप या ठरावात करण्यात आला आहे.

दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांच्या आणि मुद्रित प्रसार माध्यमांच्या जाहिरातीतून स्त्रियांचे जे विकृत दर्शन घडविले जाते ते सांस्कृतिक अध:पतन आहे. याचे उमलत्या पिढीवर दूरगामी अनिष्ट परिणाम होऊ शकतात. या माध्यमामध्ये याचे चित्रण अतिरंजित असता कामा नये. या विकृत प्रवृत्तीचे समर्थनही होता कामा नये. या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी स्वतंत्र कायदा करावा अशी मागणी ठरावाद्वारे राज्य सरकारकडे करण्यात आली आहे.

प्राचार्य नरहर कुरुंदकर यांच्या लेखन आणि चिंतनाने मराठी साहित्य आणि संसकृती समृद्ध केली आहे. त्यांनी केलेली मीमांसा, सांस्कृतिक, वाङ्मयीन, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांना प्रेरक ठरलेली आहे. नरहर कुरुंदकर यांचे उचित असे स्मारक नांदेड महापालिकेने आणि राज्य सरकारने तातडीने उभे करावे असा ठरावही संमत करण्यात आला.

औरंगाबादमध्ये लोककला अकादमी लवकरात लवकर स्थापन करण्यात यावी आणि औरंगाबाद शहरात स्त्री शिक्षणाच्या उद्गात्या सावित्रीबाई फुले यांचे उचित स्मारक महानगरपालिकेने उभे करावे असा ठरावही संमत करण्यात आला.

## * विभागीय साहित्य संमेलन

मराठी साहित्याला उद्याच्या जगात पाऊल टाकायचे असेल, तर साहित्याने आजच्या समस्यांमध्ये उडी घ्यायला हवी. ही उडी अंगात 'टायरप्रुफ जॅकेट' न घालता घ्यावी लागेल, असे मत विभागीय साहित्य संमेलनाध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण दवणे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेच्या वतीने आयोजित विभागीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन विधानसभेचे सभापती दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते झाले. विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम, द. मा. मिरासदार, वि. भा. देशपांडे, माधवी वैद्य आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड या उद्योगनगरीत उद्योगांमुळे सुबत्ता आली. आता सांस्कृतिक ओळख निर्माण करण्याची गरज आहे. ही गरज पूर्ण करणे अशा साहित्य संमेलनांमधून शक्य आहे, असे मत दिलीप वळसे-पाटील यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, सध्या पंथ, भाषा, पक्ष, प्रांत यात चढाओढ आहे. त्यामुळे समाजात संघर्ष निर्माण होत असून, तो थांबविण्यासाठी सहिष्णुता वाढविण्याची गरज आहे.

अध्यक्षपदाची निवडणूक, साहित्यिकांचे रुसवे-फुगवे, वाद-विवाद, अनुदान, परदेश वारी यामुळेच हल्ली साहित्य संमेलने गाजत असल्याची खंत विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, समाज साहित्यिकांना आदर्श मानतो. त्यामुळे साहित्यिकांनी मतभेद विसरून समाजासाठी एकत्र येण्याची गरज आहे. लेखणीच्या माध्यमातून साहित्यिकांनी समाजाला अंतर्मुख केले पाहिजे. दूरचित्रवाणी आणि चित्रपट ही माध्यमे तरुणांना गुन्हेगारीचा मार्ग दाखवतात. तरुणांनी साहित्य वाचले, तर सुसंस्कृत समाजाची निर्मिती होईल.

संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे म्हणाले, समाजमनातला नको असलेला भाग दूर केल्यास उत्तम साहित्याची निर्मिती होते.

उद्घाटन समारंभापूर्वी ग्रंथदिंडी काढण्यात आली. ग्रंथदिंडीचे पूजन संमेलनाध्यक्ष

प्रवीण दवणे, मोरया गोसावी देवस्थानचे मुख्य विश्वस्त विघ्नहरी देव महाराज, अभिनेता डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथदिंडीत पारंपरिक वेशभूषा केलेले विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

*** विभागीय साहित्य संमेलनामध्ये विश्वास पाटील यांची मुलाखत**

''शिवाजी महाराजानंतर संभाजीराजांनीच महाराष्ट्र सांभाळला आहे. तोपर्यंत औरंगजेब महाराष्ट्राकडे पाहू शकला नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या संभाजीराजांनाच बदफैली म्हणून बदनाम केले गेले, यापेक्षा मोठे महाराष्ट्राचे दुर्दैव नाही,'' अशी खंत ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी संमेलनातील प्रकट मुलाखतीत व्यक्त केली. राजेंद्र कोरे यांनी श्री. पाटील यांच्याशी संवाद साधला. चिंचवडच्या प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात हा कार्यक्रम झाला. पानिपत, झाडाझडती, पांगिरा, महानायक, संभाजी या गाजलेल्या ऐतिहासिक आणि सामाजिक प्रश्नांवरील कादंबऱ्यांबाबतचे अनुभव श्री. पाटील यांनी कथन केले. श्री. पाटील म्हणाले, ''साहित्यात संभाजीराजांची केवळ बदनामीच करण्यात आली आहे. औरंगजेबाच्या हातून संभाजीराजेंना एकदाच मृत्यू आला, मात्र आपल्या साहित्यिकांच्या आणि नाटककारांच्या अशा लिखाणामुळे त्यांची वारंवार हत्या झाली. शंभूराजेंवर मराठीत ६० ते ७० नाटके आहेत.''

श्री. पाटील यांनी ऐतिहासिक लेखनासाठी खूप प्रवास केला. त्याबाबत ते म्हणाले, ''प्रवासामुळे माणूस घडत जातो. अनुभवसंपन्न होतो. 'पानिपत'च्या लिखाणाची तयारी पुण्यात कामानिमित्त राहत असताना केली. पुणे सोडताना 'झाडाझडती'ची संकल्पना तयार होती. त्यामुळे माझ्यासाठी हे शहर 'पुण्य' ठरले. 'पानिपत'मध्ये मराठी माणसाच्या जगण्याची प्रतिमा आहे. या लेखनात कादंबरी, प्रवासवर्णन आणि नाटक असे विविध आकृतिबंध आहेत. सरकारी कामातले तक्रार अर्ज मी अभ्यास म्हणून वाचत होतो. यातील भाषा, मावळातील शेतकऱ्यांची भाषा मला कादंबरी लेखनासाठी उपयोगी पडली.''

लहानपणीच्या जीवनाबद्दल श्री. पाटील म्हणाले, ''बालपण ग्रामीण भागात गेल्यामुळे निसर्गाचा जवळून अभ्यास केला. त्याचे विराट दर्शन झाले. वडील स्वातंत्र्यसैनिक होते. त्यामुळे आयुष्यात वेगळे काहीतरी करून दाखविण्याची जिद्द होती. माझे गाव आणि परिसर हीच माझ्या लिखाणातील प्रेरणा आहे.''

बालपणीची आठवण सांगताना विश्वास पाटील म्हणाले, ''एकदा चुलत्यांबरोबर विठाबाई नारायणगावकरांची लावणी पाहण्यासाठी गेलो होतो. फडात बोर्डावर लावणी सुरू झाली. सगळे शिट्या वाजवीत होते. फेटे उडवीत होते. हे पाहून मीदेखील शिट्टी वाजविण्याचा प्रयत्न करू लागलो, पण ती वाजत नव्हती. माझ्या

चुलत्यांनी ते पाहिले आणि जोरदार चपराक लगावली. म्हणाले, ''बोर्डावर लावणी चालू असताना शिट्टी वाजवता येत नसेल तर पाटलांच्या घराला आलास कशाला?'' हे शब्द कानात अजूनही घुमतात. कदाचित याच अनुभवातून 'चंद्रमुखी'चे लिखाण झाले असावे.''

### * वाचन संस्कृतीला सार्वत्रिक अधिष्ठान मिळणे गरजेचे

वाचन संस्कृती वाढविण्यासाठी अनेक शाळा प्रयत्न करीत आहेत. पण त्याला सार्वत्रिक अधिष्ठान मिळणे गरजेचे आहे, असे मत प्रसारमाध्यमांमधील विविध मान्यवरांनी विभागीय साहित्य संमेलनात 'प्रसारमाध्यमे आणि वाचन संस्कृती' या विषयावरील परिसंवादात व्यक्त केले. सकाळचे संपादक सुरेशचंद्र पाध्ये यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिसंवादात लेखिका विनीता ऐनापुरे, रेणू दांडेकर, स्वाती महाळंक, सुनील माळी सहभागी झाले होते.

पाध्ये म्हणाले की, पुस्तकांचे वाचन म्हणजे संस्कृती नाही. आपण आपल्या परिघात जगत असतो. पण परिघाचा भेद करून पलीकडे जाण्याची जी धडपड असते ती म्हणजे वाचन संस्कृती होय. माणुसकीच्या समृद्धीसाठी वाचन संस्कृतीचा विचार रुजणे आवश्यक आहे. वाचन संस्कृती वाढविण्यासाठी काय करता येईल, याचे चिंतन होणे गरजेचे आहे. शिक्षकांकडून वाचन संस्कृती जोपासण्यास मदत होईल. पुस्तके, आकाशवाणी, दूरदर्शन, नाटकाच्या माध्यमातून येणाऱ्या अनुभवाचे आदान-प्रदान झाले पाहिजे.

माळी म्हणाले की, पूर्वी वृत्तपत्रं ही मतपत्रं होती. पण ती आता व्यावसायिक झाली आहेत. केवळ घडलेली घटना लिहिणे म्हणजे बातमी नव्हे. तर ही घटना आताच का घडली याची कारणमीमांसाही आता बातमीत द्यावी लागते. वाचकवर्ग हा आत्मकेंद्रित झाला आहे. अनेक वाचक आपल्या क्षेत्रापुरतेच वाचन करतात. वृत्तपत्राचा खप वाढलेला असला तरी वाचन संस्कृती वाढलेली नाही.

स्वाती महाळंक म्हणाल्या की, प्रसारमाध्यमे आणि वाचन संस्कृती या दोन्हींचे स्वतंत्रपणे विश्लेषण करणे गरजेचे आहे. प्रसारमाध्यमे ही मनोरंजनाबरोबरच जनजागृती करण्याचे काम करतात. शहाणे करून सोडावे सकळजन ही भूमिका प्रसारमाध्यमे बजावित असतात. माणूस जन्माला येतो, पण माणुसकी जन्माला घालावी लागते. जन्माला आलेल्या माणसाला माणुसकी शिकविण्याचे काम प्रसारमाध्यमे करीत असतात. प्रसारमाध्यमांमुळे चांगल्या वाङ्मयाची माहिती मिळते. तसेच चांगल्या साहित्याची आवड निर्माण होते.

रेणू दांडेकर म्हणाल्या की, प्रसारमाध्यमे आणि वाचन संस्कृती या दोन वेगवेगळ्या गोष्टी नाहीत. संस्कृती ही माणसाच्या मनात असलेल्या विचारातून

घडते. विचार समाजाला घडविण्यासाठी उपयोगी पडतात. वाचनसंस्कृती ही क्रिया आहे, तर प्रसारमाध्यमे हे साधन आहे.

श्रीमती विनीता ऐनापुरे म्हणाल्या की, काळानुसार प्रसारमाध्यमात बदल झाला. मात्र वाचन संस्कृती कायम आहे. प्रसारमाध्यम आणि वाचन संस्कृती यांची तुलना होऊ शकत नाही. मुलावर लादलेला अभ्यास म्हणजे वाचन संस्कृती होत नाही. वाचनाचा संस्कार हा आई-वडिलांपासून व्हायला पहिजे. मुलांना विचारशील बनवायचे असेल तर वाचन संस्कृती वाढविल्याशिवाय गत्यंतर नाही.

### * विशेष मुलांसाठी आयोजित नाट्यस्पर्धा

नवक्षितिज संस्थेतर्फे विशेष मुलांसाठी आयोजित नाट्यस्पर्धेचे सादरीकरण झाले. सात नाटिकांतून विविध विषय हाताळत या मुलांनी प्रेक्षकांचे रंजनाबरोबरच प्रबोधन केले. प्रसिद्ध अभिनेते दिलीप प्रभावळकर यांच्या हस्ते या स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. ज्येष्ठ अभिनेत्री लालन सारंग, ज्येष्ठ पत्रकार मुकुंद संगोराम, स्पर्धेचे परीक्षक प्रकाश पारखी, प्रतिभा दाते, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. नीलिमा देसाई हे सर्व या वेळी उपस्थित होते.

छोट्या गटामध्ये संजीवनी विद्यालयातील मुलांनी 'लांडगा आला रे आला', सिंधू विद्या भवनच्या मुलांनी 'देव तेथेची जाणावा', कामायनी विद्या मंदिराच्या मुलांनी 'दर्यादिल दयावान', जीवनधारा संस्थेच्या मुलांनी 'पानांची गोष्ट' या नाटिका सादर केल्या. मोठ्या गटातील नवक्षितिज संस्थेच्या मुलांनी 'स्वाइन फ्लू', जीवनज्योत संस्थेच्या मुलांनी 'नरसिंह सरस्वती अवतार' आणि माधवी ओगले कार्यशाळेच्या मुलांनी 'तीन भावंडांची कथा' (सिग्नल) या नाटिका सादर केल्या. प्रदूषणाचा पर्यावरणावर होणारा परिणाम, झाडे लावा झाडे वाचवा, वाहतूक नियमांचे पालन, खोटे बोलणाऱ्यांची वृत्ती अशा विविध विषयांवर या नाटिकांतून भाष्य करण्यात आले. छोट्या गटात कामायनी विद्या मंदिर, तर मोठ्या गटात जीवनज्योत या संस्थांनी प्रथम पारितोषिक पटकाविले.

प्रभावळकर यांनी 'चौकट राजा' चित्रपटाच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, ''या अनुभवाने मी नट म्हणून समृद्ध झालो. आम्ही भूमिका करताना दुसऱ्याचे आयुष्य काही वेळापुरते जगतो. पण स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून दुसऱ्यासाठी जगणे हे अमर्याद असते.''

### * परिवर्तनाची शाहिरी

विद्यापीठे ही समाजाभिमुख व्हायला हवीत. कला या गोष्टीला समाज सर्टिफिकेट देत असतो. सुज्ञ नागरिक, माणसं आज मूल्यांपासून दूर जात आहेत. त्यांच्या बोथट

संवेदनांना चैतन्य देण्याची गरज आहे. बुद्धिवाद्यांना प्रबोधन करणे गरजेचे आहे, असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन आयोजित 'परिवर्तनाची शाहिरी' या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले, १९ व्या शतकात संतांनी प्रबोधन केले. स्वातंत्र्योत्तर व स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक समाजसुधारकांनी प्रबोधन केले. प्रबोधनकर्त्यांच्या आतला आवाज हृदयापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. परिवर्तनानेच विचारांना योग्य दिशा समाज सुदृढ होण्यास मदत होते. विधायक मार्गाने जी युवापिढी चालली आहे तिला चांगले मार्गदर्शन करून त्यांच्या पाठीवर थाप टाकली पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मनोहर जाधव यांनी केले.

*** जागतिक अपंग दिन**

अपंगांना दया नको, संधी हवी आहे. त्यांच्यात दडलेली उत्पादक शक्ती ओळखून तिला वाव मिळाला पाहिजे. यासाठी सरकार, सेवाभावी संस्था आणि सुज्ञ नागरिकांनी एकत्रित येऊन योजनाबद्ध ठोस कार्यक्रम आखला पाहिजे. अशी पुस्तके तयार केली पाहिजेत, अशी अपेक्षा डॉ. वा. ना. तुंगार यांनी व्यक्त केली आहे.

अपंगांसाठी आतापर्यंत अनेक महत्त्वपूर्ण कायदे झाले. मात्र, त्यात अनेक त्रुटी आहेत. १९९२ कायद्याची अंमलबजावणी करणारे कार्यालय दिल्ली येथे आहे. त्यामुळे विशेष शाळांतील शिक्षक, पुनर्वसन तज्ज्ञ यांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या कारभारावर नियंत्रण करणे अवघड झाले आहे. या कायद्याची राज्यस्तरावरून अंमलबजावणी झाल्यास ती प्रभावी ठरेल.

कायद्यानुसार अपंगकल्याण आयुक्तांना अपंगांच्या सर्व समस्यांचे ज्ञान व या क्षेत्रातील अनुभव बंधनकारक आहे. मात्र, सरकारने हा नियम धाब्यावर बसवलेला आहे. आजपर्यंत अपंग कल्याण आयुक्तांना कायद्यातील अंमलबजावणी प्रभावीपणे करता येत नसल्याने अपंगांना न्याय मिळण्यास अडथळे येत आहेत.

सरकारच्या शाळांमधून शिकविला जाणारा अभ्यासक्रम अपंगांसाठी जीवनोपयोगी ठरत नाही. या शाळांमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थ्यामागे सरकारला सरासरी ६० हजार रुपये वार्षिक खर्च येतो. मात्र, १८ वर्षांनंतर या मुलांना या शाळांची दारे बंद होतात. अपंगांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी केवळ ८० कार्यशाळा आहेत. मात्र तेथे शिकवला जाणारा अभ्यासक्रम कालबाह्य झाला आहे. त्यात नावीन्य आणण्यासाठी या संस्थांकडून प्रयत्न होत नसल्याने या शाळा व कार्यशाळा नक्की कोणाच्या पुनर्वसनासाठी चालविल्या जातात हा प्रश्न पडतो. प्रत्येक मुलाच्या शिक्षणासाठी दहावीपर्यंत सुमारे सहा लाख खर्च शासनाकडून करूनही अनेक

उच्चशिक्षित अपंग व्यक्ती भीक मागून, परावलंबी जीवन का जगत आहेत, याबाबत सरकार व सेवाभावी संस्थांनी आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.

अपंग मुले सर्वसामान्य मुलांच्या शाळेत शिकली पाहिजेत, असा शासनाने आग्रह धरला. मात्र या मुलांसाठी आवश्यक त्या यंत्रणा सर्व शाळांमधून उभारल्या गेल्या नाहीत. या शाळांतील शिक्षकांचादेखील प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांना विशेष शाळांमधून शिकण्याशिवाय पर्याय राहत नाही. त्यामुळे ही मुले समाजाच्या मुख्य प्रवाहात येणे अशक्य झाले आहे. अपंगांसाठी नोकऱ्यांमध्ये ३ टक्के आरक्षण आहे. मात्र, शासनाने १६६५ रिक्त पदे भरलेली नाहीत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची ३१३ पदे भरली गेली नाहीत. शासनानेच अपंगांबाबत नोकर भरतीत उदासीनता दाखवली, तर खासगी क्षेत्रातून त्यांना रोजगार कसा मिळू शकेल, असा प्रश्नही तुंगार यांनी उपस्थित केला.

जिल्हाधिकाऱ्यांच्या समितीने दिलेली पालकत्वाची प्रमाणपत्रे विमा कंपन्या, राष्ट्रीकृत बँका, केंद्र व राज्य शासनाची कार्यालये स्वीकारीत नाहीत. त्यामुळे अनेक लाभार्थी या योजनांपासून दूर आहेत. त्यामुळे या योजनेतील निधी परत जात आहे. अपंग कल्याणासाठी स्वतंत्र आयोगाची स्थापना करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सुचविले.

### * केंद्रीय हिंदी समितीत खडसे यांचा समावेश

केंद्रीय हिंदी समितीची स्थापना करण्यात आली असून त्यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक आणि कवी डॉ. दामोदर खडसे यांचा  समावेश आहे. पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग या समितीचे अध्यक्ष असून आठ केंद्रीय मंत्री व सहा राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह ४१ जणांचा या समितीमध्ये समावेश आहे. या समितीचा कालावधी तीन वर्षांचा असून समितीचे मुख्यालय दिल्ली येथे असेल. डॉ. खडसे यांची ३२ पुस्तके प्रकाशित झाली असून त्यामध्ये बारा मराठी पुस्तकांच्या हिंदी भाषांतरांचा समावेश आहे. त्यांच्या पुस्तकांना महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश येथील साहित्य अकादमी संस्थेने पुरस्कार दिले आहेत. 'काला सूरज' या हिंदी कादंबरीला राष्ट्रीय साहित्य पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

### * 'ई-गव्हर्नन्स' पाठोपाठ 'एम-गव्हर्नन्स'

देशातील मोबाईलधारकांची संख्या ५० कोटी असून, नागरिकांपर्यंत ई-गव्हर्नन्स सुविधा पोचविण्याचा हा एक चांगला पर्याय आहे. त्यामुळे पुढील वर्षी देशात मोबाईल गव्हर्नन्स (एम-गव्हर्नन्स) सुविधा केंद्र सरकार सुरू करणार असल्याची माहिती सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स कॉम्प्युटिंगचे (सी-डॅक) कार्यकारी

संचालक झिया सकीब यांनी दिली.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या देशातील प्रगतीचे फायदे सर्व नागरिकांपर्यंत पोचावेत, या उद्देशाने केंद्र सरकारने ई-गव्हर्नन्स, ई-कॉमर्स आणि इंटरनेटवर आधारित सेवांच्या प्रचारासाठी 'सी-डॅक'ची निवड केली आहे. देशभर 'सी-डॅक' 'पब्लिक की इन्फ्रास्ट्रक्चर'वर (पीकेआय) चर्चासत्रांचे आणि परिषदांचे आयोजन करीत आहे. आतापर्यंत १८ चर्चासत्रे झाली असून, पुढील वर्षापर्यंत एकूण तीस चर्चासत्रे घेतली जाणार आहेत.

'एम-गव्हर्नन्स'विषयी माहिती देताना सकीब म्हणाले, ''सध्या देशात ५० कोटी मोबाईलधारक असून दर वर्षी त्यांच्या संख्येत वाढ होत आहे. दहा वर्षांपूर्वी एक हजार लोकांमागे एक दूरध्वनी होता आणि आता दोन लोकांमागे एक फोन आहे. देशात इतर माध्यमांच्या तुलनेत मोबाईल वापरण्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे केंद्र सरकार 'एम-गव्हर्नन्स' सुरू करण्याचा विचार करीत असून, पुढील वर्षी ही सेवा सुरू होईल. यामुळे वेळ, पैसा वाचणार असून, भ्रष्टाचाराला मोठ्या प्रमाणात आळा बसण्यास मदत होणार आहे. प्राप्तिकर आणि प्राप्तिकर परतावासुद्धा यावरून भरता येणार आहे.'' 'पीकेआय'विषयी ते म्हणाले, ''अधिकाधिक लोकांनी 'ई-गव्हर्नन्स', 'ई-कॉमर्स'चा वापर करावा, यासाठी याचे आयोजन करण्यात येत आहे, तसेच आपला पासवर्ड हॅक केला जाईल, आपण करत आहोत ते व्यवहार सुरक्षित आहेत का, अशा शंका त्यांच्या मनात येत आहेत. त्या दूर करणे, आत्मविश्वास वाढविणे हाही या मागचा उद्देश आहे. 'ई-गव्हर्नन्स'चा फायदा सरकारप्रमाणेच लोकांनाही होणार आहे.''

देशात सध्या लोकसंख्येच्या दहा टक्के लोक 'ई-गव्हर्नन्स'चा वापर करीत आहे. केंद्र सरकारच्या उद्दिष्टाप्रमाणे पुढील पाच वर्षांत हे प्रमाण चाळीस ते पन्नास टक्क्यांवर नेले जाणार आहे. पुढील पाच वर्षांत दहा कोटी निरक्षर लोकांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले असून, हे लोकही 'ई-गव्हर्नन्स'चा फायदा घेऊ शकणार आहेत.

*** मोबाईल क्रमांक अकरा आकडी होणार**

पुढील वर्षापासून देशातील पन्नास कोटी मोबाईलधारकांना त्यांचा मोबाईल क्रमांक बदलावा लागण्याची शक्यता आहे. दूरसंचार खाते (डीओटी) मोबाईल क्रमांक ११ आकडी करण्याचा विचार करीत आहे.

यासाठी मोठ्या प्रमाणात तांत्रिक बदल करावे लागणार असून त्यात सॉफ्टवेअर आणि मोबाईल नेटवर्कचा समावेश आहे. ही सर्व प्रक्रिया करण्यासाठी किमान बारा महिन्यांपर्यंतचा कालावधी लागू शकतो. 'डीओटी'ने तयार केलेल्या अधिसूचनेनुसार

देशातील सर्व मोबाईलधारकांचा मोबाईल क्रमांक अकरा आकडी असला पाहिजे, तसेच सध्याच्या क्रमांकाच्या आधी 'नऊ' हा आकडा लावण्याचा प्रस्ताव आहे. याचा फायदा मोबाईल कंपन्यांना होणार असून, त्यांना दहा अब्जांपर्यंत मोबाईल क्रमांकांचे वाटप करता येऊ शकते. २००३ मध्ये निश्चित करण्यात आलेली मोबाईल क्रमांकांची योजना २०३० पर्यंत अस्तित्वात राहणार आहे. २०३० पर्यंत देशातील मोबाईलधारकांची संख्या पन्नास कोटीपर्यंत जाण्याची शक्यता २००३ मध्ये वर्तविण्यात आली होती; मात्र त्या अंदाजाच्या २१ वर्षे आधीच पन्नास कोटींचा टप्पा गाठला गेला आहे.

### * सात संमेलनाध्यक्षांचे जीवन दर्शन

अ.भा. मराठी साहित्य संमेलनाच्या सात माजी अध्यक्षांचे साहित्य व जीवनदर्शन घडविणारा सप्ताह एस. एम. जोशी सभागृह पुणे येथे दि. २३ ते २९ नोव्हेंबर २००९ दरम्यान साजरा करण्यात आला.

पु.ल. देशपांडे, आचार्य अत्रे, स्वातंत्र्यवीर सावरकर, द.मा. मिरासदार, वि.स. खांडेकर, गो.नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर या सात संमेलनाध्यक्षांचे साहित्यदर्शन श्याम भुर्के आणि गीता भुर्के यांनी घडविले.

कार्यक्रमाच्या सादरीकरणात निवेदन, गीत, कथाकथन, नाट्यप्रवेश, कीर्तन, समूहगीत यांचा समावेश होता. उद्घाटन डॉ. आनंद यादव यांनी केले. वि.स. खांडेकर यांच्या कन्या कल्पलता खरे, डॉ. वीणा देव, ज्ञानदा नाईक, श्रीकांत मोघे, डॉ. सतीश देसाई, सु.वा. जोशी, म.श्री. दीक्षित, डॉ. सरोजा भाटे, शशिकला उपाध्ये, डॉ. मीना वांगीकर, स्वाती महाळंक, रवीन्द्र घाटपांडे, डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी, सुधा सामक, प्रमोद आडकर यांनी भाग घेतला.

साहित्यकलाक्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल अ.भा. सांस्कृतिक संघ, कथा भारती, सुहास बोकील, श्री.म. माटे, विजय कोलते, सुभाष दांडेकर यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

### * जागतिक अर्थकारणाचे नेतृत्व

''भविष्यातील जागतिक उद्योग व अर्थकारणाचे नेतृत्व भारत आणि चीनच्या हाती येणार असून हे नेतृत्व पुण्यात पुढे यावे'' अशी अपेक्षा ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केली.

'वनराई'च्या वतीने 'जागतिक तापमानवाढ' या विषयावरील विशेषांक व पुस्तिकेचे प्रकाशन डॉ. माशेलकर व डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते झाले. 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया, उद्योगपती नितीन देसाई, लीला पूनावाला,

सिंबायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, श्रीराम गोमरकर व प्रफुल्ल समर्थ या वेळी उपस्थित होते. डॉ. माशेलकर म्हणाले, ''भारत व चीनच्या वाढत्या क्षमतेचा व भविष्यातील ताकदीचा अंदाज जगभरातील उद्योगांनाही आला आहे. त्यामुळे जगभरातील उद्योग या दोन देशांकडे वळत आहेत. जगभरातील प्रमुख ७६० उद्योगांच्या संशोधन व प्रयोगशाळा भारतात गेल्या काही वर्षांत सुरू झाल्या आहेत. या प्रयोगशाळांमधून दीड लाखांहून अधिक संशोधक काम करीत आहेत, यावरून भारताचे भविष्यातील महत्त्व किती आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे. ''

## * श्रीमद्‌भगवद्‌गीता भाष्यपंचक

श्रीमद्‌भगवद्‌गीता केवळ वाचनासाठी आणि अभ्यासासाठी नसून ती प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी आहे. भारतीय साहित्यिकांमधील महत्त्वाच्या व्यक्तींच्या साहित्यामध्ये गीतेचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो, असे मत ज्येष्ठ लेखिका मालती देशपांडे यांनी व्यक्त केले.

मालती देशपांडे यांनी संकलित केलेल्या श्रीमद्‌भगवद्‌गीता भाष्यपांचक त्रिखंडात्मक ग्रंथाचे संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. वि. अ. कुलकर्णी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. कल्याणी नामजोशी होत्या. या प्रसंगी प्रा. लीला गोविलकर, डॉ. समीर कुलकर्णी, प्रकाशक गिरीश जोशी उपस्थित होते.

देशपांडे म्हणाल्या, ''पाच साहित्यिकांनी गीतेवर लिहिलेल्या ग्रंथांतून हा ग्रंथ संकलित करण्यात आला आहे. गीतेचा अभ्यास मी केलेला असला तरी मला अद्यापही पूर्ण गीता समजलेली नाही. सध्याच्या जगात वावरताना धर्मसंस्कृतीचा ऱ्हास होताना दिसत आहे. अशा वेळी भगवंताच्या अवताराकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे. गीतेची शिकवण आचरणात आणल्यास सर्वांनाच फायदा होणार आहे. धर्मग्रंथ म्हणून पाहतानाच व्यावहारिक दृष्टिकोन ठेवूनसुद्धा गीतेपासून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.''

या वेळी प्रकाशक जोशी म्हणाले, ''गीता या ग्रंथाचे आपण वाचन करतो, तेव्हा प्रत्येक वेळेला आपल्याला नवीन काहीतरी शिकायला मिळते. प्रत्येक वेळी शब्दांचा नवीन अर्थ उमगलेला जाणवतो. डोळसपणे अभ्यास करता यावा, या उद्देशाने या ग्रंथाची निर्मिती करण्यात आली आहे.''

## * 'कॉपी रायटिंग' मार्मिक आणि परिणामकारक हवे.

''आपल्याला ज्या भाषेत कॉपी रायटिंग करायचे, ती भाषा शुद्ध स्वरूपात आत्मसात करणे अपरिहार्य आहे. भाषेचा वापर आणि शब्दांचे वैविध्य हे ज्याच्या त्याच्या प्रतिभेवर अवलंबून असते. तरीही, उत्पादनाची जाहिरात हा भाग असल्यामुळे

कॉपी रायटिंगमध्ये मार्मिकता आणि परिणामकारकता महत्त्वाची असते. म्हणूनच शब्द या सामर्थ्याचा काळजीपूर्वक वापर करा,'' असा सल्ला ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांनी दिला.

'ऐक्यभारती रिसर्च इन्स्टिटट्यूट'तर्फे पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत 'कॉपी रायटिंग : कला, तंत्र आणि भाषा' या विषयावरील दोन दिवसांच्या कार्यशाळेचे उद्‌घाटन तेंडुलकर यांच्या हस्ते झाले.

तेंडुलकर म्हणाले, ''जागतिकीकरणाच्या रेट्यात युवा पिढीसाठी कर्तृत्वाची नवी दालने खुली होत आहेत. त्यासाठी महत्त्वाकांक्षा आणि क्षमता या गुणांची आवश्यकता आहे. हेच गुण कॉपी रायटिंगसाठीदेखील गरजेचे आहेत. भाषेच्या वापर करताना काय परिणाम साधायचा हे महत्त्वाचे असते. जाहिरातीचे कॉपी रायटिंग करताना ग्राहकाचा विचार, निर्मात्याचा हेतू आणि उत्पादनाची गरज या तीनही बाबींची सांगड घालावी लागते.'' व. पु. काळे आणि मंगेश पाडगावकर यांचे भाषाप्रभुत्व जाहिरातीसाठी उपयोगात आणले गेले आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

सुरेशचंद्र पाध्ये म्हणाले, ''संस्था अनुवाद अकादमीचे कार्य करीत असल्याने कॉपी रायटिंगसाठी प्रेरक लेखनकला हा शब्दप्रयोग करावा असे वाटते. माणसाला कृती करायला लावते ते प्रेरक लेखन असते. भाषेचा आत्मा समजला नाही तर लेखनातून प्रेरक शक्ती निर्माण होणार नाही. कॉपी रायटिंग ही अभ्यास, वाचन, प्रतिभेचा कस लावणारी आणि शब्दांशी खेळण्याची कला असून, सृजनशक्तीचा विकास घडवून कल्पकतेने विषय पोचवावा लागतो.''

### * सामाजिक कृतज्ञता निधी

''अनाथ मुलांना त्यांच्या प्राथमिक गरजांबरोबर खरी गरज असते ती त्यांच्याशी संवाद साधण्याची. त्यातील काहींना आई या नात्यापलीकडे नाती माहीत नाहीत. त्याचे आजी-आजोबा होऊन माणसुकीची मूल्ये जपणारी नाती निर्माण करावीत,'' असे मत सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावस्कर यांनी व्यक्त केले.

'बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉईज वेल्फेअर ऑर्गनायझेशन'च्या वतीने राज्यात विविध ठिकाणी काम करणाऱ्या सामाजिक संस्थांना सामाजिक कृतज्ञता निधी देण्यात आला.

मेघालय विकास साधन वाहिनी संचलित मेघालय विद्यार्थिनी वसतिगृह, चिपळूण येथील रेणुका माता नागा विद्यार्थिनी छात्रावास, चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरुकुलम, भोर तालुक्यातील सरस्वती प्रतिष्ठान, वेल्ह्यातील तोरणा राजगड परिसर समाजोन्नती न्यास व एकलव्य बाल शिक्षण संस्था यांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचा निधी देण्यात आला. ❒

# "मी अनीता राकेश सांगतेय..."

**अनीता राकेश**

अनु. रजनी भागवत




तुम्ही ज्यांच्यावर बेहद्द प्रेम करता ते तुमच्यावर रुसून निघून जातात... असं का होतं?

तुम्ही आपल्या जवळपास असलेल्या लोकांकडून प्रेमाची मागणी करता आणि ते सरळ सळसळणाऱ्या हवेबरोबर तुमच्या जवळून निघून जातात... असं का होतं? प्रेमावाचून तुम्ही एक शुष्क, वठलेलं झाड होऊन जाता...

असं का होतं? तुम्हाला एकटेपणी वेड लागायची पाळी येते... असं का होतं प्रेमावाचून तुम्हाला जगणं अशक्य का होतं? प्रेमावाचून तुम्हाला मरून जावंसं का वाटतं? लोक तुम्हाला समजून घेऊ शकत नाहीत...

असं का होतं? असं का होतं...?

– अनीता राकेश

**१६०रु. पोस्टेज २५रु.**

# शल्य

मालती जोशी




**८०रु. पोस्टेज २०रु.**

वातावरण ढगाळ होते. झिमझिम पाऊस पडत होता. कमरेच्या उंचीइतके गवत सगळीकडे पसरले होते. गवतातल्या पायवाटेवरुन एक लांब वेणी घातलेली बाई पळत पळत येत होती. तिच्या मागे एक काळा धिप्पाड माणूस धावत तिला पकडायचा प्रयत्न करत होता. त्याने दोन तीन टांगा टाकून तिला धरले व तिचा गळा आवळला. तिला दोन्ही हातांवर उचलून तो चालू लागला. एका पडक्या घरामागे एक विहीर होती. तिथे तो गेला व त्याने तिला विहिरीत फेकले. त्याचा 'धप्प' असा मोठा आवाज झाला व त्याचवेळी वीज कडाडली.

अभिजितला एकदम जाग आली.

का हे स्वप्न आपल्याला वारंवार पडते आहे? आपला काय संबंध आहे ह्या सर्वांशी?

काही काही स्वप्नांना अर्थ असतो म्हणतात. या स्वप्नाचा काय अर्थ असेल? काही स्वप्न सूचक असतात. भविष्यात घडणाऱ्या गोष्टी हे स्वप्न दर्शवतात. असे काही सूचक हे स्वप्न आहे की काय?

# विशेष वार्ता

*** दमाणी साहित्य पुरस्कार**

आजच्या साहित्य क्षेत्रातील वाचनसंस्कृतीत विलक्षण परिवर्तन होत असून, स्वप्नरंजनाऐवजी वास्तववादी आणि अनुभवकथनात्मक साहित्य वाचण्याची रुची वाढत आहे. अलीकडच्या काळात वास्तववादी साहित्य येत असल्यामुळे ग्रंथसंस्कृती अधिक शुद्ध होत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक डॉ.द.भि. कुलकर्णी यांनी केले.

यंदाचे दमाणी साहित्य पुरस्कार डॉ. वि. ना. श्रीखंडे (मुंबई), डॉ. किशोर सानप (वर्धा) आणि आशा दस्तगीर आपराद (कोल्हापूर) यांच्या साहित्यकृतींना डॉ.द.भि. कुलकर्णी व ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी यांच्या हस्ते देण्यात आले. प्रत्येकी २५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. आशा आपराद यांच्या 'भोगले जे दु:ख त्याला...' (आत्मचरित्र), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, डॉ. वि. ना. श्रीखंडे यांच्या '... आणि दोन हात'(अनुभवकथन), पॉप्युलर प्रकाशन मुंबई; आणि डॉ. किशोर सानप यांचा 'समग्र तुकाराम दर्शन' (समीक्षा), विजय प्रकाशन नागपूर या साहित्यकृतींना पुरस्कार देण्यात आले.



डॉ.द.भि. कुलकर्णी व ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी यांच्या हस्ते भैरुरतन दमाणी साहित्य पुरस्कार स्वीकारताना आशा आपराद.

### * ना. ह. आपटे, ना. के. बेहेरे पुरस्कार

'सध्याच्या काळात वाचनसंस्कृती कमी होत आहे. ज्ञानयुक्त कर्म व्हायला हवे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सांगितल्याप्रमाणे नुसता वाचक नव्हे तर ज्ञानी वाचक निर्माण होणे गरजेचे आहे,' अशी अपेक्षा डॉ. अरविंद गोडबोले यांनी पुणे मराठी ग्रंथालयाच्या वतीने आयोजित कै. ना. ह. आपटे व कै. ना. के. बेहरे स्मरणार्थ पुरस्कार वितरण समारंभात व्यक्त केली

या वेळी चित्रा वाळिंबे यांना त्यांच्या 'माय फॅमिली इज ऑल आय हॅव' या पुस्तकासाठी कै. आपटे पुरस्कार देण्यात आला तर डॉ. श्रीरंग गोडबोले यांना 'बौद्ध-मुस्लिम संबंध' या पुस्तकासाठी कै. बेहरे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप ५ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह होते. या वेळी संस्थेचे अध्यक्ष मोहन दाते, कार्याध्यक्ष मुकुंद अनगळ, कार्यवाह प्रा. चारुदत्त निमकर उपस्थित होते.

गोडबोले म्हणाले, 'प्रत्येक अभ्यासासाठी वैचारिक बैठक घडावी लागते. आज ती कमी होत आहे. अनेक चांगल्या इंग्रजी, बंगाली पुस्तकांचे मराठीत अनुवाद व्हायला हवेत. मराठी ग्रंथही अनेक भाषांमध्ये अनुवादित झाले पाहिजेत तरच सांस्कृतिक चळवळ निर्माण होऊ शकेल.' ग्रंथालयाने शुद्धलेखनाचे वर्ग, संदर्भसूची वर्ग चालवावेत, अशी सूचनाही त्यांनी केली.



डॉ. अरविंद गोडबोले यांच्या हस्ते
पुरस्कार स्वीकारताना चित्रा वाळिंबे

### ∗ ‘आसूड’कथासंग्रहास भि.ग.रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार

भि.ग.रोहमारे ट्रस्टतर्फे १९८९ पासून महाराष्ट्र पातळीवर ग्रामीण साहित्यातील कवितासंग्रह, कादंबरी, कथासंग्रह व समीक्षा या साहित्यप्रकारातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांना पुरस्कार देण्यात येतात. यावर्षी २००८ या वर्षातील पुढील ग्रंथांना हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

१. भूवैकुंठ - किशोर सानप (वर्धा) (कादंबरी - साकेत प्रकाशन,औ.बाद)

२. आसूड - अशोक कोळी (जामनेर) (कथासंग्रह - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे)

३. अ) हिसाळा-मुरहारी कराड (पार) (कवितासंग्रह-मुक्तरंग प्रकाशन-लातूर)

ब)पोटमारा-बबन शिंदे (पात्रा) (कवितासंग्रह-राजमुद्रा प्रकाशन - परभणी)

४. ग्रामीण साहित्य: आस्वाद आणि आकलन - महेश खरात(औरंगाबाद)
(सा.समीक्षा कैलास पब्लिकेशन - औरंगाबाद)


प्रत्येकी रोख रुपये २१०१/- स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



नारायण सुमंत यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना अशोक कोळी
सोबत अशोकराव रोहमारे व यशवंतराव गडाख

**नवे कोरे**

# मॅन इंटरप्टेड





**जेम्स बेली**
अनु. विदुला टोकेकर

१८०रु. पोस्टेज २५रु.

जेम्स बेली हा विचित्र आणि खचवून टाकणाऱ्या ऑब्सेसिव्ह कंपल्सिव्ह डिसऑर्डरने (ओसीडी) ग्रासला होता. मनावर परिणाम करणारी औषधं आपल्या शरीरात जातील आणि आपल्यावर ताबा मिळवतील, या भीतीने तो पछाडला होता. भीतिदायक प्रश्नांचा त्याच्यावर नेहमी पगडा बसलेला असायचा– लोक त्याच्या अन्नात काहीतरी मिसळतील का? मारिजुआनाच्या पानांच्या फोटोला हात लावला तर नशा चढेल का? अमेरिकेतील एका विशेष रुग्णालयात त्याच्यावरच्या उपचार-कार्यक्रमामध्ये तो आपल्या सर्व भयानक दु:स्वप्नांना सामोरा गेला. त्याने स्थानिक भणंगांमध्ये मिसळावं, त्यांच्याशी हस्तांदोलन करावं आणि 'त्यांनी जे काय घेतलं आहे ते स्पर्शामार्फत आपल्या शरीरात जाईल' या भीतीवर मात करावी, असं त्याला सांगण्यात आलं होतं. हे कथन म्हणजे बेलीच्या अजिंक्य चैतन्याचा आविष्कार आहे. तो स्वत: ज्या अतर्क्य प्रसंगांत होता, त्यातली विसंगती आता सांगू शकतो आहे. मिश्कील विनोदबुद्धी आणि त्याच्या जोडीला असलेली मन:शक्ती यांमुळेच त्याला बरं व्हायला आणि पुन्हा एकदा जगाला सामोरं जायला बळ मिळालं आहे.

# पुस्तक परिचय



**"प्रेम एकावरच असेल तर ते लग्न.
एकापेक्षा अधिक जणांवर प्रेम असेल तर
तो व्यभिचार म्हणायचा का?"**

# अनादि-अनंत




**आद्य रंगाचार्य (श्रीरंग)**

अनु. उषा देसाई । अविनाश देसाई

अनंतमूर्ती, भैरप्पा, शिवराम कारंत या कन्नड लेखकांच्या अनेक कलाकृती मराठीत आल्या आहेत. त्या लोकप्रियही झाल्या आहेत. आता कर्नाटकातील एक नामवंत नाटककार आणि कादंबरीकार आद्य रंगाचार्य यांच्या कादंबऱ्यांचाही आस्वाद घेण्याची संधी मराठी वाचकांना प्राप्त होत आहे.

आद्य रंगाचार्य यांची विश्वामित्राची सृष्टी ही पहिली कादंबरी १९३४ साली प्रसिद्ध झाली. त्यांनतर पुरुषार्थ, कुमारसंभव, प्रकृतिपुरुष, अनादि-अनंत वगैरे आठदहा कादंबऱ्याही त्यांनी लिहिल्या. या प्रत्येक कादंबरीत वेगवेगळी शैली आणि वेगवेगळे तंत्र वापरण्याचे कौशल्य त्यांनी दाखवले आहे.

अनादि-अनंत ही त्यांची आठवी कादंबरी. १९५१मध्ये तिचा पूर्वार्ध प्रसिद्ध झाला. त्यावेळी तिच्याविषयी अभिप्राय देताना समीक्षकांनी 'अश्लीलतेकडे न झुकता स्त्री-पुरुष समस्यांची चर्चा करण्यात यशस्वी झालेली कादंबरी' असे मत व्यक्त केले. स्त्रीपुरुष संबंधांची सर्वंकष चर्चा करण्याचा उद्देश आद्य रंगाचार्यांना या कादंबरीद्वारे अभिप्रेत होता. ''या कादंबरीत पात्रांचे, पात्रांच्या अंतरंगाचे चित्रण केल्याने तिची शैली वेगळीच आहे'' असा त्यांना अभिमान होता आणि आपण नाटककार असल्याने ही शैली सुलभ, सहज आणि परिणामकारक उतरली आहे अशीही त्यांची मनोमन भावना होती. त्याचबरोबर आपले लेखन हे सामान्य म्हणजे सर्व दृष्टींनी खालच्या स्तरातील जनसमुदायाला समजावे असा डांगोरा पिटून स्वत:ला असामान्य समजणाऱ्या लेखकांच्या वर्गातले आपण नसून, वाचक हा वाचता वाचता प्रगल्भ आणि 'परिणतमती' होत जातो आणि त्यामुळे साहित्याद्वारे संस्कृतीला तसेच प्रगतीला चालना मिळते असा त्यांचा ठाम विश्वास होता. ''लिहिता लिहिता आपला अनुभव वाढत गेला, तंत्रकौशल्य विकसित होत गेले, शैलीत वैविध्य येत गेले.'' असे ते प्रतिपादन करतात. सवंग लोकप्रियतेला बळी न पडता अभिजनांसाठी लेखन करण्याचा आपला पिंड आहे असा अभिमानही त्यांना आपले वेगळेपण, आपली अस्मिता जपण्यास उपकारक ठरतो. कानडी साहित्यकारांमध्ये त्याचमुळे त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले. 'पद्मभूषण'ने त्यांना गौरविण्यात आले. म्हैसूर कर्नाटक विद्यापीठाने त्यांना मानद डी लिट पदवी दिली. साहित्य अकादमीने ॲवार्ड देऊन त्यांच्या योगदानाचे मोठेपण अधोरेखित केले. भारतातील प्रायोगिक रंगभूमीला समृद्धी आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या नाट्यकर्मीमध्ये त्यांची गणना व्हावी हे स्वाभाविकच आहे.

त्यांच्या कन्या डॉ. उषा देसाई भाभा अणुऊर्जा केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. त्यांनी आपल्या वडिलांच्या नाटकांच्या आणि कादंबऱ्यांच्या इंग्लिश आणि मराठी अनुवादाला वाहून घेतले आहे. निवृत्तीनंतर त्यांनी रंगाचार्यांच्या १५ नाटकांचे आणि तीन कादंबऱ्यांचे अनुवाद पूर्ण केले आहेत. त्यांचे यजमान डॉ. अविनाश

देसाई यांचेही सहकार्यही त्यांना मिळाले आहे.

'अनादि-अनंत' ही आद्य रंगाचार्यांची आठवी कादंबरी. 'अनादि' हा तिचा पूर्वार्ध १९५१ साली प्रसिद्ध झाला. 'अनंत' हा उत्तरार्ध त्यानंतर दहा वर्षांनी प्रसिद्ध झाला. म्हणजे या कादंबरीच्या लेखनाला पन्नासावर वर्षे उलटून गेली. तरीही या कादंबरीत दाखवलेला प्रेमाचा त्रिकोण आणि त्याचा मानसिक-भावनिक तणाव आजही आपल्याला अंतर्मुख करणारा वाटेल. या कादंबरीत जे प्रश्न उभे केले गेले आहेत ते आजही कालबाह्य झालेले आहेत असे म्हणता येणार नाही. आद्य रंगाचार्यांनी साठ वर्षांपूर्वी स्त्री-पुरुष नात्याबद्दल जेवढ्या मोकळेपणाने व उघडपणाने लिहिले आहे ते त्यावेळच्या वाचकांना निश्चितच बोल्ड आणि धक्कादायक वाटले असणार.

''त्याला नक्की आठवतंय. कुमुदकडे शुद्ध मैत्रीच्या नजरेनं बघितलं होतं. संभोगाची स्त्री म्हणून नाही.''(६४)

''सरला त्यांची स्फूर्तिदेवता. तर कुमुद काय फक्त संभोगवस्तू? छी: छी: किती हीन हा विचार! पण हे खरं नसेल तर?'' (१६)

''प्रेम करण्यासाठीच जन्माला घातलेल्या स्त्रीनं प्रेम केलं तर त्यात पाप कसलं?'' (१४)

''पुरुषांना प्रेम आणि व्यभिचार हे निराळे वाटत नसतील हे माझ्यासारख्या स्त्रीला कसं समजायचं?''(१४)

''प्रेम एकावरच असेल तर ते लग्न. एकापेक्षा अधिक जणांवर प्रेम असेल तर तो व्यभिचार नाही? व्यभिचार म्हणजे पाप नाही?'' (१४)

''कामतृप्तीसाठी कोणीही स्त्री पुरेशी आहे पण निसर्ग तृप्तीसाठी प्रेमानं लग्न केलेली बाईच पाहिजे. प्रीतीचा आणि कामतृप्तीचा परस्पर संबंध नाही... शरीरसंबंध म्हणजे निसर्गानं पतिपत्नीवर लादलेली एक जबाबदारी. एका खास उद्देशानं लादलेली जबाबदारी. हा उद्देश समजला तर शरीरसंबंध हा सहज धर्म ठरतो. निसर्गाला ही सृष्टी चालवायची आहे. सृष्टी ही चिरंतन युवती. तिला मरण नाही.''(१३१)

''हृदयं एक झाली नसताना शरीरांना एकत्र आणणं हीच खरी वेश्यावृत्ती. लग्न झालं तरी वेश्यावृत्तीच?'' (१५२)

''ती रामण्णाची प्रथम कामतृप्तीची स्त्री होती. नंतर लग्नाची पत्नी... लग्न झालं नसतं तर समाजानं तिला बहिष्कृत केलं असतं.'' (१५२)

''पुरुषाचं कामजीवन रात्रीच्या चोरीसारखं. केलेलं लपवता येण्यासारखं. बायकांचं कामजीवन भर दिवसाच्या चोरीसारखं. केलेलं लपवणं शक्य नसलेलं.'' (१५५),

''इच्छिलेल्या बाईवर तात्पुरतं प्रेम करायचं ही नर प्राण्याची नैसर्गिक प्रवृत्ती तर मातृत्व प्राप्त झाल्यावर नराला संपूर्ण विसरायचं ही स्त्री प्राण्याची नैसर्गिक प्रवृत्ती...'' (१५७) यासारखी मार्मिक, विचारप्रवर्तक सूत्रे कादंबरीभर विखुरलेली आहेत. स्त्री-

पुरुष, पतिपत्नी, कामतृप्ती आणि प्रेम... याबद्दलचे वेगवेगळे दृष्टिकोन आणि युक्तिवाद त्याद्वारे समोर येतात.

या कादंबरीचे कथासूत्र तसे साधे सोपे आहे. निवेदनात मात्र या कथासूत्राचे वेगवेगळे टप्पे मागेपुढे करून त्यांची सरमिसळ केली आहे. पन्नासच्या दशकात आधुनिकोत्तर तंत्रातला तुटकेपणा आद्य रंगाचार्यांनी वापरावा हा प्रयोगशील नावीन्याचाच भाग म्हणायला हवा.

कादंबरीचा नायकरामण्णा हा साहित्यिक. कादंबरीकार. वक्ता. तिशीतला.

सरला ही त्याची पत्नी. नवऱ्याच्या लेखनात रस घेणारी. कथाकादंबऱ्यांतील पात्रांबद्दल चर्चा करणारी. त्या कथावस्तूतले कच्चे दुवे सहज दाखवू शकणारी. नवऱ्याचे साहित्यक्षेत्रातले कर्तृत्व बहरत जावे म्हणून त्याला लेखनासाठी पूर्णतया वेळ देणारी. प्रापंचिक जबाबदाऱ्यांपासून दूर ठेवणारी.

लग्नाला दहा वर्षे होऊनही घरात मूल बागडत नाही याची तिला खंत आहे. तशात तिला आजारपणामुळे अंथरुणाला खिळून राहणे भाग पडते.

आपण या आजारपणातून बरे होणार नाही, पाचसात वर्षे आणखी फार तर जगू, परंतु आपल्याला मूल मात्र होऊ शकणार नाही याची स्पष्ट जाणीव तिला आहे.

त्यासाठी ती आपल्या मावशीची बारा वर्षे वयाची मुलगी कुमुद हिला आपल्या घरी घेऊन येते. मावशीचे निधन झाल्याने कुमुदला सांभाळणारे कोणी नाही असे सरला नवऱ्याला सांगते. कुमुद हळूहळू घरकामात तयार होते. सरलाचे आजारपण चालूच असते. रामण्णा लेखन करताना आपल्या खोलीचे दार बंद करतो, दार बंद असले की त्याला डिस्टर्ब करायचे नाही हेही सरला कुमुदला प्रारंभीच बजावून ठेवते. ''पुस्तक लिहून झालं. या पुस्तकामुळं आपलं सगळं जीवन बदलून जाणार. तू वाचून बघशील तर तुला पटेल. तुझा नवरा प्रसिद्ध साहित्यिक आजपासून बघ.'' रामण्णा म्हणत असतो. पत्नीला तो आपली स्फूर्ती देवता मानत असतो. पाच वर्षे जातात.

सरलाची तब्येत दिवसेंदिवस बिघडत जाते. कुमुद सतरा वर्षांची होते. नवतारुण्याने मुसमुसते. सरला रामण्णाला म्हणते, ''आता माझे काही खरे नाही. घर कसं मुलांनी गजबजत राह्यला हवं. पण माझ्या नशिबात मूल नाही. तुम्ही दुसरं लग्न करा... माझ्या डोळ्यादेखत...''

कुमुदला ती घरकामाचे धडे देत असते. ''माझ्यापेक्षा छान बघतेस तू हे घर.'' असे प्रशस्तिपत्रही ती अधूनमधून कुमुदला देत असते. ''माझा आजार बरा होण्यापैकी नाही. हे घर चालवणार कोण मी गेल्यावर?'' असेही ती म्हणत राहते.

रामण्णाला ती सांगते, ''इतकी वर्षं कुमुद घरात आहे. दुसरं कोण आहे तिला? तुम्ही तिच्याशी जमवून घ्यायला नको का? ती दिवसभर काम करत असते. वेळ जात नाही म्हणून जास्त काम करते. तिला कधीतरी बाहेर न्यायला नको? सिनेमा

दाखवायला नको?... न्या की तिला सिनेमाला.''

रामण्णा मग तिच्या सांगण्यावरून कुमुदला इंग्लिश पिक्चरला घेऊन जातो. त्या सिनेमाची कथा सरला कुमुदला विचारते.

एक दांपत्य. नवराबायकोचं एकमेकांवर प्रेम. पण एकदा नवरा एका चटकचांदणीच्या मोहात पडतो. बायकोला आणि आठ वर्षांच्या मुलाला घराबाहेर काढतो. पण बायको त्याच्यावर जीव टाकते. ती चटकचांदणी एक दिवस सगळं घर लुटून पळ काढते. तो आत्महत्या करायला जातो. तर त्याची बायको त्याला जवळ घेते. सुखान्त शेवट होतो.

सरला ती कथा ऐकून म्हणते, ''हे बघ कुमुद. या सिनेमातल्या गोष्टीप्रमाणे बायकांना नवरा आणि मुलं सोडून दुसरं काहीही सुख नसतं. बाईचं आतडं हे नेहमी आईचं आतडं असतं. नवरा कितीही गर्व करो, कठीण प्रसंगी त्याचा हात धरून पत्नीच सांत्वन करते. तसं यांनी कितीतरी कथांमध्ये लिहिलं आहे. लग्नाचा पती नसून मुलं असतील तर सुख नाही. मुलं नसून पतीच असेल तरी सुख नाही. मुलंही आहेत, पतीही आहे पण लग्नसंबंध नसतील तरी सुख नाही. किती परतंत्र जीवन बायकांचं आणि किती अवघड!''

तब्येत जरा अधिक बिघडल्यावर सरला रामण्णाला म्हणते, ''बिछान्यात पडल्या पडल्या घर कसं खायला उठतंय... माझ्याकडून या घराला कसंलही वैभव मिळालं नाही. मिळण्यासारखं नाही. मुलं नाहीत ते घर कसलं? तुम्हाला हात जोडून सांगते. मला जर मरू द्यायचं नसेल तर माझ्या डोळ्यादेखत माझी इच्छा पुरी करा... ह्या घरी मुलं खेळत, बागडत आहेत असं दिसलं तर मी सुखानं डोळे मिटेन.''

रामण्णा तिची ही सूचना धुडकावून लावतो. ''आज जे सुख आहे त्याच्यापेक्षा आणखी काही नकोय मला.'' पण आपण दुसरे लग्न करावे ही तिची इच्छा आहे हे त्याच्या लक्षात येते.

सरला कुमुदलाही तसे सुचवते. ''मरायच्या आधी काही चांगलं करता आलं तर... तुझं लग्न लावून दिलं म्हणजे मी मरायला मोकळी!''

कुमुद हात जोडून म्हणते, ''अक्का, तू बरी होत नाहीस तोपर्यंत असले विचार मनात आणू नकोस. मी त्याला संमती देणार नाही... माझी शपथ आहे ही गोष्ट पुढे रेटलीस तर!''

सरला त्यावर ''मी त्यांनाच सांगते तुझ्याशी बोलायला'' असे उत्तर देते. रामण्णाबरोबर कुमुदचे लग्न लावून देण्यासाठी सरला उतावीळ आहे. घरात मूल बाळ हसणं ही तिची सुखाची कल्पना.

'आपण आणि रामण्णा सिनेमाला चाललोय... आपली मुलं घरात खेळत आहेत. जवळच सरला हसऱ्या चेहऱ्यानं मुलांकडं पाहतेय. आपल्या जन्माचं आता

सार्थक झालंय. ह्यापुढं दोघं सिनेमाला जा किंवा विलायतेला जा. माझं आपलं हेच घर' असं एक चित्र कुमुदच्या डोळ्यांपुढे उभे राहते.

रामण्णालाही सरला या विषयावर पुन: पुन्हा छेडते.

रामण्णा कुमुदकडे शुद्ध मैत्रीच्या नजरेने पाहत होता, केवळ कामपूर्तीचे साधन म्हणून नाही. पण कुमुद आपल्यावर प्रेम करते आहे हेही त्याला जाणवते. एका मोहाच्या क्षणी तो तिच्या निकट जातोच... सरलेची दुसऱ्या लग्नाची सूचना कुमुदच्याच संदर्भात आहे अशीही त्याला खात्री वाटते. कुमुदलाही वाटते की ती "रामण्णाची वस्तू आहे. लग्न होवो न होवो, ही वस्तू पूर्णपणे रामण्णाचीच. रामण्णाच्या मालकीची!" आरशातल्या आपल्या प्रतिबिंबाला ती वारंवार बजावू पाहते. "एका प्रकारच्या यज्ञात आपल्या देहाची आहुती दिली गेली आहे आणि त्यामुळे आपल्या देहाला आनंद झाला... आपल्या देहाबद्दल आरंभी अभिमान, नंतर आनंद आणि शेवटी दया आणि वात्सल्य वाढू लागलं." असा तिला भास होतो. देहाचा झटपट शृंगार करून आहुती त्वरेनं देण्याचा निर्धार करून ती रामण्णाकडे जाते... पण "हे काय? इथं कशाला आलीस?" हे रामण्णाचे उद्‌गार ऐकून तिचा आवेग ओसरतो, तिचे वेड गायब होते आणि ती आपल्या खोलीत निघून जाते. रामण्णाचं मन पत्नीत गुंतलेले. कुमुदवर आपण प्रेम करतोय का हे त्यालाच कळत नाही. कुमुद आपल्यावर एकतर्फी प्रेम करतेय हे मात्र त्याला स्पष्ट दिसत असते. प्रीतीवाचून शरीरसंबंध म्हणजे व्यभिचार. आपण इतके कामुक आहोत का? आपण आपल्या नकळत कुमुदवर प्रेम करतोय का? स्वत:वर काबू ठेवता येत नाही, खात्री वाटत नाही; मात्र कुमुदबद्दल जराही संशय नाही अशी अपराधाची जाणीव त्याला होत राहते. आपण प्रेम करणं आणि आपल्यावर दुसऱ्यानं प्रेम करणं ह्या दोन गोष्टीत फरक आहे हे त्याला जाणवते. कुमुद शरीरानं जवळ नसून मनात भरून राहिली आहे हे कळून आल्यावर तो हताश होतो. ती त्याच्यावर प्रेम करतेय. तिच्या तिरस्काराची भीती नाही. एक वेळ देहाची भूक तृप्त केली तर काय बिघडतंय? ती कुठं लग्नाचा आग्रह धरतेय? मग भीती कशाला? असा धीर तो स्वत:ला देऊ पाहतो. "सरला गेल्यावर तर..." असा पर्यायी विचार मनात आल्यावर तो स्वत:चीच निर्भत्सना करतो. कुमुदकडे जाऊन पश्चात्ताप व्यक्त करतो. कुमुद त्याला बजावते, "अक्का जिवंत असेपर्यंत माझ्याकडे यायचे नाही. करू शकाल हे?"

तो म्हणतो, "मन तुझ्याजवळ हरवलंय. प्रयत्न करूनही तुझ्यावाचून जगणं अशक्य. तूच बघतेस."

"मला काय माहीत तुमच्या मनानं कबूल केलंय ते. मला वाटलं फक्त तुमच्या शरीराची चटक आहे ती!... मी बोलून चालून तुमच्या व्यसनाचं खेळणं" असे म्हणून कुमुद दूर जाते.

सरलाची तब्येत फारच बिघडते तेव्हा ती रामण्णाला म्हणते, ''मरायला आलेल्या पत्नीची अखेरची इच्छा... मृत्यू जवळ आलाय म्हणून अधिकारानं सांगतेय. दुसरं लग्न... कुमुदशी लग्न. कुमुदशीच लग्न करा... किती वेळा सांगायचा प्रयत्न केला मी आजवर... पण माझं कधी पूर्ण ऐकलं नाही.''

रामण्णा विचार करून सांगतो म्हणून वेळकाढूपणा करू पाहतो तेव्हा सरला म्हणते, ''तुम्ही सांगेस्तोवर जगेन की नाही... कुणास ठाऊक.''

दुसऱ्याच दिवशी पहाटे तिचे प्राणोत्क्रमण होते.

त्यानंतर रामण्णाच्या मनात पुन्हा संदेह निर्माण होतो.

''सरला, तुला वाचवण्यासाठी दुसऱ्या लग्नाला मी कबूल झालो होतो. पण आता त्याची गरज नाही. ते झालं नाही म्हणून तू जीव सोडलास हे मी कधी विसरणार नाही. तुझ्या आहुतीला कारणीभूत असणाऱ्या कुमुदला मी या घरात राहू देणार नाही.'' (८३)

त्याचवेळी कुमुद रामण्णाला एक महत्त्वाची बातमी देते.

''तुम्हाला आनंदाची बातमी सांगायची म्हणून मी आलेय... मी आई होणार असं दिसतंय.''

रामण्णा अनिश्चित स्वरात म्हणतो, ''सरलाची शेवटची इच्छा पुरी करणं आता भाग आहे.''

दोन महिन्यांनी कुमुद-रामण्णा यांचे लग्न होते. अक्काची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी कुमुद तर पत्नीची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी रामण्णा हे दोघे विवाहाला तयार झाले म्हणून सर्वजण त्यांच्या निष्ठेची प्रशंसा करतात.

या घटनेनंतर दहा वर्षांचा कालावधी उलटतो, तेव्हा या कादंबरीचा उत्तरार्ध सुरू होतो. या दहा वर्षातल्या घटना फ्लॅशबॅक तंत्राने एकापुढे एक उलगडत जातात. कुमुदच्या पोटी मुलगा मोहन जन्माला येतो. लग्नाच्या पहिल्या वाढदिवशीच त्याचाही जन्मदिवस साजरा केला जातो. त्याची आठवण म्हणून रामण्णा कुमुदला एक घड्याळ भेट देतो... या दहा वर्षांत रामण्णाला एक साहित्यकार म्हणून चांगलीच मानमान्यता मिळते. त्याचा भव्य सत्कार करण्याचे ठरते. त्या कार्यक्रमाला पत्नी कुमुद आणि सुपुत्र मोहन यांच्यासह जाण्याची तयारी चालू असते. त्यांना घेण्यासाठी सत्कार समारंभाचे आयोजक येणार असतात. ते येण्यास एक तास असतो. त्यांची वाट बघता बघता गत दशकातील रामण्णा-कुमुदच्या जीवनातील वेगवेगळ्या घटनांची स्मृतिचित्रे त्यांच्यासमोर उभी राहतात... ''शंभर जन्मात एकदाच मिळते अशी पत्नी'' म्हणून सरलाची प्रतिमा या काळात प्रतिष्ठित होते. ''तिनं डोळ्यांनी हे लग्न बघितलं नाही ही हळहळ व्यर्थच; कारण कुठंही असली तरी ती तुला बघत राहणारच.'' असे रामण्णाचे मित्र त्याला म्हणत...

लग्न झाल्यादिवशीच कुमुदची प्रेमकहाणी संपते. लग्न झाले, आता समाजाची भीती नाही हे समाधान तिला लाभत नाही. प्रेमावाचून लग्नाच्या व्यभिचाराचं बाळंतपण म्हणून कुमुद आपल्या पोटात वाढणाऱ्या गर्भाचा द्वेष करू लागते... लग्नानंतर एक महिन्यातच ती बाळंतपणासाठी आपल्या आत्याच्या घरी जाऊन राहते... रामण्णा तिच्या समाचारासाठी येतो. प्रसूतीपर्यंत कुमुदने आत्येकडे राहावे हे मान्य करतो. पण कुमुद आणखी एक गोष्ट त्याच्याकडून कबूल करून घेते. ''परत त्याच्याकडे आल्यावर त्याने तिच्यावर दांपत्य सुखाचा अधिकार गाजवू नये...'' तो ही गोष्ट मान्य करतो. कारण सरलाची मूर्ती नाहीशी होत नाही तोवर कुमुदवर प्रेम आहे असे सांगण्याचे धैर्य त्याच्यात नसते. तो राजीखुशीने सक्तीचे ब्रह्मचर्य पाळायला तयार होतो. पाळतो. मुलाचे कोडकौतुक करतो.

स्त्री-पुरुष नात्यातले अनेक ताणतणाव या उत्तरार्धात समोर येतात. कुमुद आणि रामण्णा दोघेही आपल्या आयुष्यावर पडलेले सरलाचे सावट क्षणमात्रही दूर करू शकत नाहीत. प्रेम आणि शारीरिक आकर्षण यांचा गुंता सोडवू शकत नाहीत.

मोहनची वाट पाहता पाहता एक तास उलटतो. मोहनला घेऊन काही लोक येतात. घरापर्यंत आणलेला मोहनचा देह घरात न्यायचा की नाही अशा संभ्रमात लोक दाराशीच थांबवतात...

हा शेवट काहीसा अनपेक्षित वाटतो. रामण्णा-कुमुद यांच्या सहजीवनातला दुवा म्हणजे मोहन. तोच नसल्यावर पुढे काय असा प्रश्न वाचकांना पडतो.

आद्य रंगाचार्यांची ही कादंबरी वाचून संपल्यावर देखील वाचकाच्या मनात ठाण मांडून बसते. शरीराची ओढ आणि प्रेमाची भावना यांच्यातील संघर्ष ती उभा करते. कर्तव्य भावनेने जगताना मनाचे गुदमरलेपण, घुसमटलेपण अवघ्या आयुष्याला झाकोळून टाकते... हे द्वंद्व रंगवताना आद्य रंगाचार्यांनी अनेक सूक्ष्म, तरल छटा दाखवल्या आहेत. त्या आपली मती गुंग करतात.


**किंमत : १२०रु.   सभासदांना : सवलतीत   पोस्टेज : २५रु.**

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**Email : info@mehtapublishinghouse.com**

आपले **E-mail ID** 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वरील **E-mail ID** वर कळवा.

# पुस्तक परिचय



## मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देणारी नावीन्यपूर्ण वैज्ञानिक खेळणी

# खेळणी विज्ञानाची




**डी.एस. इटोकर**

बुलडाणा जिल्ह्यातील चिखली येथील श्री शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयातील चित्रकला शिक्षक डी. एस. इटोकर यांनी वैज्ञानिक आणि शैक्षणिक उपकरणे तयार करण्याचा छंद जोपासला असून कळसूत्री बाहुल्यांचा खेळ, पटकथा लेखन, कार्यानुभव, कृतिसंशोधन वगैरे वेगवेगळ्या विषयांचे प्रशिक्षण घेऊन अध्यापनाचे कार्य बहुआयामी पद्धतीने करण्याबाबत लौकिक संपादन केला आहे. आपल्या आसपास सहज मिळणाऱ्या वस्तूंचा वापर करून विज्ञानाची मूलतत्त्वे समजावून देणारी साधने व खेळणी निर्माण करून विज्ञानशिक्षण रंजक व्हावे या दृष्टीनेही ते प्रयोग करीत असतात. वाचनातून विज्ञान, छंदांतून विज्ञान, फक्त खेळण्यांसाठी, खेळणीच खेळणी, विज्ञान शब्दसंग्रह वगैरे त्यांची पुस्तके विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकांनाही उपयुक्त ठरली आहेत. त्यातील काहींनी विविध पुरस्कारही पटकावले आहेत.

'वैज्ञानिक खेळणी' हे त्यांचे नवे पुस्तकही विज्ञानातील अनेक कल्पना हसत खेळत समजावून देणारे आहे.

तसे विज्ञानाधिष्ठित काही खेळ मुले लहानपणी खेळत असतातच; पण आपल्या या खेळामागे विज्ञानातील सिद्धान्त कार्यरत आहेत हे मुलांना ठाऊक नसते. उदाहरणार्थ, कागदाची नाव करून पाण्यावर सोडणे, कागदाची भिंगरी करून हवेत धरणे, पतंग उडवणे, साबणाच्या पाण्याचे फुगे करणे, इत्यादी. या प्रत्येक कृतीमागे काहीतरी शास्त्रीय सूत्र असते. दुर्दैवाने आपल्या प्राथमिक वा माध्यमिक शाळांमध्ये प्रयोगशाळांमध्ये प्रयोग करण्याची संधी मुलांना फारशी मिळत नाही, त्यामुळे विज्ञानातील सूत्रे केवळ तोंडपाठ करूनच लक्षात ठेवावी लागतात. त्यांचा वापर करून विज्ञानातील संकल्पनांचा व्यवहारात कसा उपयोग होतो हे स्वत:ला पडताळून बघता येत नाही. स्वत: तशी खेळणी करून ती सूत्रे समजावून घेणे ही गोष्ट अशक्यप्रायच!

इटोकर यांनी पाणी, हवा, ध्वनी, प्रकाश, चुंबकत्व, विद्युत यांच्याशी संबंधित काही सोपी उपकरणे तयार करून त्यामागची शास्त्रीय कारणे स्पष्ट केली आहेत.

पाण्यातील जेली फिश, जलदाब यंत्र, पाण्यावर पळणारी बोट, पाण्यात तरंगणारा मासा, वासुदेवाचा पेला, पाण्यातील बाहुली, पाण तराजू, पाण्यावर चालणारे कीटक, पाण्याचा गोल फवारा, मोठे होणारे बुडबुडे, सुरक्षित सायफन वगैरे खेळ पाण्याशी संबंधित आहेत.

उडणारी तोफ, हेलिकॉप्टर, बाटलीतले केळ, बरणीतील कारंजे, सौर ऊर्जेवर फिरणारी भिंगरी, आर्द्रतामापक वगैरे खेळ हवेशी संबंधित आहेत.

ध्वनीपेटी, नळ्यांचे झुंबर, ध्वनीचा प्रवास, सरबताच्या रिकाम्या बाटलीत पाणी


भरून तिच्यातील नळीत फुंकर मारून वेगवेगळे आवाज काढणारे वाद्य वगैरे खेळ ध्वनीशी संबंधित आहेत.

रॉकेलचा टॉर्च, पिंजऱ्यातील पोपट, चंद्राच्या कला, उदबत्तीची ज्योत वर्तुळाकार दिसणे, एकाच वेळी प्रकाश परावर्तनामुळे विष्णू आणि शंकर यांच्या प्रतिमा आलटून पालटून दिसणे हे खेळ प्रकाशाशी संबंधित आहेत.

चुंबकाच्या मदतीने पळणारी गाडी, डोलणारे कार्टून, खेळणारी बाहुली, लोखंड जमा करणारी गाडी वगैरे खेळ खेळता येतात.

वीज वापरून उड्या मारणारे बेडूक, उड्या मारणारे मणी, उड्या मारणारा फुगा, घिरट्या घालणारी मधमाशी, दिव्याची उघडझाप वगैरे करामती करून मित्रमंडळींना थक्क करता येते.

साबणाचे बुडबुडे (फुगे) करून त्या फुग्यांना घर्षण विद्युतच्या सहाय्याने नाचवणे हा खेळ नमुना म्हणून करून बघायला हरकत नाही.




एक वाटी, नळी, साबण, थोडीशी साखर आणि एक मोठा कंगवा एवढे साहित्य या खेळासाठी लागते.

एका वाटीत साबणाचा चुरा घ्या. त्यात थोडे पाणी घालून साबणाचा चुरा विरघळू द्या. त्या द्रावणात थोडे पाणी आणि थोडी साखर घाला. (साखरेमुळे फुगे जास्त टिकाऊ बनतात.) दोऱ्याची रिकामी नळी साबणाच्या पाण्यात बुडवून बुडबुडे तयार करा.

एका मोठ्या कंगव्यावर वुलनच्या कपड्याने घासून कंगवा विद्युतभारित करा. या कंगव्यावर नळीच्या सहाय्याने साबणाचे फुगे सोडा. फुगा कंगव्यावर टेकून नंतर वर उडी मारील. पुन्हा कंगव्यावर बसेल; पुन्हा उडी... असा खेळ बऱ्याच वेळा रंगेल.

यामागचे तत्त्व लक्षात घ्या. विद्युतभारित कंगव्यावर प्रथम फुगा बसतो तो कंगव्यावरील विजेमुळे. कंगव्याला स्पर्श झाल्यावर कंगव्यावरील वीज फुग्यावर येते आणि दोन्ही विद्युत सजातीय झाल्यामुळे त्यांच्यात प्रतिकर्षण घडून येते आणि फुगा वर उडतो. वर उडालेल्या फुग्याची विद्युत कमी होते आणि तो कंगव्याकडे खेचला जातो. कंगव्याला टेकल्यावर त्याच्यात पुन्हा वीज संचारते आणि तो वर उडी मारतो. फुग्याची उडी मारण्याची क्रिया पुन:पुन्हा होत राहते. आहे की नाही मज्जा?

प्लॅस्टिकच्या आयताकृती पट्टीचा (तीन चार इंच रुंद व सहा इंच लांब) मध्यबिंदू काढा. तेथे छिंद्र पाडा. त्या छिद्रात बांबूची काडी पक्की बसवा. त्या काडीला खालच्या टोकाला डांबराचा गोल गोळा बसवा. ही पट्टी गरम पाण्यात बुडवली तर ती नरम होते, तिला बाक देऊन हेलिकॉप्टरचा आकार द्या. ही बांबूची काडी दोन हातात घुसळून एकदम झटका देऊन वर सोडा. आपले हेलिकॉप्टर गरगर फिरत वर जाईल. खाली येईल. डांबराच्या गोळीमुळे त्याचा तोल जाणार नाही. ते सरळ वर खाली होत राहील...

अशी अनेक नावीन्यपूर्ण खेळणी करून मुलांना आपल्या कल्पनाशक्तीला वाव देता येईल, जोडीला विज्ञानाच्या सिद्धान्ताचा पडताळाही घेता येईल. दैनंदिन उपयोगाच्या वस्तू वापरून अल्प खर्चात विज्ञानाची खेळणी तयार करण्याची ही कल्पकता सर्वांकडून वाहवा मिळवील.

**किंमत :८०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २०रु.**


## प्रिय वाचकमित्रहो........


आपल्या सोयीसाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन आठवड्याचे सातही दिवस नियमित सुरू राहील.

वेळ– सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०

रविवारी सकाळी १० ते ४


**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**

## पुस्तक परिचय



**मुस्लीम अदान आणि ज्यूधर्मीय ईव्हा या दोन किशोरवयीन मुलांचे अनोखे भावविश्व**

# अदान ॲण्ड ईव्हा




**अयान हिरसी अली । ॲना ग्रे** अनु. उज्ज्वला गोखले

मुसलमान आणि ज्यू धर्मीयांमध्ये परंपरागत वैरभाव आहे. इस्त्राएलच्या स्थापनेने त्या वैरभावाला समकालीन संदर्भ लाभला. सर्व बाजूंनी घेरणाऱ्या अरब राष्ट्रांच्या सर्वंकष विरोधाला तोंड देत इस्त्राएल आपले अस्तित्व टिकवून आहे, त्यासाठी सतत संघर्ष करीत आहे.

मोरोक्कोतील झकाऊर हे मुस्लीम अरब कुटुंब ॲमस्टरडॅमला स्थायिक होते. तसेच ज्यू लिबरमन कुटुंबही ॲमस्टरडॅममध्ये स्थायिक होते.

झकाऊर कुटुंबातील बारा वर्षांचा मुलगा अदान, त्याची मोठी बहीण जमीला यांना तेथील थोरबेक ग्रामर स्कूलमध्ये प्रवेश मिळतो; ॲमस्टरडॅमच्या मध्यवर्ती भागातील उच्चभ्रू लोकांची ही शाळा शैक्षणिक गुणवत्तेसाठी प्रसिद्ध असते. याच शाळेत अदानच्याच वर्गात ईव्हा लिबरमन ही ज्यू मुलगीही असते. अदानची आई ही ईव्हाच्या घरी मोलकरीण म्हणून काम करत असते. ती मुसलमान आहे हे ईव्हाच्या घरी कोणाला ठाऊक नसते. तीदेखील ते उघड करीत नाही.

योगायोगाने अदान आणि ईव्हा या दोघांची मैत्री होते.

आपण मुसलमान आहोत आणि मुसलमान म्हणून कुराण पठण करणे, मदरशाला जाणे, हलाल मांस सोडून इतर मांस न खाणे, नास्तिक मित्रमैत्रिणींना खरा इस्लामचा मार्ग दाखवणे हे बारा वर्षे वयाच्या अजाण अदानच्या मनावर पक्के ठसलेले असते. तर ईव्हा ही ज्यू असल्याने कोशर मांस खाणे, शब्बात पाळणे, वाइन घेणे वगैरे गोष्टी ती गृहीतच धरीत असते. मुसलमान आणि ज्यू या दोन्ही धर्माच्या लोकांत एकमेकांबद्दल काही पूर्वग्रह असल्यामुळे या दोन्हीतील मुलेही एकत्र येणे अवघड असे.

मुसलमान हे चोर असतात, ते खुनी असतात, ते सरकारचे पैसे चोरतात, सर्वसामान्य नागरिकांनाही लुबाडतात, ते घाणेरडे असतात, एकाच थाळीत अनेकजण जेवतात, मुसलमान मुली बुरखा घालतात, बुरखा न घालता पुरुषांसमोर जाणे हे पाप मानतात असे ईव्हाला तिची सावत्र आई ज्युलिया सांगते तर ज्यू लोक हे दुष्ट असतात, राक्षसासारखे भयंकर असतात, मुसलमानांचा तिरस्कार करतात, त्यांना ठार मारू पाहतात. ज्यू लोक रेड वाइन-म्हणजे रक्त पितात, रक्त पिण्यापूर्वी पूजापाठ करतात असे अदानच्या मनावर ठसवले जाते. अदानने काही आगळीक केली तर ज्यू येऊन तुला पळवून नेतील अशी धमकी त्याची आई देत असते. ज्यू लोक मुसलमान मुलांच्या हाडांचा चुरा करून ब्रेडमध्ये घालतात, ब्रेडचे तुकडे प्रसादासारखे वाटतात, असे अदानच्या मनावर बिंबवण्यात आले होते. मुसलमान धर्मात दारू पिणे निषिद्ध आहे हे ईव्हाला ठाऊक नसते.

अदान ईव्हाला सच्चा मुसलमान कसा असतो, हे पटवून देण्यासाठी म्हणतो, ''मुसलमान चोर असतात हे म्हणणे बरोबर नाही. ते साफ खोटे आहे. अल्ला तर

चांगल्या वागणुकीचेच धडे देतो, मोठ्या माणसांना मान देणे, आईवडिलांचे ऐकणे, आजारी व्यक्तीला मदत करणे, कुराण पठण करणे, महमंद पैगंबरांची शिकवण पाळणे, ती शिकवण बरोबरच असते. सच्चा मुसलमान कसा असतो हे मदरसामध्ये शिकवतात. माझ्याबरोबर शनिवारी मदरशात ये. स्वत: बघ म्हणजे तुलाही कळेल.''

अदानला खरे तर मदरसा आवडत नसे. कुराण वाचणे, त्यासाठी अरबी भाषा शिकणे, पाठांतर करणे, हे सर्व त्याला अब्बांचा आग्रह म्हणून करावे लागे.''

शनिवारी ईव्हा अदानबरोबर मदरसामध्ये जाण्यासाठी म्हणून घरी येते तेव्हा अदानची आई, बहीण जमीला जाम घाबरतात. तिला मदरसामध्ये येऊ देतील का असा प्रश्न जमीला अदानला विचारते. तेव्हा अदान चाचरत म्हणतो, ''आपल्या नास्तिक मित्रमैत्रिणींना इस्लामचा खरा मार्ग दाखवावा असे इमाम म्हणत असतात. खरा मुसलमान कसा असतो हे ईव्हाला दाखवावे म्हणून मीच तिला मदरसामध्ये ये असे म्हणालो.'' नास्तिकांना मशिदीत प्रवेश नसतो, पण हा मदरसा व्यायामशाळेत भरतो. तेव्हा कदाचित चालून जाईल असे तिला वाटते. तरी ती म्हणते, ''इमामकडे छडी असते. ते ती वापरतात. तू काही गोंधळ केला तर अब्बा आपल्याला ठार मारतील...'' ती ईव्हाला स्कार्फ गुंडाळायला सांगते. कुराणाला हात लावण्यापूर्वी हातपाय धुवायला सांगते. ही स्वच्छता म्हणजे एक दिव्यच असते. तीन तीन वेळा बोटे, तोंड, नाक, हात, पाय धुवावे लागतात. केस आणि कान एकदा धुवावे लागतात. ईव्हा पार भिजून निघते. तिचे बूटही भिजतात. तिला शिंका येऊ लागतात. तरी तिच्या डोक्याला स्कार्फ गुंडाळून तिच्या हनुवटीवर घट्ट गाठ मारून ती अरब मुलीसारखी दिसावी अशी जंगी व्यवस्था जमीला करून टाकते.

मदरशात इतर मुलींप्रमाणे तिला कुराणातील आयतींचे उच्चार जमत नाहीत. तशाच तिचा स्कार्फ सुटून तिचे कुरळे केस दिसू लागतात. मांडी घालून बसल्याने तिची चड्डी दिसू लागते तेव्हा शेजारची मुलगी तिला कोपराने ढोसते. ती पाय सरळ करू पाहते तर पुढच्या ओळीतल्या मुलीला तो पाय लागतो. ती किंचाळते. इमाम रागाने लाल होतात. ईव्हाजवळ येऊन तिला छडी मारतात. तिच्या खांद्यातून कळ येते. ती रागाने इमामच्या हातातील छडी पकडून हिसकावून घेते... इमाम चक्रावून जातो. एक मुलगी असे धारिष्ट्य दाखवते म्हणजे काय?

अदान त्याचवेळी आग आग असे ओरडतो. इमाम तिकडे बघतो... व्यायामशाळेत एकच गोंधळ माजतो. तेवढ्यात ट्रँझिस्टरवरून प्रार्थनेची सूचना मिळते. ईव्हा, जमीला आणि अदान पळ काढतात.

तुझ्या बहिणीला चांगली वेसण घातली पाहिजे असे इमाम अदानला बजावतो.

अदान ईव्हाला म्हणतो, ''खरं तर मदरसामध्ये सच्चा मुसलमान कसं बनायचं याबद्दल फारसं नाही शिकता येत.''

ईव्हा म्हणते, ''आता मी तुझ्या घरी येणार नाही. मला भेटायचं असेल तर माझ्या घरी यावं लागेल, तेवढी धमक अंगात असली तर! शुक्रवारी शाळा सुटल्यावर...''

एका मुलीने चॅलेंज केल्यावर अदानला माघार घेता येणे अशक्य होते. 'मी शुक्रवारी येईन' तो म्हणतो. घरकाम करणाऱ्या झकाऊरबाईचा मुलगा आहे हे ईव्हाच्या वडिलांना प्रथमच कळते. पण ते मोठ्या मनाने त्याला पार्टीत सामील करून घेतात. त्याला विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्याचा आग्रह करतात.

तो 'रेडवाइन' चाखतो खरा, पण लगेच उलटी करतो. पार्टीचा बेरंग होतो.

ईव्हाचे वडील त्याला गाडीतून त्याच्या घरी सोडतात.

घरी सर्वजण अदानचीच वाट बघत असतात.

त्याच्या तोंडाला येणारा विचित्र वास. ''तू दारू प्यालास?'' जमीला त्याला विचारते.

''ते ज्यू आहेत हे आधी माझ्या लक्षात आले नाही. मी निघतो म्हटले तर मला त्यांनी सोडले नाही.'' त्याची ही बाजू ऐकल्यावर जमीला त्याला झोपायच्या खोलीत घेऊन जाते.

दुसऱ्या दिवशी सकाळी घरात सर्वांना ही गोष्ट कळते. अदानचे अब्बा किचनमध्ये जाऊन आपल्या बायकोच्या थोबाडीत देतात. ''तू आता ज्यू लोकांकडे काम करायला लागलीस?''

''ते ज्यू आहेत हे मला माहीत नव्हते.'' पण अब्बा शांत होत नाहीत. ते अदानला फैलावर घेतात. तेवढ्यात मदरसामधील इमाम येतो. ''ती मुलगी वर्गात फार चुकीची वागली. कोण होती ती? तिला शिक्षा व्हायलाच पाहिजे.''

''कोण मुलगी? ती ज्यू मुलगी तर नाही?''

''हो...''

''काय ज्यू मुलगी? तिला माझ्या वर्गात घेऊन आलास? सगळ्या पाक मुसलमान मुलींबरोबर मांडीला मांडी लावून ती बसली. तिनं आपल्या पवित्र कुराणाला स्पर्श केला? अल्ला तुला सोडणार नाही.'' इमामच्या रागाचा पारा चढत जातो.

अब्बा अदानच्या कानशिलात भडकावतात.

''कुराण भ्रष्ट केलंस. आपल्या खानदानाचं नाव धुळीला मिळवलंस. त्या घाणेरड्या ज्यू लोकांच्या घरी जाण्याची हिंमत कशी झाली तुला? तुझा माझा आता काही संबंध नाही. तू मला मेलास. मी तुला मेलो. चालता हो इथून.''

अब्बा त्याला घराबाहेर ढकलून दार लावून घेतात.

अदान रोजच्या बसच्या मार्गानं रस्त्यावर चालत राहतो. स्लोटोडाइक स्टेशनवर जातो. तेथेच एका बाकावर बसतो. भूक लागते. पिझ्झावाल्याची नजर चुकवून पिझ्झा

पळवतो. चोरी करणं सोपं आहे असं त्याला वाटतं.

ईव्हाला तिची सावत्र आई म्हणते, ''तुला आता स्वित्झर्लंडमधील बोर्डिंग स्कूलमध्ये ठेवू. तू तिथे खूष राहशील... मोलकरणीच्या मुलाबरोबर वेळ घालवणं चांगलं नाही तुला.''

ईव्हाला आपल्या सावत्र आईचा राग येतो. तिला आपल्या जन्मदात्या आईच्या मृत्यूबद्दलच्या बातमीचे वृत्तपत्रातले कात्रण वडिलांच्या एका फायलीत आढळते. त्या बातमीत आईचे दफन ल्युनटरेन येथील सेंट मेरी सेमेटरीमध्ये २१ ऑक्टोबर १९९८ रोजी झाल्याचा उल्लेख आढळतो.

आईवडिलांबरोबर ऑपेरा बघायला जाण्याचे टाळून ती आपला आयपॉड, पर्स आणि जेवणातले उरलेले सँडविच घेऊन ल्युनटरेनला आईच्या कबरीचा शोध घेण्याकरिता बाहेर पडते. ती स्लोटोडाइक स्टेशनवर बसने जाते.

तेथे तिला तिकीट यंत्राजवळ अदान दिसतो.

आदल्या दिवशीच्या पार्टीतल्या गोंधळाबद्दल त्यांच्यात चर्चा होते.

ती म्हणते, ''मी ल्युनटरेनला जातेय. तिथे माझ्या ममाचे दफन झालेय. तू माझ्याबरोबर येतोस का?''

दोघांची तिकीटे काढायची तर ३८ युरो लागले असते. तिच्याजवळ एकतीस युरोच होते.

''मी तिकीट काढत नाही. चकटफू प्रवास करीन. शनिवारी रात्री ट्रेनमध्ये टीसी नसतात म्हणे.'' तो म्हणतो.

''पण ही चोरी आहे.'' ईव्हा म्हणते.

ईव्हा एक तिकीट काढून त्याला देते. ''मी मुलगी आहे. टीसी मला त्रास देणार नाही असे वाटते.'' असे ईव्हा अदानला सांगते आणि दोघे ट्रेनमध्ये चढतात.

टीसी येतो तेव्हा ईव्हा सांगते, ''माझे तिकीट हरवलेले दिसते. माफ करा.''

टीसी त्या दोघांचा नावपत्ता लिहून घेतो. त्याला खरे तर अदान हा अरब मुलगा चालू आहे असे वाटते. पण त्याच्याजवळ तर तिकीट होते. त्यामुळे आश्चर्य वाटते.

पहाटे तीन वाजता ल्युनटरेन स्टेशन येते. ते दोघे उतरतात. ही दोन पोरे इथे का आलीत असा प्रश्न टीसीला पडतो. हे दोघे स्टेशनबाहेर पडून चालू लागतात. ईव्हाच्या तेथील घराजवळच्या उघड्या शेडमध्ये आडवे होतात.

इकडे ॲमस्टरडॅममध्ये ईव्हाच्या घरी एकच हलकल्लोळ माजतो. ईव्हा कुठे गेली? ईव्हाचे वडील पोलिसांना फोन लावतात. पोलीस विचारतात, ''तुमच्या मुलीशी तुमचं भांडण झालं होतं का? तिचा कुणी बॉयफ्रेंड आहे का?''

ईव्हाचे वडील अदानबद्दल माहिती सांगतात.

पोलीस लगेच अदानच्या घरी जातात. अदान घरात नाही हे सर्वांच्या लक्षात

येते. रविवारी सकाळी मशिदीपाशी जमलेल्या लोकांमध्ये एकच चर्चा चालू होते. ''ज्यू लोकांनी एका मुसलमान मुलाला पळवून नेले... नाही, एक मुसलमान मुलगा एका ज्यू मुलीबरोबर पळून गेला.'' पोलिसांची गाडी त्या वस्तीत येते तेव्हा तिच्यावर कोणीतरी एक दगड भिरकावतो. ती गाडी तशीच परत जाते.

त्याबरोबर जमावात एकच जल्लोष होतो. दगडफेक सुरू होते. फळवाल्यांच्या स्टॉलवरची फळे लोक लांबवू लागतात.

मिस्टर लिबरमन आपल्या घरी ज्यू समाजातील प्रतिष्ठित लोकांची बैठक घेतात.

''तुमच्या ईव्हाला, तुमच्या मुलीला पळवून नेलंय? ज्यू मुलानं? थांबा, पोलीस सुपरिंटेंडंटना फोन लावतो.'' म्हणत सारेजण मुसलमानविरोधी बोलू लागतात.

रविवारी सकाळी अकराच्या ट्रेनने ईव्हा आणि अदान ल्युनटरनेच्या स्टेशनवरून ॲमस्टरडॅमला जायला निघतात. तिकीट न घेताच.

ट्रेनमध्ये टीसी त्या दोघांना पकडतात. ॲमस्टरडॅम सेंट्रल स्टेशनवर ते सर्वजण उतरले तेव्हा तेथील टेलिव्हिजनवरील बातम्यात हरवलेल्या दोन मुलांचा शोध चालू असल्याचीही बातमी दिसते.

ते टीसी लगेच पोलिसांशी संपर्क साधतात. ''ती दोघे अगदी वेळेवर सापडली हे चांगले झाले. येथे खवळलेल्या जमावाने दोन गाड्यांना आग लावलीय... त्या अरब मुलाला लगेच इकडे आणा. तो ठणठणीत आहे असे सगळ्यांना दाखवायला हवेय...'' पोलिसांना रेडिओवरून संदेश दिला जातो.

''मला स्वित्झर्लंडला बोर्डिंग स्कूलमध्ये पाठवले तर तू स्वित्झर्लंडमध्ये ये. तुला चॅलेंज देते मी.'' ईव्हा म्हणाली.

''मला मोरोक्कोला पाठवले तर तू मोरोक्कोला यायला हवे. तुला हे डबल चॅलेंज.''

''इन्शाल्ला. अल्लातालाची मर्जी असेल तर...''


''इन्शाल्ला.'' ईव्हा ही प्रतिसाद देते.

अयान हिरसी अली यांनी ही हृदयस्पर्शी कहाणी लिहिली आहे. अकारण आपण धार्मिक तेढ माजवत असतो. आपल्या जीवनशैलीचा आणि कर्मकांडांचा आग्रह धरून आपण दुसऱ्याला तुच्छ वा त्याज्य ठरवत असतो. मुलांच्या मनात विद्वेषाचे बीज पेरत जातो. खरे तर माणूस म्हणून आपण सर्व समानच असतो. एकमेकांना समजून घेऊ शकलो तर आपल्यात सौहार्द राहू शकते. एकमेकांचे जीवन आपण सुंदर करू शकतो. मुले निरागस असतात. एकमेकांशी लगेच मैत्री करू शकतात. मोठी माणसे पूर्वग्रहांनी परस्परांकडे संशयाने बघत राहून जीवनात अकारण ताणतणाव निर्माण करत राहतात. आपलीच जीवनशैली श्रेष्ठ असा वृथा अभिमान आणि

अहंकार जोपासत असतात.

अयान हिरसी अली या लेखिकेचा जन्म सोमाली देशात झाला. परंतु तिला वडिलांनी ठरवलेले लग्न मान्य नसल्याने १९९२ साली देशांतर करावे लागले. ती नेदरलँडसची नागरिक झाली, राज्यशास्त्राची पदवी तिने मिळवली. तेथील संसदेत ती निवडून आली. स्त्रियांच्या हक्कासाठी तिने व्यासपीठ उभारले. इस्लामच्या पुनर्रचनेसाठी जागतिक आंदोलन उभारले. इस्लाममधील अनेक धर्मश्रद्धांविरुद्ध तिने आवाज उठवला. मुस्लीम जहालमतवाद्यांच्या धमक्यांना न जुमानता लोकजागृतीचे काम जारी ठेवले. लहान वयापासूनच मुलांनी वेगवेगळ्या संस्कृतींचा परिचय करून घ्यायला हवा, पूर्वग्रहांना थारा देता कामा नये असे तिचे प्रतिपादन असते.

**किंमत : ५० रु.      सभासदांना : सवलतीत      पोस्टेज : २० रु.**


**आगामी**

# कोल्ड स्टील


**टीम बुके । बायरॉन उसी**
अनु. सुभाष जोशी

''गी, मी लक्ष्मी मित्तल बोलतो आहे. मी केवळ औपचारिकपणे हा फोन करतो आहे आहे. उद्या मित्तल स्टील तुझ्या भागधारकांसमोर आर्सेलरच्या शेअर्ससाठी थेट प्रस्ताव मांडणार आहे हे सांगण्यासाठी.''

''ही तर एकप्रकारची लढाईच आहे,'' जॉन कास्टेगम्रो जाहीर करतो. ''आपण आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढलं पाहिजे.''

मित्तलचा प्रस्ताव आर्सेलरचे संचालकमंडळ एकमुखाने फेटाळून लावते.

## नवे कोरे




# शिंडलर्स लिस्ट

**थॉमस केनेली**
अनु. संजय दाबके

**३००रु. पोस्टेज ३०रु.**

१९३९ ते १९४५ या काळात एका विकृत राजवटीच्या हट्टापायी सगळ्या जगाला वेठीला धरलं गेलं होतं. युरोपची भूमी बेचिराख होत होती.

ज्यूंचा वंश नष्ट करायची प्रतिज्ञा नाझी भस्मासुराने केली होती. त्या आगीत सगळ्यात जास्त होरपळून निघालेला देश म्हणजे पोलंड. नाझींनी उघडलेल्या ३२० छळछावण्यांपैकी ३०० पोलंडमध्ये होत्या. त्या सगळ्या देशाचाच तुरुंग झाला होता. माणसामधल्या सैतानी वृत्तीने कळस गाठला होता पण त्याच बरोबर काही ठिकाणी माणसांच्या रूपातला देव संकटात सापडलेल्यांच्या मदतीला धावून जात होता.


'शिंडलर्स लिस्ट' ही अशीच एका देवमाणसाची कथा आहे.

स्वत: जर्मन असूनही त्यानं स्वत:चं सर्वस्व पणाला लावून बाराशे ज्यूंचे प्राण वाचवले. लिओपोल्ड पेफरबर्ग हा ऑस्कर शिंडलरने वाचवलेल्या १२०० ज्यूंपैकी एक. त्यानं ही जगावेगळी कथा लोकांसमोर आणण्यासाठी अतोनात कष्ट केले. थॉमस केनेलीसारख्या सिद्धहस्त प्रतिभावंताने ही कथा १९८३ साली लिहिली. प्रतिष्ठेच्या बुकर पुरस्कारासह जगभरात तिला अनेक मानसन्मान लाभले.

१९९३ साली या कथेवर आधारित चित्रपटाची निर्मिती दिग्दर्शक स्टीव्हन स्पिलबर्ग याने केली.

विस्मृतीच्या पडद्याआड गेलेल्या ऑस्कर शिंडलरचं नाव या कलाकृतीमुळे दुसऱ्या महायुद्धाच्या इतिहासात चिरंतन झालं.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.



# पुस्तक परिचय

## फ्रँकलिन कासवाच्या गमतीजमती

## फ्रँकलिन - एक किशोर नायक




**पोलेत बूर्ज्वा** अनु. मंजूषा आमडेकर



ससा आणि कासव ही 'इसापनीती' मधली गोष्ट सर्वांना माहीत असते. चपळ सशाला सावकाश धीम्या गतीने चालणारे कासव पळण्याच्या शर्यतीत हरवते. शर्यत जिंकते.

कासवालाच मध्यवर्ती पात्र बनवून त्याच्याविषयी कथा लिहिण्याची उदाहरणे फार थोडी आढळतात. तसा एक यशस्वी प्रयत्न झाला आहे.

पोलेत बूर्ज्वा या लेखिकेने कासवाला किशोर नायक बनवून बालकथामालिका निर्माण केली आहे. या कासवाला फ्रँकलिन असे नाव देऊन त्याला खेळकर, खोडकर मुलाप्रमाणे वेगवेगळ्या घटनांचा सामना करायला लावला आहे. हा फ्रँकलिन कासव कुठल्याही लहान मुलासारखा वागतो. कंटाळा करतो, दंगा करतो, मित्रांशी भांडतो, कधी कधी भाव खातो, कधी दादागिरी करतो. तो अंधाराला घाबरतो, आई घरी नसली की घरभर पसारा करतो. तो वेगवेगळ्या खेळात भाग घेतो. प्राणी पाळायचा प्रयत्न करतो. कधी रस्ता चुकतो. जंगलात हरवतो. तो बढाया मारतो. थापा मारतो. पण तो तसा प्रेमळ आहे. मित्रांना तो मदत करतो. अडीअडचणीत कोणाच्याही सहाय्याला धावतो. त्याच्या या स्वभावगुणांचे दर्शन घडवणाऱ्या गोष्टींची थोडथोडकी नव्हे तर नऊ पुस्तके मराठीत आली आहेत आणि आणखी येणार आहेत. मंजूषा आमडेकर यांनी मूळ इंग्रजी पुस्तकांचे मराठी भाषांतर केले आहे.

कासवाच्या या गोष्टी पोलेत बूर्ज्वा या लेखिकेने वीस वर्षांपूर्वी प्रथम लिहिण्यास आरंभ केला. ब्रेन्डा क्लार्क यांनी ही पुस्तके रंगीत चित्रांनी सजवली. मराठीतही ही मूळ रंगीत चित्रेच वापरलेली आहेत.

पाठीवर कवचाचे (पुस्तकांचे) ओझे घेऊन जाणारा फ्रँकलिन बालवाचकांना



आपल्या वर्गातीलच मुलगा वाटेल. हे चित्र बघितल्यावर हा मुलगा कासव आहे याचाच विसर पडण्याची शक्यता आहे. फ्रँकलिन कासवाला वेगवेगळ्या अवस्थात चितारण्यात ब्रेन्डा क्लार्क यांनी खूपच कल्पकता दाखवली आहे.

डोक्यावर कॅप, हातात बॉल आणि बॅट निघालेला फ्रँकलिन,

एप्रन घालून केक तयार करण्यासाठी लाटण्याने पीठ मळणारा फ्रँकलिन,

पाठीवरचे कवच दोरीला बांधून फरफटत नेणारा फ्रँकलिन,

आईच्या कुशीत घट्ट बिलगणारा फ्रँकलिन,

घरभर पसारा करणारा फ्रँकलिन,

कपाटातली पुस्तके चाळणारा फ्रँकलिन,

तलवार हातात घेऊन मोहिमेवर निघालेला फ्रँकलिन,

कापडी कुत्र्याला खाऊ घालणारा फ्रँकलिन,

फांदीला बांधलेल्या झोपाळ्यावर बसून झोके घेणारा फ्रँकलिन,

खिडकीतून बाहेर डोकावून बघणारा फ्रँकलिन,

खुर्ची-टेबलावर बसून दंतपरीला पत्र लिहिणारा फ्रँकलिन,

भेटवस्तू बघून छाती फुगवणारा फ्रँकलिन,

गोगलगायीला पाठीवर बसवून करवंदांच्या जाळीतून चाललेला फ्रँकलिन.

अशा कितीतरी वेगवेगळ्या स्थितीतील फ्रँकलिन या चित्रांतून डोळ्यांसमोर उभा राहतो. पाठीवरचे कवच सांभाळत सावकाश चालणारे कासव आपण बघत असतो; त्याला उभ्या स्थितीत दाखवणे हे कल्पनाशक्तीचे काम ते चित्रकर्तीने कल्पकतेने बजावलेले आहे. कासव हे त्यामुळे एखाद्या मुलाप्रमाणे समोर येते. त्याचे चालणे, बसणे, खेळणे हे सर्व स्वाभाविक वाटते.

कासवाला किशोरनायक म्हणून वाचकांपुढे पेश करताना लेखकालाही कल्पनाशक्तीची करामत दाखवावी लागते. कासवाला त्याच्या कुटुंबासह म्हणजे आईबाबांसह विविध

घटना-प्रसंगात रंगवावे लागते. फ्रँकलिनला समजावून घेणारे, सल्ला देणारे, त्याला घरी यायला उशीर झाला तर शोधायला बाहेर पडणारे, त्याची सर्वतोपरी काळजी घेणारे आईबाबा तर आहेतच; त्याला काही मित्रही आहेत.

अस्वल, बीव्हर, ऊदमांजर, कोल्हा, हंसी, गोगलगाय, घुबड, क्वॅक क्वॅक करणारे बदल, यांच्याशी, फ्रँकलिन फुटबॉल खेळतो, लपाछपी खेळतो, राजा-शिपाई खेळ करतो, अस्वलाच्या घरी वाढदिवसाच्या पार्टीला जातो, जंगलातून जाताना वाट चुकतो, हरवतो, घाबरतो, कधी या सोबत्यांशी स्पर्धा करतो, कधी त्यांच्यावर दादागिरी करतो, आपण आणि मित्र यांची तुलना करतो. अस्वलासारखे दात आपल्याला का नाहीत असा त्याला प्रश्न पडतो. त्यासाठी तो दंतपरीला चिठ्ठी पाठवतो. दंतपरीही त्याला उत्तर पाठवते आणि कळवते की कासवाला दात नसतात. प्रत्येक पक्ष्याचे, प्राण्याचे स्वत:चे वैशिष्ट्य असते.

राजा-शिपाई खेळात हातात पुठ्ठ्याची तलवार घेऊन फ्रँकलिन ड्रॅगनशी लढाई करतो. घरातल्या पसाऱ्यात तलवार सापडत नाही तर काठीलाच तलवार समजून लढायचे ठरवतो. आई घरातला पसारा आवरायला सांगते तर तो सगळ्या वस्तू कपाटात हव्या तशा कोंबून कपाटाचे दार बंद करतो... कपाट उघडायला जातो तर सगळ्या वस्तू एकदम खाली जमिनीवर आदळतात. काही फुटतात. काही मोडतात.

फ्रँकलिन तसा इतर प्राण्यांपेक्षा छोटा असतो, पण दादागिरी करण्यात मागेपुढे बघत नाही. खेळ कुठला खेळायचा हे तोच ठरवतो. आपण गोट्या खेळू, पळण्याची शर्यत लावू, फुटबॉल खेळू. त्याची लहर फिरेल तसे खेळ बदलायचे. खेळाचे नियमही तोच ठरवणार. पळण्याच्या शर्यतीत जिंकणार कोण? तर जो सर्वात शेवटी असेल तो? त्याची ही दादागिरी अस्वलाला, बीव्हरला किंवा हंसीला आवडत नाही तेव्हा ते त्याच्याशी खेळायला नकार देतात. त्यामुळे फ्रँकलिनला घरी बसून किल्ला करणे, चित्रे काढणे असे एकट्याने करायचे खेळ खेळणे भाग पडते. मित्र नदीत डुंबत मस्त मजा करतात. फ्रँकलिन त्यांच्याकडे जाऊन म्हणतो, ''आता मी दादागिरी नाही करणार. आपण सगळे खेळू.''

रात्री आपल्या कवचाच्या आत अंगाचे मुटकुळे करून झोपायची त्याला भीती वाटते. कवचाच्या आत अंधारगुडूप असतो. त्यामुळे त्या अंधाराचे त्याला भय वाटते. तो बदकाला म्हणतो, ''मला कवचाच्या आतल्या अंधाराची भीती वाटते.'' बदक म्हणते, ''अरे, मला खोल पाण्याची भीती वाटते. मग मी माझे रबरी पाणपंख वापरतो.'' सिंह म्हणतो, ''अरे मला आवाजाची भीती वाटते. मी मग कानात बोळे घालतो.'' पक्षी म्हणतो, ''अरे मला उडायची भीती वाटते. मी पॅराशूट वापरतो.'' हिमअस्वल म्हणते, ''मला हिमवर्षावाने येणाऱ्या थंडीची भीती वाटते. मग मी कातड्याचा कोट वापरते.'' याचा अर्थ प्रत्येकाला कुणा ना कुणाची भीती वाटते हे




फ्रँकलिनला कळून येते. तो आईकडे जातो. आई म्हणते, ''अरे, तू हरवलास अशी भीती मला वाटत होती.'' तो आईच्या कुशीत शिरतो, ''आई, आता मला भीती वाटत नाही.''

फ्रँकलिनला कधी कधी थापा मारायची हुक्की येते. इतर प्राण्यांचे बघून तोही बढाईखोरपणा करू लागतो. अस्वलदादा म्हणतो, ''मी उंच झाडावर चढू शकतो.'' ससाणा म्हणतो, ''मी बोरीचं रान पार करू शकतो.'' बीव्हर म्हणतो, ''मी दातांनी झाड कुरतडू शकतो.'' फ्रँकलिनला प्रश्न पडतो. आपण काय सांगावे? तो सांगतो, ''मी एकावेळी ७६ माशा गट्ट करू शकतो.'' बाकीचे सर्वजण त्याला तसे करून दाखव म्हणून आव्हान देतात. तो प्रयत्न करतो. पाचसहा माशा गट्ट करतो. मग माशाच उरत नाहीत. आपली थाप पचली नाही म्हणून त्याला वाईट वाटते. तो बाबांना हा प्रसंग सांगतो. बाबा म्हणतात, ''अरे तू ७६ माशा खाऊ शकशील. तू काही हरलेला नाहीस. तुला हे करता येईल. थोडी कल्पनाशक्ती वापर.'' फ्रँकलिन मग काय करतो? ७६ माशा जमवतो. पीठ, मध, दूध, अंडी वगैरे घेतो. त्या सर्वांचे मिश्रण करून त्याचा केक बनवतो. तो माशांचा केक खाऊन दाखवतो. फ्रँकलिनच्या या युक्तीने सगळेजण थक्क होतात. त्याने थाप मारलेली होती, पण युक्तीने ती थापही खरी करून दाखवली. बाबा त्याला शाबासकी देतात.

बाबा त्याच्या मदतीला नेहमी पुढे असतात.

फुटबॉल खेळताना तो लाथेनं उडवणे कासवाला जमत नाही. तेव्हा बाबा सांगतात, ''अरे, सर्वांनी एकजूट केली तर तुमची टीम जिंकू शकेल.''

फ्रँकलिन विचार करतो. हंसी गोलकीपर असते ती बॉल फ्रँकलिनच्या दिशेने उडवते. तो बॉल फ्रँकलिनच्या डोक्यावर पडतो. एक जबरदस्त झटका देऊन फ्रँकलिन तो बॉल बीव्हरकडे उडवतो. बीव्हर आपल्या शेपटीच्या फटकाऱ्याने तो बॉल सशाकडे पास करतो. ससा आपला फताडा पाय वर उचलतो. बॉल एकाच किकमध्ये गोल करतो. फ्रँकलिनच्या टीमचा गोल होतो. टीममधले सगळे खेळाडू



आनंदाने उड्या मारतात.

एकदिलाने खेळले तर गोल होऊ शकतो, हे सर्वांना कळले. कोचने त्यांना शाबासकी दिली. फ्रँकलिनच्या आईबाबांनी सगळ्या टीमला पार्टी दिली. ''आमची टीम जिंकली नाही तरी पार्टी देणार?'' असे फ्रँकलिनने विचारले तेव्हा बाबा म्हणाले, ''आम्हाला तर तुम्हीच जिंकलाय असे वाटते. जबरदस्त एकजूट दाखवून तुम्ही बलाढ्य अस्वलांच्या टीमला तोंड देत गोल केला. तुम्ही कमालच केली!''

फ्रँकलिनला एकदा लहर येते, ''एखादा प्राणी पाळायचा.''

पक्षी पाळला तर तो रात्री किलकिलाट करून झोपमोड करतो.

बीव्हर मांजर पाळ असे सुचवतो. पण मांजर पाळणे खूप खर्चाचे ठरते.

हंसी म्हणते, ससा पाळ. पण सशाच्या मिशांमुळे त्याला खूप शिंका येतात. कुत्र्याचे पिल्लू घरभर घाण करते. मग काय करायचे? एखादा शांत प्राणी हवा.

फ्रँकलिन असा प्राणी शोधून काढतो. तो गोल्ड फिश पाळतो. माशाच्या पेटीत पाणी घालून गोल्डफिशच्या हालचाली बघत राहतो.

असा नानाविध उद्योग करणारा फ्रँकलिन कासव हा मिकी माऊस, टेडी बेअर यांच्याप्रमाणेच बालवाचकांना मित्र म्हणून आवडायला हरकत नाही.

त्याची ही चित्रमय पुस्तके नुसती बघत राहिले तरी मजा वाटेल.

**किंमत प्रत्येकी : ५०रु. एकत्रित पोस्टेज ५०रु.**

# मेहता पब्लिशिंग हाऊसची पुरस्कारप्राप्त पुस्तके

**'नॉट गॉन विथ द विंड'** विश्वास पाटील
'आपटे वाचन मंदिर'चा लक्षणीय गद्य साहित्यकृती पुरस्कार २००९
'महाराष्ट्र राज्य पुरस्कार' २००८-२००९, कै.रा.तु. पाटील पुरस्कार २००८

---

**'अदम्य जिद्द'** डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अनु. सुप्रिया वकील
'आपटे वाचन मंदिर'तर्फे उत्कृष्ट अनुवादित साहित्यकृती पुरस्कार २००९

---

**'आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान'** निरंजन घाटे
'एफ.आय.पी.'चा उत्कृष्ट पुस्तक निर्मितीसाठी द्वितीय पुरस्कार २००९

---

**'नोबेल ललना'** मीरा सिरसमकर
'खान्देशकन्या स्मिता पाटील संकीर्ण साहित्य पुरस्कार' २००९

---

**'त्रिधारा'** अनु. उज्ज्वला केळकर
'खान्देशकन्या स्मिता पाटील उत्कृष्ट अनुवाद साहित्य पुरस्कार' २००९

---

**'आसूड'** अशोक कौतिक कोळी
'दहिवळ गुरुजी साहित्य पुरस्कार' व 'माणिक साहित्य कथा पुरस्कार' २००९
'भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार' २००८

---

**'माय फॅमिली इज ऑल आय हॅव'** हेलन-ॲलीस डिअर अनु.चित्रा वाळिंबे
पुणे मराठी ग्रंथालयातर्फे उत्कृष्ट अनुवादासाठी 'कै.ना.ह. आपटे पुरस्कार'

---

**'टू सर विथ लव्ह'** ई.आर. ब्रेथवेट अनु. लीना सोहोनी
'धि गोवा हिंदु असोसिएशन'तर्फे उत्कृष्ट अनुवादासाठी जी.ए. कुलकर्णी पुरस्कार २००९

---

**'सम्राज्ञी'** तेजस्विनी जाधव
'महाराष्ट्र साहित्य परिषदे'चा वा. म. जोशी पुरस्कार २००९

---

**‘मोहतरम्मा ते अम्मा’** सुधा गोखले

‘महाराष्ट्र साहित्य परिषदे’चा प्रा. उमाकांत कीर पुरस्कार २००९

---

**‘भोगले जे दुःख त्याला...’** आशा आपराद

‘महाराष्ट्र साहित्य परिषदे’चा लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार २००९

‘दमाणी साहित्य पुरस्कार’ २००८, ‘मातृपितृ’ पुरस्कार २००९,

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार’ २००८-२००९

‘सुधाताई जोशी जी.ए. पुरस्कार’ २००८-२००९

---

**‘पॉपकॉर्न’** सुप्रिया वकील

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार’ २००८-२००९

---

**‘अवशेष’** राजा कदम

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार’ २००८-२००९

---

**‘कल्पित-अकल्पित’** सुधा रिसबूड

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार’ २००८-२००९

---

**‘प्रकाशाची झाडे’** वसु भगत

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार’ २००८-२००९

---

**‘छत्रीची जादू आणि इतर कथा’** राजीव तांबे

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार’ २००८-२००९

---

**‘ग्रंथसूची’**

‘एफ.आय.पी.’चा उत्कृष्ट निर्मितीसाठी द्वितीय पुरस्कार २००९

---

## पुरस्कार प्राप्त लेखकांचे मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे हार्दिक अभिनंदन!

# साधंसुधं



## साकव

**प्रमोदिनी वडके-कवळे**

लहानपणी अमितला पोस्टाची तिकिटं, सिगारेटची वेगवेगळी पाकिटं, निरनिराळ्या रंगाच्या काचेच्या गोट्या, काडेपेटीवरची चित्रे, आलेली शुभेच्छाकार्डेही जपून ठेवण्याचा छंद होता. त्याच्या टेबलावर एक सुरेख लाकडी चौकट होती. त्याला प्रचंड आवडलेल्या कार्ड्सना - त्याला आवडणारं सगळंच 'प्रचंड' आवडतं - त्या फ्रेममधे बसण्याचा सन्मान मिळायचा. एखादं नवीन कार्ड आवडलं की त्या चौकटीतल्या जुन्या कार्डाची बदली व्हायची किंवा एखाद्या खुशीच्या क्षणी त्याच्या अंगात उदार सुलतान संचारायचा आणि त्याला 'प्रचंड' आवडलेलं कार्ड तो आम्हाला देऊनसुद्धा टाकायचा.

एकदा कुणीतरी त्याला पुलाचं चित्र असणारं कार्ड दिलं. ते कार्ड पहाताक्षणी मी म्हटलं, ''तुझ्या फ्रेममधून काढल्यावर हे कार्ड माझं.''

''आत्ताच घेऊन टाक.'' त्यानं ते कार्ड माझ्या अंगावर भिरकावलं.

तो ते कार्ड इतकं लगेच देऊन टाकेल अशी अपेक्षा नसल्याने मी काहीशी खजील झाले. आपली आवड एवढी सामान्य आहे की काय?

''अरे, लगेच नाही दिलंस तरी चालेल.''

''तुला आवडलंय ना? आणि एवढं काही खास नाही ते. माझ्याकडे पुलाची चित्रं असलेली याहून कितीतरी सुंदर कार्ड्स आहेत.'' तो बेफिकीरपणे म्हणाला. ''त्या चित्रात तुला एवढं काय आवडलंय कोण जाणे. किती साधा आणि जुनाट पद्धतीचा पूल आहे तो!''

''असू देत.'' मी काहीशा रागाने म्हणाले.

चित्रातला तो पूल खरंच जुनाट होता. आजूबाजूला फारसं निसर्गसौंदर्यही चितारलेलं नव्हतं. तरीही का कोण जाणे तो पूल मला आपलासा वाटला. त्या पुलात मला नेमकं काय आवडलंय ते मात्र अमितला नीटसं समजावून सांगता आलं नाही. कारण त्याच्या मनातले सगळे पूल वेगवान दुनियेतले. उंच कठड्यांचे आणि आधुनिक तंत्रज्ञानानुसार बांधलेले असणार. ओबडधोबड बांबू जोडून केलेला हा चिमुकला पूल त्याला कसा पटणार?

मुळात तो पूल नव्हताच. तो साकव होता!

साकव!! माझ्या मनात त्या शब्दाचे घुंगूर रुणझुणले. शैशवाच्या तीरावरचं, फूलपाकळीच्या दंवाचं आणि इंद्रधनूच्या रंगाचं हळूवार वय. कथाकादंबरीतल्या शब्दांशी रोज नव्याने नातं जुळत जायचं. त्या दिवसात मला आणि माझ्या मैत्रिणींना हा शब्द सापडला होता. दिवाळी अंकात आलेल्या शैलजा राजेंच्या एका कादंबरीचं नाव होतं ते. साकव! ओढ्याच्या दोन काठांना जोडणारा कच्चा पूल. आम्ही सगळ्याचजणी त्या शब्दावर आणि त्या कादंबरीवर बेहद्द फिदा झालो होतो.

नंतर दिसामासाने आमची मनं आणि मतं बदलत गेली. हळूवारपणा हरवत गेला.. आणि मग तशा प्रकारचं गुळगुळीत वाङ्मय बेगडी वाटायला लागलं. आपल्याला असं काही आवडत होतं याचं हसू यायला लागलं.

पण तरीही आज अलिप्त नजरेने बघताना त्या वयातलं असं चमकदार शब्दांवर केलेलं भाबडं प्रेमही पटून जातं. कारण वयाबरोबर हरवून गेलेला तो भाबडेपणाच आज पुन्हा मोह घालतो.

त्या जुनाट पुलाचं चित्र बघताना माझ्या मनात शैशवातल्या त्या दिवसांच्या आठवणी उमलून आल्या.

मनात सतत काहीतरी अनाम भावना उचंबळून येण्याचं आणि त्याबद्दल फक्त मैत्रिणीजवळच बोलावंसं वाटण्याचं जे वय असतं त्या वयात एखादी जागा आपोआपच खुणेची जागा बनून जाते. आमच्या गावातल्या मुलामुलींसाठी ही खुणेची जागा होती गावातला एकुलता एक पूल.

दूरदर्शन हा शब्दही ठाऊक नसलेल्या त्या दिवसात आमच्या संध्याकाळी ‘इव्हेंटफुल’ बनवणारी जागा म्हणजे गावातला तो पूल होता.

संध्याकाळी नित्यनेमाने फिरायला जाताना आमच्या चर्चा रंगायच्या. चर्चेचे विषयही असेच. अर्धकच्च्या अकलेचे! नव्याने वाचलेल्या कथाकादंबरीतल्या घटना, आवडलेल्या उपमा, शाळेतल्या शिक्षकांविषयीची मनात साचून राहिलेली मतं, कुणाच्या तरी तोंडून ऐकलेलं शहरातलं एखादं नवल आणि रेडिओवरच्या गाण्यांबद्दलच्या न संपणाऱ्या गप्पा. त्या वयात मैत्रीण हेच दैवत असतं. तेव्हा मुलीचा मित्र ही संकल्पना उदयाला आलेली नव्हती. त्यामुळे एकमेकींच्या आवडीनिवडींवरच आमचं जग उभं असायचं. आवडत्या लेखकलेखिका, आवडती गाणी, नट, गायक गप्पांचे हे विषयच आम्हाला एकमेकींशी घट्ट जोडून ठेवायचे. म्हणूनच शैलजा राजेंच्या कादंबरीचं ते शीर्षक जसं काही आमच्यातलं साकवच बनून गेलं. वेगवेगळ्या घरांतून आलेल्या वेगवेगळ्या आर्थिक स्तरातल्या. वेगवेगळ्या वातावरणातल्या आणि हुशारीच्या दृष्टीने वरच्याखालच्या पायऱ्यांवर उभ्या असलेल्या आम्ही मैत्रिणी. सगळ्यांच्या मनात रात्री झोपताना पुलावरची संध्याकाळच पुन्हा उमलत असायची..

तिथल्या गप्पा आणि एकमेकींच्यात बुडून जाणं आम्हाला दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळपर्यंत पुरायचं.

आमचं गाव कोकणाच्याच नकाशावर असलं तरी समुद्रापासून बरंच लांब होतं. गावातली एकुलती एक नदी कुंडलिका. मध्यम बांध्यांची. निरुपद्रवी. स्वत:च्याच तंद्रीत पुढे सरकणारी. भरतीच्या वेळी लहान मुलाला 'भॉक' करावं तसा खोटाखोटा खळखळाट करणारी.

नदीवर बांधलेला पूल दोन गावांना जोडणारा. रोहा आणि अष्टमी. या पुलाचे कठडे घडीचे होते. जून महिना उजाडला की ते घडी घालून मिटून ठेवले जायचे. अंगातले कपडे काढून पोहण्यासाठी पाण्यात उडी घ्यायला सज्ज झालेल्या माणसासारखा पूल उघडा दिसायला लागायचा.

आणि त्या दृश्यातच कुठेतरी पुराची चाहूल जाणवायची.

कठडे मिटून घेतलेला पाण्यावर अधांतरी उभा असल्यासारखा भासणारा पूल म्हणजे असुरक्षिततेची, निसर्गाच्या अवकृपेचीच खूण.

असाच एक बिनकठड्याचा लांबलचक पूल पुढे कित्येक वर्षानी मदुराईहून रामेश्वरला जाणाऱ्या सेतू एक्स्प्रेसमधे बसल्यावर मी पाहिला. त्या पुलालाही कठडे नव्हते. लांबून पहाताना समुद्रावर रेल्वे जाण्यापुरत्या दोन समांतर लोखंडी रेषाच आखल्यायत असं वाटत होतं. खिडकीतून वाकून बघायचंही भय वाटत होतं. कारण खाली दिसत होत्या फक्त खोल सागरावर उठणाऱ्या हिरव्या लाटा. त्या लाटांवरूनच आम्ही अधांतरी चाललोय कुठल्याही क्षणी हजारो पायांनी धावणाऱ्या या लांबलचक वाहनाचा तोल बिघडेल आणि अशी जीवनमरणाची शंका दर सेकंदाला मनात उभी रहात होती.

पण तसं काही झालं नाही. तो प्रवास अगदी सुखरूप पार पडला. तो पूल संपल्यावर येणारं पाम्बन नावाचं चिमुकलं स्टेशन दिलाशाचा आणि स्थैर्याचा निखळ आनंद देऊन गेलं. आणि तो प्रवास कायमचा स्मरणात राहिला.

त्यानंतर जवळजवळ सोळा वर्षांनी मी पुन्हा रामेश्वरला गेले तेव्हा आणखी एक नवीन पूल उभारला गेला होता. जमिनीवरच! आणि आता त्या पुलावरून बसने जाता येत होतं. रेल्वेच्या चाकांबरोबर धडधडत्या हृदयाने जाण्याची गरज आता उरली नव्हती. पण यावेळी तटस्थ मनाने ती आठवण जागवताना वाटलं की त्या तशा अधांतरी प्रवासातच जास्त मजा होती.

कुणालाही त्या जुन्या प्रवासाच्या आठवणी सांगताना दरवेळी माझ्या मनात लहानपणी ऐकलेली रामाच्या सेतूची गोष्ट उभी रहायची. एकएक दगड टाकून त्या खोल समुद्राची पातळी वाढवताना त्या वानरसेनेला किती त्रास झाला असेल? प्रत्यक्ष प्रभू रामचंद्राला मदतीचा हात पुढे करणाऱ्या त्या चिमुकल्या खारीचा आत्मविश्वास त्या पुलापेक्षाही कसा भक्कम झाला असेल? हे कल्पनेत पहाताना दरवेळी माझ्या

मनात त्या महाकाव्यातल्या अगदी साध्यासाध्या व्यक्तिरेखांचेही वेगवेगळे पदर उलगडत जायचे.

अशाच एका क्षणी त्याबद्दल विचार करताना वाटून गेलं.साध्या भाबड्या मनांना भुरळ घालणाऱ्या आणि पटणाऱ्याही अशा कहाण्या हा जनसामान्यांना अशा महाकाव्यांशी आपल्या संस्कृतीशी बांधून घेणारा सेतूच नाही का? नाहीतर मूठभर विद्वानांच्या ताब्यातली ही संपत्ती तळागाळातल्या लोकांपर्यंत कशी पोचली असती

भाषेतल्या बऱ्याच शब्दांना दोनदोन तीनतीन अर्थ असतात. पण पूल हा केवळ एका अर्थाचा शब्द. दोन तीरांना जोडणारा दुवा. मग तो कसाही असो पाण्यावरचा, जमिनीवरचा, अवकाशातला, झुलता, स्थिर, भक्कम, अधांतरी, डुगडुगता,लाकडी, लोखंडी, दोरीचा किंवा शब्दांचाही.. . स्वरूप बदललं तरी त्याच्या या अर्थात कधीच बदल होत नाही. तो शब्द म्हणजे केवळ दगडाविटांचं.लाकडालोखंडाचं नुसतं बांधकाम नसतं तर मधे कितीही खोल डोह असला तरीआपण पलिकडे पोचू शकतो हा विश्वास असतो.

लोखंड, सिमेंट, तंत्रज्ञान या सगळ्या मानवनिर्मित असल्या तरी पुरेपूर दणकट गोष्टी. निसर्गावर काही अंशी तरी मात करण्याचं सामर्थ्य त्यांच्यात आहे. म्हणूनच का पुलाच्या बांधणीसाठी त्यांचा वापर केला जात असावा?

पण त्यापेक्षाही भक्कम आणि चिरकाल टिकणाऱ्या मालाने बांधलेले पूलही जगात असतातच की! नजरेला दिसत नसले म्हणून काय झालं? त्यांचं अस्तित्व असतंच ना!

रामासाठी सेतू उभारताना त्याच्या भोळ्या वानरसेनेने दगडांचा वापर केला. पण त्या दगडांना बांधून ठेवणारा चुना मात्र त्यांच्या मनातल्या भक्तिभावाचा, आपल्या आराध्य दैवतासाठी काहीतरी करून दाखवण्याच्या झपाटलेपणाचाच होता.

पावसाळ्यातल्या वादळी रात्री वसुदेव नदी ओलांडून गेला तेव्हा त्याच्या पायाखाली कुठे होता एखादा पूल? पण मनात माणुसकीवरची श्रद्धा होती. पलिकडच्या तीरावर गेलो की आपल्याला संकटकाळी मदत मिळेल हा विश्वास होता. त्याच विश्वासाच्या सेतूने त्याचा पैलतीराचा मार्ग सुकर केला असणार.

या विश्वासावरच अनेक अजस्त्र पुलांच्या योजना आखल्या जातात, पार पाडल्या जातात आणि निसर्गाच्या रौद्र रूपाचं भय असूनही असे पूल वापरले जातात. एक पूल कोसळल्याची बातमी आली तरी दुसरा पूल वापरायचं कुणी बंद करत नाही याचं कारणच मला वाटतं हा विश्वास असावा. आणि जोपर्यंत माणसाच्या मनात मरणाचं भय आहे तोपर्यंत पुलावरचा हा विश्वासही राहीलच.

मात्र या विश्वासापलिकडचा एक प्रश्न बरेचदा मनात उमटतो. ज्याचं उत्तर किती शोधलं तरी सापडत नाही.

माणूस हा जगातला सगळ्यात बुद्धिमान प्राणी आहे. तो जसे पूल बांधतो तशीच ते टिकण्यासाठी  काळजीही घेतो. एखादा पूल कोसळला तर त्यासाठी लगेच चौकशी समिती नेमली जाते. त्याच्या कारणांची चर्चा होते. नवीन पूल बांधताना पुन्हा अशी चूक होऊ नये म्हणून काळजीही घेतली जाते.

पण मनामनातले विश्वासाचे पूल दरक्षणी कुठे ना कुठे कोसळत असतातच. त्याखाली मनातली निरागस  गावं चिरडली जातात. संवादाची वाहतूक ठप्प होते. कितीही उपसून न संपणारे गैरसमजाचे निर्जीव ढिगारे उभे रहातात.

तेव्हा आपण अशी चौकशी समिती नेमून नव्या चुकांना अटकाव का करत नाही.


**प्रमोदिनी वडके-कवळे**


प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०, सुखसागरनगर क्र. २,

गल्ली क्र. १०, कोंढवा बुद्रुक, पुणे ४११ ०४८.



## आगामी

# सर्कल ऑफ लाइट




**किरणजीत अहलुवालिया**
**राहिला गुप्ता**

अनु. उषा महाजन

किरणजीत अहलुवालियाची कहाणी ही तशी भयानक व धक्कादायक असली तरी तिचा शेवट मात्र आश्वासक आहे. अतिशय कठीण परिस्थितीतही जगण्याची दुर्दम्य इच्छा व आशावाद यांचं ज्वलंत उदाहरण म्हणजेच ही जीवनगाथा!

नवे कोरे




# प्रस्थान

**रेखा बैजल**

१५०रु. पोस्टेज २५रु.

निश्चल उभा हिमालयही असतो. हे सुख दु:ख अंगावर चालून येतं. वादळासारखं! व्यक्तिमत्त्वाच्या चिंध्या करत, पण एक लक्षात ठेव प्रणव, समुद्री वादळात जेव्हा जहाज अडकतं आणि कॅप्टन गोंधळतो तेव्हा त्याला 'आय ऑफ स्टॉर्म' दाखवला जातो. त्या वादळाचा मध्यबिंदू म्हण. त्या मध्यबिंदूत निरव शांतता असते. अगदी आश्चर्यकारक. जहाजाला त्या 'आय ऑफ स्टॉर्म'मध्ये नेलं की जहाज सुरक्षित राहातं.

तसंच अंतर्मनात एक कोपरा एवढा निश्चल, निवांत निर्माण करावा लागतो की आयुष्यात कितीही वादळं आली तरी त्या क्षणी मनाला त्या कोपऱ्याचा आसरा घेता यायला हवा. असा कोपरा प्रयत्नानंच निर्माण करता येतो. स्वत:ला विसरून, विखरून, ध्यानात किंवा एखाद्या कामात. हे जीवनाचं रूप आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

मेहता पब्लिशिंग हाऊस

# २००९ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **द डेमन इन द फ्रीझर :** रिचर्ड प्रेस्टन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | २२०/- |
| **पीस ऑफ केक :** स्वाती कौशल | अनु. शोभना शिकनीस | २००/- |
| **ब्युटी क्वीन :** इरा त्रिवेदी | अनु. अपर्णा वेलणकर | २२०/- |
| **द सिमीऑन चेंबर :** स्टीव्ह मार्टिनी | अनु. जयवंत चुनेकर | २५०/- |
| **शांतिदूत :** नॅन्सी यी फान | अनु. मंजूषा आमडेकर | १५०/- |
| **स्लमडॉग मिलेनिअर :** विकास स्वरूप | अनु. वन्दना अत्रे | २००/- |
| **मिराज :** बंडुला चंद्ररत्ना | अनु. सुनंदा अमरापूरकर | १३०/- |
| **ॲन आय फॉर ॲन आय** : बंडुला चंद्ररत्ना | अनु. सुनंदा अमरापूरकर | १२०/- |
| **वेस्टेड :** मार्क जॉन्सन | अनु. स्नेहल जोशी | २५०/- |
| **द अफगाण :** फ्रेडरिक फॉर्सिथ | अनु. बाळ भागवत | २००/- |
| **जिगर** : 'अग्नी' श्रीधर | अनु. उमा कुलकर्णी | ६०/- |
| **द व्हाईट टायगर** : अरविंद अडिगा | अनु. लीना सोहोनी | २००/- |
| **द रनअवे ज्यूरी** : जॉन ग्रिशॅम | अनु. अनिल काळे | ३५०/- |
| **मार्कर** : रॉबिन कुक | अनु. अनिल काळे | ३५०/- |
| **एन्जल्स ॲण्ड डेमन्स** : डॅन ब्राऊन | अनु. बाळ भागवत | ३२०/- |
| **माय नेम इज सल्मा** : फादिया फकीर | अनु. स्नेहल जोशी | २००/- |
| **ॲंबिग्युअस लॉस** : डॉ. पॉलिन बॉस | अनु. सुनंदा अमरापूरकर | १२०/- |
| **फॅमिली** : मंजू कपूर | अनु. सुनंदा अमरापूरकर | २७०/- |
| **शूट टू किल** : स्कॉट ग्रॅहॅम | अनु. डॉ. देवदत्त केतकर | १५०/- |
| **शापित वास्तू** : नॅथनिल हॉथॉर्न | अनु. शंकर पाटील | २५०/- |
| **बकुळा** : सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी | १२०/- |
| **जमेका इन** : डॅफने दयू मोरियेर | अनु. स्नेहल जोशी | २२०/- |
| **हिरॉईन ऑफ द डेझर्ट** : डोन्या अल्-नहि | अनु. शोभना शिकनीस | १५०/- |

| | | |
|---|---|---|
| **जॅपनिज मॅग्नेलिया :** रेई किमुरा | अनु. निर्मला मोने | २००/- |
| **अदान ॲण्ड ईव्हा :** अयान हिरसी अली ॲना ग्रे | अनु. उज्ज्वला गोखले | ५०/- |
| **डिसेप्शन पॉईंट :** डॅन ब्राऊन | अनु. अशोक पाध्ये | ५००/- |
| **अमिना :** मोहम्मद उमर | अनु. उदय भिडे | २२०/- |
| **वन नाईट @ द कॉल सेंटर** : चेतन भगत | अनु. सुप्रिया वकील | २२०/- |
| **द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ** चेतन भगत | अनु. सुप्रिया वकील | २२०/- |
| **आवरण :** डॉ.एस.एल. भैरप्पा | अनु. उमा कुलकर्णी | २५०/- |
| **अनादि-अनंत :** आद्य रंगाचार्य (श्रीरंग) | अनु. उषा देसाई/ अविनाश देसाई | १२०/- |
| **द सटन बग :** ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २८०/- |
| **द नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी** अलेक्झांडर मॅक्काल स्मिथ | अनु. नीला चांदोरकर | २००/- |
| **शल्य** | मालती जोशी | ८०/- |
| **पितृऋण :** सुधा मूर्ती | अनु. मंदाकिनी कट्टी | ७०/- |
| **एनस्लेव्हड :** राहिला गुप्ता | अनु. सुनीति काणे | ३००/- |
| **शिंडलर्स लिस्ट :** थॉमस केनेली | अनु. संजय दाबके | ३००/- |

## कथासंग्रह

| | | |
|---|---|---|
| **चिताक** | महादेव मोरे | १५०/- |
| **प्रकाशाची झाडे** | वसु भगत | २००/- |
| **सामान्यांतले असामान्य :** सुधा मूर्ती | अनु. उमा कुलकर्णी | १३०/- |
| **आकाशवेध** | गिरिजा कीर | १३०/- |
| **आपण माणसात जमा नाही** | राजन गवस | १५०/- |
| **केवळ मैत्रीसाठी...** | उमेश कदम | १३०/- |
| **आंधळी कोशिंबीर** : चेतन जोशी | अनु. सुभाष जोशी | २४०/- |
| **वसुदेवे नेला कृष्ण** | शुभदा गोगटे | १८०/- |
| **अस्मानी** | शुभदा गोगटे | १८०/- |
| **घर** | शुभदा गोगटे | १६०/- |
| **सतीचं वाण** | व. कृ. जोशी | १५०/- |

| | | |
|---|---|---|
| **गुन्हा कबूल!** | व. कृ. जोशी | १९०/- |
| **पाठलाग** | व. कृ. जोशी | १४०/- |
| **विज्ञान पोलीसकथा** | व. कृ. जोशी | १२०/- |
| **कॅट ओ नाईन टेल्स :** जेफ्री आर्चर | अनु. लीना सोहोनी | २००/- |
| **कर्णपिशाच्च** | डॉ. बाळ फोंडके | २२०/- |

## आत्मकथन

| | | |
|---|---|---|
| **इन द नेम ऑफ ऑनर :** मुख्तार माई | अनु. उल्का राऊत | ८०/- |
| **मेरा परिवार :** नटालिया फ्लौमर | अनु. विमल लिमये | १२०/- |
| **इट्स नॉट अबाउट द बाइक** : लान्स आर्मस्ट्राँग, | अनु. अंजनी नरवणे | २४०/- |
| **विमुक्ती** | दिपा महानवर | २२०/- |
| **माय फॅमिली इज ऑल आय हॅव** : हेलन-ॲलीस डिअर | अनु. चित्रा वाळिंबे | २२०/- |
| **द डायरी ऑफ मेरी बर्ग :** एस. एल. श्नायडरमन | अनु. शोभना शिकनीस | १८०/- |
| **अ वुमन्स करेक :** जॅकलिन गोल्ड | अनु. प्रशांत तळणीकर | २२०/- |
| **''मी अनीता राकेश सांगतेय...'' :** अनीता राकेश | अनु. रजनी भागवत | १६०/- |

## व्यक्तिचरित्रे

| | | |
|---|---|---|
| **नवभारताचे शिल्पकार :** वीर संघवी | अनु. सुप्रिया वकील | १००/- |
| **प्रतिकूलतेवर मात :** ए. जी. कृष्णमूर्ती | अनु. सुप्रिया वकील | ७०/- |
| **क्रांतिसूर्य** | विश्वास पाटील | १३०/- |

## ललित गद्य - पद्य

| | | |
|---|---|---|
| **पॉपकॉर्न** | सुप्रिया वकील | ८०/- |

## अनुभवकथन

| | | |
|---|---|---|
| **बाळमासा :** लिन कॉक्स | अनु. विदुला टोकेकर | ८०/- |
| **ॲज आय सी... नेतृत्व आणि प्रशासन :** किरण बेदी | अनु. माधुरी शानभाग | १८०/- |
| **ॲज आय सी ... स्त्रियांचे सक्षमीकरण :** किरण बेदी | अनु. माधुरी शानभाग | १२०/- |

| | | |
|---|---|---|
| **ॲज आय सी... भारतीय पोलीस सेवा :** किरण बेदी | अनु. माधुरी शानभाग | १३०/- |
| **इट हॅपन्ड् इन इंडिया :** किशोर बियाणी, दीपायन बैश्य | अनु. उषा महाजन | १८०/- |
| **कटिंग फ्री :** सलमा अहमद | अनु. सुप्रिया वकील | २६०/- |
| **त्यांच्या सिंड्रोमची कथा** | कल्पना चारुदत्त | १३०/- |
| **इराणमधून सुटका :** सुझान आझादी, अँजेला फेरान्ते | अनु. विदुला टोकेकर | २५०/- |
| **कटिंग फ्री :** सलमा अहमद | अनु. सुप्रिया वकील | २६०/- |

## अनुवादित वैचारिक

| | | |
|---|---|---|
| **ऐका संतांनो :** ओशो | अनु. प्रज्ञा ओक | १२०/- |
| **साद घालतो कबीर** : ओशो | अनु. मीना टाकळकर | २२०/- |

## व्यक्तिमत्त्व विकसन

| | | |
|---|---|---|
| **चॅम्पियन व्हा!** | डॉ. रमा मराठे | २२०/- |

## चिकन सूप मालिका

| | | |
|---|---|---|
| **चिकन सूप फॉर द टीनएज सोल :** जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, किम्बर्ली किर्बर्जर | अनु. सुप्रिया वकील | १६०/- |
| **चिकन सूप फॉर द मदर्स सोल :** जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, जेनिफर रीड हॉथॉर्न, मॅर्सी शिमॉफ | अनु. सुप्रिया वकील | २००/- |
| **चिकन सूप फॉर द सोल ॲट वर्क :** जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, मार्टीन रूट, मायदा रॉजरसन, टीम क्लूस | अनु. श्यामला घारपुरे | १६०/- |

## संदर्भ ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| **मराठी भाषा उद्गम व विकास** | कृ. पां. कुलकर्णी | ३२०/- |

## मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| **केल्याने होत आहे रे...** | संजीव परळीकर | ६०/- |
| **विक्रीकौशल्य शिका** | संजीव परळीकर | ५०/- |

| | | |
|---|---|---|
| **हे वयच वेडं असतं !** | शुभांगी खासनीस<br>केतकी काळे/प्रसन्न रबडे | २००/- |
| **मनगंगेच्या काठावरती** | डॉ. रमा मराठे | १२०/- |
| **व्हाय मेन डोन्ट लिसन अ‍ॅण्ड विमेन कान्ट रीड मॅप्स :** बार्बरा आणि अ‍ॅलन पीस | अनु. शुभदा विद्वांस | १२०/- |
| **प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स :** अ‍ॅलेक्स पॅटाकोस | अनु. डॉ. विजया बापट | १४०/- |
| **अर्थाच्या शोधात :** व्हिक्टर फ्रॅन्कल | अनु. डॉ. विजया बापट | १३०/- |
| **सुखद बालसंगोपन** | डॉ. रत्नावली दातार | ६०/- |

## वैज्ञानिक

| | | |
|---|---|---|
| **खेळणी विज्ञानाची** | डी. एस. इटोकर | ८०/- |

## बालवाङ्मय

| | | |
|---|---|---|
| **हॅरी पॉटर आणि अग्निचषक** : जे.के.रोलिंग | अनु. मंजूषा आमडेकर | ३२५/- |
| **गोष्टी पानोपानी** | ईशान पुणेकर | ३०/- |
| **गोष्टी मनोमनी** | ईशान पुणेकर | ३०/- |
| **गोष्टी कानोकानी** | ईशान पुणेकर | ३०/- |
| **परोपकारी तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **मजेदार तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **हुशार तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **विनोदवीर तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **चंपी मालीश आणि था..था..था!** | राजीव तांबे | ३०/- |
| **गुळाची ढेप आणि सरबत** | राजीव तांबे | ३०/- |
| **सू सुटका आणि रंगीत डोंगर** | राजीव तांबे | ३०/- |
| **दांडोबा राक्षस आणि गुळगुळीत मावशी** | राजीव तांबे | ३०/- |
| **चालणारे बूट** आणि मजेदार गोष्टी | संस्मिता गुप्ते | ५०/- |
| **पिनू-चिनूची चतुराई** आणि मजेदार गोष्टी | संस्मिता गुप्ते | ५०/- |
| **जादूचा अंगरखा** आणि मजेदार गोष्टी | संस्मिता गुप्ते | ५०/- |

| | | |
|---|---|---|
| **पतंगाची करामत** आणि मजेदार गोष्टी | संस्मिता गुप्ते | ५०/- |

## फ्रँकलिन मालिका

| | | |
|---|---|---|
| फ्रँकलिनची दादागिरी | अनु. मंजूषा आमडेकर | ५०/- |
| फ्रँकलिन थाप मारतो | अनु. मंजूषा आमडेकर | ५०/- |
| फ्रँकलिन आणि दंतपरी | अनु. मंजूषा आमडेकर | ५०/- |
| फ्रँकलिन आणि अंधारगुडुप | अनु. मंजूषा आमडेकर | ५०/- |
| फ्रँकलिन आणि पाळीव प्राणी | अनु. मंजूषा आमडेकर | ५०/- |
| फ्रँकलिनचा पसारा | अनु. मंजूषा आमडेकर | ५०/- |
| फ्रँकलिन हरवतो | अनु. मंजूषा आमडेकर | ५०/- |
| फ्रँकलिन आणि फुटबॉल स्पर्धा | अनु. मंजूषा आमडेकर | ५०/- |
| चल,आटप लवकर,फ्रँकलिन | अनु. मंजूषा आमडेकर | ५०/- |

## द सीक्रेट सेव्हन मालिका

| | | |
|---|---|---|
| **द सीक्रेट सेव्हन** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **शाब्बास, सीक्रेट सेव्हन** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **आगे बढो, सीक्रेट सेव्हन** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **सीक्रेट सेव्हनची सरशी** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **सीक्रेट सेव्हन झिंदाबाद** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **सीक्रेट सेव्हन आणि रहस्य** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **सीक्रेट सेव्हन समोर कोडं** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **सीक्रेट सेव्हनची आतषबाजी** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **'गुणवान' सीक्रेट सेव्हन** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **सीक्रेट सेव्हनला धक्का** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **सावधान! सीक्रेट सेव्हन** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |
| **सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत** | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८०/- |

**www.mehtapublishinghouse.com**

**आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.**

# पुरस्कार

*** राज्य सरकारचे साहित्य पुरस्कार वर्ष २००८ - २००९**

उत्कृष्ट मराठी वाङ्मयनिर्मितीसठी राज्य शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. यावर्षी या स्पर्धेत विविध वाङ्मयप्रकारातील एकूण १ हजार ३०१ पुस्तकांचा विचार करण्यात आला. २००८-०९ या वर्षातील उत्कृष्ट मराठी वाङ्मयनिर्मितीच्या पुरस्कारसाठी ज्येष्ठ साहित्यिक आणि महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांच्या अध्यक्षतेखालील निवडसमितीने पुरस्कारांसाठी पुस्तकांची निवड केली आहे. सांगली येथील विष्णूदास भावे नाट्यमंदिर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत १४ फेब्रुवारी २०१० रोजी पुरस्कार प्रदान समारंभ आयोजित करण्यात आल्याचे सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे कळविण्यात आले आहे.

| **पुरस्कार** | **पुस्तकाचे नाव** | **लेखक** |
|---|---|---|
| कादंबरी | तत्रैव | डॉ. राजन खान |
| | श्रावण सोहळा | संजय जोशी |
| चरित्र | वॉल्ट डिस्ने | यशवंत रांजणकर |
| | मनश्री | सुमेध वडावाला |
| | अंगारमळा | शरद जोशी |
| | गंगा आये कहाँ से | गुलजार |
| | एका दिग्दर्शकाचा प्रवास | विजय पाडळकर |
| | कथा आधुनिक दंडकारण्याची | अरुणा अंतरकर |
| काव्य | स्वप्नसंहिता | डॉ. यशवंत मनोहर |
| | कुणीच कसे बोलत नाही | अशोक कोतवाल |
| | काळोखाच्या तळाशी | कै. ऋत्विज काळसेकर |
| | मृगजळीचा मासा | कविता महाजन |
| नाटक | बुद्धिबळ आणि झब्बू | चंद्रकांत देशपांडे |
| | खेळीमेळी | चंद्रशेखर फणसळकर |

| | | |
|---|---|---|
| | आसाचा फेरा | जगतकुमार पाटील |
| | जिंकू या दाही दिशा | ज्ञानेश महाराव |
| कादंबरी | अंत ना आरंभही | अंबिका सरकार |
| | झुंड | शरणकुमार लिंबाळे |
| | अवशेष | राजा कदम |
| | झिम पोरी झिम | बालाजी इंगळे |
| लघुकथा विभाग | तळाकाठच्या सावल्या | अनिल कुलकर्णी |
| | प्रकाशाची झाडे | वसु भगत |
| | खुंदळघास | सदानंद देशमुख |
| ललितगद्य विभाग | नॉट गॉन विथ द विंड | विश्वास पाटील |
| | किरणपाणी | महावीर जोंधळे |
| | नव्या क्षितिजाच्या प्रदेशात | प्रकाश कुलकर्णी |
| | पॉपकॉर्न | सुप्रिया वकील |
| एकांकिका विभाग | रहस्यभेदी | डॉ. विनीता परांजपे |
| | बादशहा आणि इतर | अविनाश चिटणीस |
| | अस्वस्थ, तरीही | डॉ. सतीश साळुंके |
| विनोदी विभाग | झुळूक अमेरिकन तोऱ्याची | डॉ. शरद वर्दे |
| संकीर्ण विभाग | मैत्र जीवाचे | विदुर महाजन |
| ललित विज्ञान विभाग | जीवनमृत्यूच्या सीमारेषेवरून | डॉ. प्राची साठे |
| | कल्पित-अकल्पित | सुधा रिसबुड |
| | देशोदेशीच्या विज्ञानेश्वरी | डॉ. अजित पाटील |
| चरित्र | भोगले जे दुःख त्याला | आशा आपराद |
| समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र | रुजुवात | अशोक केळकर |
| | संगीतविचार | डॉ. अशोक रानडे |
| | टीकावस्त्रहरण | डॉ. आनंद पाटील |
| इतिहास विभाग | झुंजार पुणे : वसाहतवाद व सामाजिक विषमतेशी लढा | के. के. चौधरी |
| | मराठ्यांच्या सामाजिक सांस्कृतिक इतिहास खंड | डॉ. साहेब खंदारे |
| अर्थशास्त्र विभाग | नवप्रवर्तन सूत्र आर्थिक विकासाचे | सी. पं. खेर |
| | आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते | यशवंत पंडितराव |
| राज्यशास्त्र व समाजशास्त्र | राष्ट्र आणि राष्ट्रवाद | डॉ. सुधाकर देशमुख |

| | | |
|---|---|---|
| विभाग | | |
| शिक्षणशास्त्र | बदलते शिक्षण : | |
| | स्वरूप आणि समस्या | डॉ. जनार्दन वाघमारे |
| | विधिमंडळे आणि न्यायसंस्था | न्या. नरेंद्र चपळगावकर |
| | संघर्षाचे सहजीवन | |
| | नवपार्थहृद्‌गत | राजीव साने |
| | परीक्षेला पर्याय काय? | हेरंब कुलकर्णी |
| भाषाशास्त्र व व्याकरण | भाषिक भ्रमंती | डॉ. हरिश्चंद्र बोरकर |
| भौतिकशास्त्र व तंत्रविज्ञान | कृतिप्रधान विज्ञान अध्यापन | विनोदकुमार सोनावणे / सुधाकर आगरकर |
| | निसर्गातील नॅनो रचना | डॉ. रामचंद्र नेऱ्हे / |
| | विज्ञान आणि तंत्रज्ञान | डॉ. सुलभा कुलकणी |
| दलित, पददलितावरील आदर्श साहित्य विभाग | आदिवासी साहित्य विचार | प्रा. डॉ. माहेश्वरी गावित |
| अनुवादित वाङ्मय | कवितान्तरण | चंद्रकांत पाटील |
| | द डार्क होल्ड्स नो टेरर्स | प्रा. पुरुषोत्तम देशमुख |
| संपादित विभाग | मराठी वाङ्मय व्यवहार : चिंतन आणि चिंता | अविनाश पाठक |
| आधारित विभाग | म्हणी कांचन | प्रा. डॉ. विठ्ठल वाघ |
| संशोधन विभाग | तमाशातील सोंगाड्या | भिवाजी शिंदे |
| ललितकला आस्वाद | रंगमुद्रा | माधव वझे |
| शेती व शेतीपूरक लेखन | अशी फुलवा परसबाग | डॉ. राजेंद्र देशमुख |
| | पाणलोट विहिरी | शामराव कदम |
| शेतीपूरक व्यवसायलेखन | किमया रेशीम शेतीतून लक्षाधीश होण्याची | कॅ. डॉ. लक्ष्मीकांत कलंत्री / डॉ. अधिकराव जाधव / डॉ. संजय धामणे |
| क्रीडा वाङ्मय | क्रीडा गाथा | नंदू नाटेकर |
| संगणक व इंटरनेट | किमया फोटोशॉपची | प्रा. सुभाष पवार |
| बृहन्महाराष्ट्र पुरस्कार | सागरशाळा | देवेंद्र कांदोळकर |
| | नंतर | पांडुरंग गावकर |

**बालवाङ्मय विभागातील पुरस्कार**

| | | |
|---|---|---|
| कविता | गंमतगाणी | एकनाथ गायकवाड |
| | खारुताई आणि सावलीबाई | डॉ. संगीता बर्वे |

| | | |
|---|---|---|
| चरित्रे | मारिया मॉन्टेसरी | ल. म. कडू |
| | मुलांचे पद्मभूषण | |
| | डॉ. जे. पी. नाईक | प्रा. श्रीकांत नाईक |
| सर्वसामान्य ज्ञान | असे आहे ऑलिंपिक | हेमंत जोगदेव |
| (छंद व शास्त्रे) | विज्ञान गमती, आपल्या | |
| | सभोवताली | प्रकाश नवाळे |
| नाटक व एकांकिका | अनूची आई | डॉ. सतीश साळुंके |
| | भूमिपुत्रांचे वनपूजन | श्रीनिवास शिंदगी |
| बालकादंबरी/छोट्या गोष्टी/ | कर्मयोगी | शैलजा काळे |
| परीकथा / लोककथा | प्रकाशाची दारे | गिरिजा कीर |
| | दूरदेशीच्या लोककथा भाग ५ | |
| | अदृश्य करणारी हॅट | |
| | आणि इतर कथा | डॉ. प्रभाकर चौधरी |
| | छत्रीची जादू आणि इतर कथा | राजीव तांबे |
| ललितगद्य/बालसाहित्य | महापुरुषांचे चिंतन | डॉ. भगवान अंजनीकर |
| समीक्षा व संकीर्ण | बालसाहित्य : मराठवाड्याचे | |
| | नवे स्वरूप नव्या वाटा | अरुण देशपांडे |
| | कॉमिक्सचे विश्व | प्रा. संजय कप्तान |

### * लता मंगेशकर यांना फ्रान्सचा पुरस्कार

''मी माझ्या आयुष्यात कशाचीही अपेक्षा केली नाही किंवा अमुक एखादी गोष्ट आपल्याला मिळावी, असे कधी म्हटले नाही. मला माझ्या आयुष्यात काही गोष्टी आपोआप मिळत गेल्या. पुरस्कारांच्या बाबतीतही मी असेच म्हणेन. आतापर्यंत मला अनेक पुरस्कार मिळाले. ही सर्व देवाची कृपा आहे, असेच मला वाटते,'' अशी प्रतिक्रिया गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांनी फ्रान्सचा सर्वोच्च नागरी पुरस्कार जाहीर झाल्यावर व्यक्त केली.

फ्रान्स सरकारचा 'ऑफिसीए द ला लिजिआँ दॉनर' हा सर्वोच्च पुरस्कार लतादीदींना प्रदान करण्यात आला. त्याबाबत त्या म्हणाल्या, ''या पुरस्काराचे महत्त्व आपल्याकडील 'भारतरत्न' एवढेच मोठे आहे. त्या देशात हा पुरस्कार सर्वोच्च मानला जातो. मला आतापर्यंत अनेक पुरस्कार मिळाले. अनेकदा सन्मान झाला. त्या वेळी मला जितका आनंद झाला, तितकाच आजही झाला. माझ्या आई-बाबांचे आशीर्वाद आणि देवाच्या कृपेमुळेच हे सर्व घडत आहे.''

*** सुलोचना यांना महाराष्ट्रभूषण पुरस्कार**

''पुरस्कार मिळाल्याचा आनंद झाला. महाराष्ट्रातील हा सर्वोत्कृष्ट पुरस्कार आहे आणि हा मिळणे फार महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रात जनमल्याचे सार्थक झाले.'' या शब्दांत सुलोचनादीदींनी 'महाराष्ट्रभूषण' पुरस्काराविषयीची भावना व्यक्त केली.

महाराष्ट्र सरकारतर्फे देण्यात येणारा मानाचा महाराष्ट्रभूषण पुरस्कार सुलोचनादीदींना जाहीर झाला. सुलोचनादीदी म्हणाल्या, ''इतर पुरस्कारांशी या पुरस्काराची तुलना करता येणार नाही. हा पुरस्कार मला उशिरा मिळाला, असे नाही. कारण, माझ्याव्यतिरिक्त बरीच मोठी मंडळी महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे थोडे मागे-पुढे झाले तर त्याची खंत वाटता कामा नये. हा पुरस्कार मी माझे गुरू भालजी पेंढारकर यांना अर्पण करते. मला चालता-बोलता येत नव्हते; तसेच अभिनयाचा गंधही नव्हता. भालजींनी मला हे सर्व शिकवले.''

*** जगदीश खेबुडकर यांना जीवनगौरव पुरस्कार**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेच्या वतीने आयोजित विभागीय साहित्य संमेलनात खेबुडकर यांना प्रभादेवी खानोलकर आणि रजनी पोकळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ साहित्य जीवनगौरव पुरस्कार पं. मंगेशकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रवीण दवणे, संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी, ॲड. विजय पाळेकर, गुलाब बिरदवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

होनाजी बाळा आणि जगदीश खेबुडकर यांच्या लावण्यांमधील वजन आणि वचने सारखीच असल्याचे सांगून पं. मंगेशकर म्हणाले, होनाजी बाळा यांच्या लावण्या अश्लील होत्या. गदिमांनी त्या लावण्याचे संपादन केले. त्याचा संस्कार जगदीश खेबुडकर यांच्यावर झाला. अनुभवसमृद्धता, अनुभूती आणि जीवनदृष्टी या गोष्टी जेव्हा एका संकल्पनेच्या पातळीवर उभ्या राहतात; त्यावेळी खेबुडकरांसारखे कवी निर्माण होतात. त्यांच्या प्रतिभेला वेगळा स्पर्श आहे. त्यामुळेच गदिमा, शांता शेळके आणि पी. सावळाराम यांच्यासारख्या दिग्गज गीतकारांमधून त्यांनी वाट काढून आपले स्थान पक्के केले. खेबुडकरांना देवाने प्रचंड उत्साह आणि ऊर्मी दिली आहे. त्यामुळे ते हजारो गाणी लिहू शकले. त्यांची गाणी हे साहित्यच वाटते, असे मत संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

*** पद्मनाभन यांना इन्फोसिसचा पुरस्कार**

पुण्यातील आंतरविद्यापीठ खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी केंद्राचे (आयुका) अधिष्ठाता डॉ. टी. पद्मनाभन यांच्यासह पाच शास्त्रज्ञांना 'इन्फोसिस सायन्स फाउंडेशन'चा पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रत्येकी पन्नास लाख रुपयांचे हे पुरस्कार पंतप्रधान

मनमोहन सिंग यांच्या हस्ते दिल्लीत समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहेत. या पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष आहे.

अलाहाबाद येथील अशोक सेन (गणित), बंगळूर येथील के. विजय राघवन (जैवविज्ञान), 'मॅसॅच्युसेट्स इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'मधील अभिजित विनायक बॅनर्जी (अर्थशास्त्र) आणि दिल्लीतील उपेंद्र सिंह (प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास) हे या पुरस्कारांचे अन्य मानकरी आहेत. 'इन्फोसिस'चे संस्थापक एन. नारायणमूर्ती यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. 'इन्फोसिस'च्या या पुरस्कारामुळे आपल्याला मोठा आनंद झाल्याची भावना डॉ. पद्मनाभन यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, ''विज्ञानासारख्या क्षेत्रात अशा प्रकारचा मोठा पुरस्कार सुरू करण्याचा 'इन्फोसिस'चा उपक्रम कौतुकास्पद आहे. उद्योगजगताने घेतलेला हा पुढाकार शास्त्रज्ञांना प्रोत्साहन देणारा आहे.'' डॉ. पद्मनाभन यांनी आइन्स्टाईनच्या उष्मगतिक शास्त्राच्या संदर्भातील गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त आणि कॉस्मोलॉजी याबाबत संशोधन केले आहे. त्याची दखल घेऊन 'इन्फोसिस'ने पुरस्कार जाहीर केला आहे.

नारायणमूर्ती म्हणाले, ''सामाजिकशास्त्रे आणि विज्ञानातील जागतिक दर्जाच्या संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी गेल्या फेब्रुवारीत इन्फोसिस सायन्स फाउंडेशनची स्थापना करण्यात आली. पुरस्कार विजेत्यांची निवड करण्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमण्यात आली होती.'' हा पुरस्कार भविष्यात भारताचा नोबेल पुरस्कार ठरेल, असा विश्वास केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री कपिल सिब्बल यांनी व्यक्त केला. त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे या कार्यक्रमात भाग घेतला.

*** निखिल वागळे यांचा सत्कार**

''समाजपरिवर्तन, क्रांती करणाऱ्या नेत्यांवर केवळ स्तुतिसुमने उधळण्याऐवजी त्यांच्या विचारांनुसार आव्हाने स्वीकारली पाहिजेत,'' असे ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांनी 'भारतीय राज्यघटना व विचारस्वातंत्र्य' या विषयावरील परिसंवादात व्यक्त केले. या वेळी पत्रकार निखिल वागळे यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार जतिन देसाई, शाहीर संभाजी भगत यावेळी उपस्थित होते.

वागळे म्हणाले, ''सत्यसाईबाबांवर टीका केल्याने चव्हाण माझ्यावर नाराज झाले होते. त्यामुळे या हल्ल्यात विरोधकांबरोबर सत्ताधारीही एकत्र आले होते. हल्ला झाल्यानंतर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी 'मराठी मुलांना दारू पाजून त्यांच्यामार्फत अशी कृत्ये करण्यापेक्षा तुमच्यात हिंमत असेल तर मला गोळी घाला' असे दूरध्वनी करून सांगितले. महाराष्ट्रात बौद्धिक मंथन थांबून लाचारी वाढल्यानेच 'वागळेंवरच हल्ले का होतात?' असे प्रश्न विचारले जातात. मी सत्य बोलतो, म्हणूनच हल्ले झाले आहेत.''

डॉ. लागू म्हणाले, ''सध्या जातीपातीचे स्तोम खूप माजले आहे. या पार्श्वभूमीवर, क्रांतीच्या विचारांची ज्योत पेटत ठेवून सतत पुढे नेण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यासाठी दैनंदिन व्यवहारात या विचारांचे पालन झाले पाहिजे. पराक्रमी विचारवंत व भेकड अशा दोनच जाती असल्याचे आपण मानतो. पराक्रमी विचारवंतांच्या जातीत आपण आहोत, याचा अभिमान वाटतो.''

*** विजया मेहता, डॉ. राजेंद्र चव्हाण यांना तन्वीर पुरस्कार**

नाटक हाच धर्म मानून त्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या ज्येष्ठ रंगकर्मी विजय मेहता यांना रूपवेध प्रतिष्ठानचा 'तन्वीर सन्मान' पुरस्कार आणि डॉ. राजेंद्र चव्हाण यांना 'तन्वीर नाट्यधर्मी पुरस्कार' देण्यात आला.

रंगभूमीसाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या कलांवतांना तन्वीर सन्मान पुरस्काराने गौरविण्यात येते. पुरस्काराचे हे सहावे वर्ष आहे. नऊ डिसेंबर रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात हा पुरस्कार ज्येष्ठ प्रकाशक रामदास भटकळ यांच्या हस्ते देण्यात आला. कार्यक्रमप्रसंगी ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले, पुष्पा भावे, वामन पंडित हे वक्ते म्हणून उपस्थित होते. मेहता यांना एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह तर डॉ. चव्हाण यांना तीस हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

इब्राहिम अल्काझींच्या थिएटर ग्रुपचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विजया मेहता यांनी १९५१ मध्ये रंगभूमीवर पदार्पण केले आणि नाट्यक्षेत्रातील जाणकारांचे लक्ष वेधून घेतले. विविध नाट्यसंस्थांसाठी 'शितू', 'तुझे आहे तुजपाशी', 'सुंदर मी होणार', 'झुंझारराव', 'संशयकल्लोळ' यासारख्या नाटकांमधून त्यांनी केलेल्या भूमिका लक्षवेधी ठरल्या. १९६० मध्ये समविचारी सहकाऱ्यांसह त्यांनी रंगायन ही प्रायोगिक नाट्यसंस्था सुरू केली. त्या चळवळीतून पुरोगामी नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते यांची फौज तयार झाली. 'मी जिंकलो, मी हरलो', 'एक शून्य बाजीराव' यासारखी विजय तेंडुलकरांची नाटके, महेश एलकुंचवार यांच्या एकांकिका अशा सुमारे तीस नाटकांचे त्यांनी दिग्दर्शन केले. १९७४ नंतर त्यांनी व्यावसायिक नाटकात भूमिका करण्यास प्रारंभ करून दिग्दर्शनास सुरुवात केली. 'हमीदाबाईची कोठी', 'संध्याछाया', 'वाडा चिरेबंदी', 'शकुंतला', 'हयवदन' आदी त्यांची नाटके लोकप्रिय ठरली. १९७५ साली त्यांना संगीत नाटक अकादमीने श्रेष्ठ दिग्दर्शक म्हणून गौरविले. पद्मश्री, फ्रेन्ड्स ऑफ दि पीपल, एस. एन. डी. टी. विद्यापीठाची डी. लिट पदवी यांनी त्यांना सन्मानित करण्यात आले.

तन्वीर नाट्यधर्मी पुरस्कार हा देवगड तालुक्यातील शिरगाव येथील डॉ. राजेंद्र चव्हाण यांना देण्यात आला. एमबीबीएसची पदवी घेतल्यानंतर नायर हॉस्पिटलमध्ये

शिकताना डॉ. चव्हाण यांनी नाटकाचे धडे घेतले. मुलांच्या मानसिकतेचा वेध घेऊन त्यांनी गावामध्ये बालनाट्य चळवळ उभारली. पंधराहून अधिक एकांकिका लिहून त्या स्वत: बसविल्या. बालकलाकारांच्या नाडीचे अचूक परीक्षण करणारे डॉक्टर असा त्यांचा गौरव डॉ. लागू यांनी केला.

*** महात्मा फुले समता पुरस्कार**

महात्मा फुले समता परिषदेतर्फे देण्यात येणारा 'महात्मा फुले समता पुरस्कार' ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांना उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील, मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, गृहराज्यमंत्री रमेश बागवे, खासदार समीर भुजबळ, आमदार पंकज भुजबळ, अंकुश काकडे बाळासाहेब शिवरकर, जयदेव गायकवाड, कृष्णकांत कुदळे, राजू घोटोळे उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री छगन भुजबळ म्हणाले, समतेचे काम करणाऱ्यांसाठी महात्मा फुले वाडा हे ऊर्जा केंद्र आहे. शिक्षणाची कवाडे आणि सामाजिक समता प्रस्थापित करणारे शाहू, फुले, आंबेडकर हेच आमचे दैवत आहेत. जातीयवाद, बालविवाह, भ्रूणहत्या आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी महात्मा फुले यांनी सांगितलेल्या विचारांप्रमाणे काम करण्यासाठी वचनबद्ध होणे आवश्यक आहे.

डॉ. रावसाहेब कसबे म्हणाले, समाजातील सर्व समस्यांवर शिक्षण हे उत्तर आहे, असे प्रथम महात्मा फुले यांनी सांगितले. फुले हे कार्ल मार्क्सच्या पुढे हाते. हिंदुस्थानाच्या इतिहासाचे फुले, आंबेडकर यांच्या दृष्टिकोनातून पुनर्लेखन झाले पाहिजे. फुले यांनी पहिल्यांदा शेतकऱ्यांचे प्रश्न गांभीर्याने मांडले. विधानसभा निवडणुकीमध्ये कधी नव्हे एवढा जातीय, प्रांतवाद उफाळून आला. त्यामुळे लोकशाही प्राणपणाने जपणे, हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल.

*** दक्षिण भारत जैन सभा पुरस्कार**

दक्षिण भारत जैन सभेचे ९०वे नैमित्तिक अधिवेशन बोरिवली, पोदनपूर येथील तीन मूर्ती मंदिरात झाले. यंदापासून सभेच्या वतीने 'प्रभात'कार कै. वा. रा. कोठारी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आदर्श पत्रकारिता पुरस्कार देण्यात येत असून, पहिला पुरस्कार 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर केतकर यांना देण्यात आला.

एमआयटीचे अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते त्रिपुराचे नवनियुक्त राज्यपाल शिक्षणमहर्षी डॉ. डी. वाय. पाटील यांना कर्मवीर भाऊराव पाटील सामाजिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानचिन्ह व रोख ११ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

कुमार केतकर म्हणाले की, जैन समाजाचा विश्वशांतीचा संदेश हा फार

महत्त्वाचा आहे. मुंबईवरील दहशतवादी हल्ला होऊन एक वर्ष होत आहे. याचा अर्थ यापुढे दहशतवादी हल्ले होणार नाहीत, असा नाही. देशात मोठ्या व्यक्तींचे खून, हत्या, हत्याकांड, हिंसाचार चालूच राहण्याची भीती आहे. देशातील ११० कोटी जनतेपैकी ७० टक्के लोक कसेबसे दारिद्र्यरेषेवर जीवन जगत आहेत. हेच लोण शहरात पसरेल. समाजातील विषमता दूर करण्यासाठी प्रभावी प्रयत्न होतील व त्याची फळे गरीब वर्गाला मिळतील, तेव्हाच सारे सुरळीत होईल. कर्मवीर भाऊराव पाटील हे थोर पुरुष होते. त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे हे मी भाग्य मानतो.

''योगायोग असा की, कालच मी तीनमूर्ती, पोदनपूर येथे भगवान महावीरांच्या भूमीत येण्याचे मान्य केले आणि थोड्याच वेळात त्रिपुराच्या राज्यपालपदी नेमणूक झाल्याचे पत्र हाती पडले हा दैवी संकेत वाटतो'' असे डॉ. डी. वाय. पाटील यांनी सांगितले. महावीरांचा संदेश हा विश्वास निर्माण करणारा आहे, असे सांगून डॉ. पाटील पुढे म्हणाले की जैन समाजाला भगवान महावीरांचे मार्गदर्शन मिळाले आहे. दुष्प्रवृत्ती त्यांच्यात नाही, हे सत्य आहे.

'भारतातील लोकांना विज्ञान माहीतच नव्हते, असा मोठा गैरसमज बाहेरच्या देशात पसरला आहे; पण तीन-चार हजार वर्षांपूर्वी कृष्णाने अर्जुनाला विज्ञान समजावून सांगितले,' असे प्रतिपादन डॉ. विश्वनाथ कराड यांनी केले. ''महाभारतात युद्धभूमीवर श्रीकृष्णाने गोंधळलेल्या अर्जुनाला, 'तुला खरे ज्ञान देतो', असे सांगून विज्ञानाचा उपदेश दिला. जैन धर्मानेही ज्ञान, विज्ञान प्राप्त केले. कधीही कोणाचा दु:स्वास केलेला नाही.''

स्वागत व प्रास्ताविक कल्लाप्पाण्णा यांनी केले, तर 'प्रभात'चे संपादक अरुण खोरे यांनी 'प्रभात'कार पत्रकारिता पुरस्कारासंबंधी माहिती दिली. महासभेचे महामंत्री मिलिंद फडे, प्रशांत शहा, महिला महासभेच्या प्रिया शहा, स्वागत समितीचे बापूसाहेब पाटील, महिला महासभेच्या प्रिया शहा, स्वागत समितीचे बापूसाहेब पाटील, 'प्रभात'चे व्यवस्थापकीय संचालक आनंद गांधी, सौ. इंदुमती आवाडे, शारदा साठे, ज्येष्ठ पत्रकार तानाजी कोलते, अरुण शेवते, ज्येष्ठ प्रकाशक श्रेणिक अन्नदाते हेही उपस्थित होते. याप्रसंगी दक्षिण भारत जैन समाजातर्फे लेखक व कार्यकर्त्यांनी पुरस्कार प्रदान करण्यात आले.

### * फिरोदिया पुरस्कार

विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल देण्यात येणाऱ्या एच. के. फिरोदिया पुरस्कारांसाठी या वर्षी ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. यशपाल आणि भारतीय चांद्रमोहिमेचे नेतृत्व करणारे शास्त्रज्ञ डॉ. एम. अण्णादुराई यांची निवड करण्यात आली. पुरस्काराचे हे चौदावे वर्ष आहे.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर आणि 'कायनेटिक ग्रुप'चे अध्यक्ष अरुण फिरोदिया यांनी एच. के. फिरोदिया पुरस्कारांची घोषणा केली. याआधी हा पुरस्कार माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, डॉ. एम. एस. स्वामिनाथन, डॉ. जयंत नारळीकर, डॉ. सी. एन. आर. राव, डॉ. जी. माधवन नायर आदी शास्त्रज्ञांना मिळाला आहे. एकविसाव्या शतकातील आव्हाने पेलण्यासाठी देशाच्या शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल सुचविणारे प्रा. यशपाल यांचे देशाच्या विज्ञान क्षेत्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान आहे. योगदानाबद्दल प्रा. यशपाल यांची एच. के. फिरोदिया जीवनगौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. दोन लाख रुपये, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

तामिळनाडूतील छोट्या खेड्यातून पुढे आलेल्या डॉ. एम. अण्णादुराई यांनी भारताच्या पहिल्या चांद्रमोहिमेचे नेतृत्व करून संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले. भारतीय उपग्रहांना स्वयंनियंत्रित करण्याची संगणकप्रणाली त्यांनी सर्वप्रथम विकसित केली. चांद्रयानाच्या यशाबद्दल त्यांची निवड झाली. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

*** डॉ. विजय भटकर यांना अमेरिकेतील फेलोशिप**

अमेरिकेतील 'असोसिएशन फॉर कॉम्प्युटिंग मशिनरी'चे 'सन्माननीय फेलो' म्हणून ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांची निवड झाली आहे.

सप्टेंबर १९४७ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेचे जगभरातील १०० देशांतून ९५ हजार सभासद आहेत. 'एसीएम'तर्फे काही मोजक्या संगणकतज्ज्ञांना भरीव कामगिरीबद्दल 'फेलो' म्हणून निवडून त्यांचा सन्मान करण्यात येतो. या वर्षी डॉ. भटकरांबरोबर भारतीय वंशाच्या आणखी चार तज्ज्ञांची 'एसीएम फेलो' म्हणून निवड झाली आहे.

*** 'प्राज'तर्फे महाआंतरप्रेन्युअर पुरस्कार**

जैवइंधन आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील प्राज इंडस्ट्रीजचा महाआंतरप्रेन्युअर पुरस्कार वितरण सोहळा हिंदुस्तान युनिलिव्हरचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन परांजपे यांच्या हस्ते झाला. कल्पकता आणि कौशल्याच्या आधारे कंपनीला नव्या उंचीवर नेणाऱ्या विविध उद्योगक्षेत्रांतील उद्यमशील व्यक्तींचा बहुमान करण्यासाठी हे पुरस्कार सुरू करण्यात आले आहेत.

उद्योग आणि व्यवसाय या विभागातील विजेत्यांना देशातील कोणत्याही प्रतिष्ठित संस्थेतील एक्झिक्युटिव्ह प्रोग्रॅममध्ये भाग घेण्यासाठी एक लाख रुपयांपर्यंतची फेलोशिप देण्यात येणार आहे.

स्वयंसेवी संस्था या विभागातील विजेत्यांना स्मृतिचिन्ह, प्रशस्तिपत्रक आणि

एक लाख रुपये देण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी राज्यभरातील निरनिराळ्या क्षेत्रांतील कंपन्या आणि संस्थांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यात उत्पादने, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम, तसेच स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, रक्तपेढ्या आदींचा समावेश होता. पुण्याव्यतिरिक्त नगर, नाशिक, बीड, सोलापूर, नागपूर आदी शहरांतूनही अर्ज आले.

पुरस्कार जाहीर झालेल्यांची नावे :

उद्योग आणि व्यवसाय विभागात मोठे उद्योग - झेन्सारच्या ग्लोबल टेक्नॉलॉजीचे कार्यकारी उपाध्यक्ष विश्वनाथन बालसुब्रह्मण्यम, रोहन बिल्डर्सचे संचालक विनय श्रीश्रीमाळ;

मध्यम उद्योग - नितीन कोठारी (डीएसएम इंजिनिअरिंगचे एमडी), डॉ. के. डी. इनामदार (सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीजच्या इफेक्ट पिगमेंट विभागाचे उपाध्यक्ष),

स्वयंसेवी संस्था - सुदाम भोंडवे (दीनदयाळ नवरचनाच्या शैक्षणिक प्रकल्पाचे संचालक), प्रा. हेमंत अभ्यंकर (संचालक, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट).

माजी सनदी अधिकारी बी. जी. देशमुख यांना त्यांच्या ३९ वर्षांच्या प्रशासकीय सेवेतील योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.

## * विवेक सावंत 'आयटी आयकॉन'

'सिलिकॉन व्हॅली' या आंतरराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संस्थेचा प्रतिष्ठेचा 'आयटी आयकॉन' पुरस्कार महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे (एमकेसीएल) कार्यकारी संचालक विवेक सावंत यांना नऊ डिसेंबर रोजी पुण्यात प्रदान करण्यात आला. यापूर्वी संस्थेतर्फे प्रसिद्ध संगणकतज्ज्ञ विजय भटकर यांना सन्मानित करण्यात आले होते. महाराष्ट्राच्या संगणक शिक्षणात 'एमकेसीएल'च्या माध्यमातून विवेक सावंत यांनी आमूलाग्र क्रांती घडवून आणली असून, एमएच-सीआयटीच्या माध्यमातून महाराष्ट्राला संगणक साक्षर करण्याचा विडा त्यांनी उचलला असे 'सिलिकॉन व्हॅली'चे संचालक प्रमोद गायकवाड यांनी म्हटले.

## * सुधाताई जोशी जी.ए. पुरस्कार

साहित्यप्रेमी भगिनीमंडळ, पुणे तर्फे दर वर्षी 'सुधाताई जोशी जी.ए.' हा पुरस्कार मंडळाच्या वार्षिक मेळाव्यात प्रदान करण्यात येतो.

'भोगले जे दु:ख त्याला' या आशा आपराद यांच्या आत्मचरित्रास यंदाचा 'सुधाताई जोशी जी.ए.' पुरस्कार २१ डिसेंबर रोजी देण्यात आला. अध्यक्ष म्हणून श्रीमती विजया वाड उपस्थित होत्या.

❒

# वाचकांचा प्रतिसाद



संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत

आपला दीपावली २००९ चा अंक मिळाला. धन्यवाद!

ढोबळ अर्थाने काहीशा उच्चभ्रू वर्गाकडून लिहून घेतलेले परदेशचे अनुभव ही कल्पनाच स्तुत्य आहे.

एकाच ठिकाणी बसून विविध देशांचा इतिहास, संस्कृती, सौजन्य, तटस्थपणा, उपरेपणा वाचायला मिळतो. भिडतो.

आपण भारतीय आणि जगभर पसरलेली सारी माणसं यांच्या वागण्यात, स्वच्छतेत, जन्मजात शिस्तीतून त्यांच्या देशाविषयी व्यक्त होणारं प्रेम ही तफावत बहुतेक लेखांतून दिसते. सगळ्याच लेखकांची तळमळ, खंत खरी आहे.

लीना दामलेंनी खुसखुशीत शैलीत दिलेला जपानी जीवनशैलीचा परिचय, मीरा सिरसमकरांचं 'गोजिरं' मॉरिशस, स्वाती चांदोरकरांचा बोलक्या शैलीतला युरोप दौरा, डॉ. अलका पुराणिकांना आलेला प्रवासातील तीव्र अनुभव, डॉ. शरच्चंद्र गोखलेंचा अप्रतिम लेख, डॉ. बाळ फोंडकेंचा 'अ फाईन सिटी' हे आणि सर्वच लेख उत्तम आहेत.

थोडक्यात २००९ चा दीपावली अंक कायमचा संग्रही ठेवण्यासाठीच आहे.

कळावे.

राजा कदम, बोरिवली
मुंबई ४०० ०६६.

संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत

'हे विश्वचि माझे घर' ह्या उक्तीची यथार्थता पटवणारा असाच मेहता मराठी ग्रंथजगतचा दीपावली २००९ अंक आहे, असं व्यक्त करावंसं वाटलं म्हणून हे पत्र.

अंकाच्या मुखपृष्ठावर लेखांतील विविध देशांतील प्रेक्षणीय स्थळांची सुरेख छायाचित्रं आहेत आणि प्रतीकात्मकरीत्या ती मेहता पब्लिशिंग हाऊसच्या गरुडभरारीची झलकच पेश करतात.

वेगवेगळ्या क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणारे डॉ. शरच्चंद्र गोखले, शंकर सारडा, डॉ. श्याम भुर्के आणि अन्य मान्यवर लेखकांचे 'अपिया'पासून ते

कॅलिफोर्नियापर्यंतच्या प्रत्यक्ष भेटीतील अनुभव निरीक्षणांवर आधारित, सुयोग्य छायाचित्रांसह, ओघवत्या रसाळ शैलीत लिहिलेले लेख ग्रंथजगतच्या दिवाळी अंकाचे प्रमुख आकर्षण ठरावे. तसेच विदेश सफरीतील गंमतीदार अनुभवांवर आधारित लेखस्पर्धेच्या निमित्ताने भरभरून प्रतिसाद मिळालेल्या लेखांतील बक्षीसपात्र लेखही मनोरंजक आहेत.

सुनील मेहतांनी सुबुद्ध, सुजाण, वाचक संस्कृती रुजवण्यासाठी जाणीवपूर्वक चालवलेले प्रयत्न, 'टी-बुक क्लब' आणि इतर योजनांतून जाणवतात. वेगाने विकसित पावणाऱ्या, नवनवीन उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी अविरत काम करणाऱ्या एका प्रथितयश प्रकाशन संस्थेची धुरा समर्थपणे पेलत असतानाच उत्कृष्ट, दर्जेदार दिवाळी अंकाचे प्रकाशन करून वाचकांना तो माफक किंमतीत दिल्याबद्दल अभिनंदन!

अंक वाचनीय आणि देखणा व्हावा यासाठी घेतलेली मेहनत पानोपानी जाणवते.

मराठी साहित्याच्या शिरपेचात मानाचे तुरे खोवणाऱ्या आणि व्यावसायिक मूल्यांशी तडजोड न करता आर्थिक फायद्याच्या पलिकडे जाऊन उच्च निर्मितीमूल्य सांभाळणाऱ्या दिवाळी अंकाची आणि इतर साहित्याची मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे उत्तरोत्तर अशीच भर पडत राहो ही शुभेच्छा!

शोभना शिकनीस
सी-१, मेफेअर, ढोले पाटील रोड, पुणे ४११ ००१.

माननीय संपादक

मेहता मराठी ग्रंथ जगतच्या दिवाळी अंकाने दिवाळीत विश्वपर्यटनाचा आनंद दिला. प्रवासवर्णनाच्या परंपरा ओलांडणारं हे एक नवं पाऊल आहे. प्रवासवर्णन केवळ वाचन नसून अनुभवत आहोत असा सुखद प्रत्यय देणारे. जगाच्या पाठीवरचे लहानमोठे देश, त्यांचे अंतरंग, संस्कृती, खाद्यसंस्कृती, आवडीनिवडी, स्वभाव, छोटेमोठे प्रसंग, फॅशन्स यांचे नाट्यचित्रसंवादमय विश्व डोळ्यांसमोर उभे करत आहेत असेच सगळ्या लेखांतून जाणवले.

अंकाची कल्पना अभिनव, मांडणी आकर्षक आहे, मुखपृष्ठावरचे विश्वदर्शन विलोभनीय आहे. विविधता, नावीन्याने नटलेल्या या संग्राह्य अंकाने वाचकांना विश्वाच्या कानाकोपऱ्यातल्या देशांचे अनोखे दर्शन घडवले आहे. लेखनात आहे एक स्वाभाविकता! विषयाची निवड, लेखांची निवड, छायाचित्रे, बालनगरी सर्वांना सलाम!

सौ. अनघा ठोंबरे, पुणे.

माननीय संपादक

नोव्हेंबर ०९ मेहता मराठी ग्रंथ जगतच्या अंकातील 'बालनगरीत' आलेली 'शेवटचा धडा, शेवटचा तास' ही गोष्ट वाचनात आली. ती गोष्ट केवळ एखाद्या

परिकथेतील गोष्टीप्रमाणे न घेता सद्य:परिस्थितीत आपल्या मातृभाषेची (मराठी भाषेची) अवस्था पाहता थोरामोठ्यांपासून लहानांपर्यंत सर्वांना महत्त्वपूर्ण संदेश देणारी आहे. आपल्या मातृभाषेवर जिवापाड प्रेम करणारे म्हणून फ्रेंच लोकांची ख्याती आहेच. तत्कालीन युद्ध परिस्थितीचे वर्णन व आपल्या मातृभाषेवर (फ्रेंच) जर्मन भाषेचा बलात्कार होत असल्याने व्यक्त केलेले दु:ख हे वाचल्यावर डोळ्यांच्या कडा पाणावतात. स्वातंत्र्य मिळून ६२ वर्षे झाली तरी मराठी भाषेवर होत असलेले आक्रमण थोपवू शकत नाही. याउलट नवीन नवीन इंग्रजी भाषेतील शब्द प्रयोग वापरून मातृभाषा अशुद्ध करण्याचा प्रयत्न केला जात असे वाटते.

महाराष्ट्र राज्याची राज्यभाषा मराठी आहे आणि तीच मराठी माणसांची मायबोली. घटनेप्रमाणे देशाला राष्ट्रभाषा नाही. भाषावार प्रांतरचना करून प्रत्येक प्रांताला (राज्याला) प्रांत भाषा अथवा राज्यभाषा वापरण्याची स्वायत्तता दिली आहे. इतके असून सुद्धा महाराष्ट्रातील मराठी भाषेची अवस्था शोचनीय आहे. ह्याला जितके शासन जबाबदार आहे तितकाच समाजही जबाबदार आहे. इंग्रजी भाषेला अनाठायी महत्त्व दिले जात असल्यामुळे शुद्ध मराठी लेखन, वाचन दुर्मिळ होत चालले आहे. खुद्द मराठी भाषेतील वृत्तपत्रे, दूरदर्शनवरील, दूरचित्रवाणीवरील मराठी मालिका ह्या सर्वांत इंग्रजी भाषेची भेसळ प्रामुख्याने आढळून येते. इतकेच काय निरनिराळे भारतीय संस्कृतीवर आधारलेले सण, महोत्सव ह्यासाठीसुद्धा मराठी भाषेत सुंदर शब्दप्रयोग असताना इंग्रजी शब्दप्रयोग वापरण्याची शैली अंगीकारत आहोत. हिंदी सिनेमाच्या जाहिराती इंग्रजी भाषेच्या रोमन लिपीत लिहिल्या जातात. ही अत्यंत खेदजनक गोष्ट आहे.

ज. स. भाटवडेकर
१७३६ सदाशिव पेठ, पुणे ३०.

प्रिय दिपा महानवर

आपले आत्मकथन 'विमुक्ती' आवडले. एकूण जीवनप्रवास आपण अत्यंत हलक्या-फुलक्या भाषेत चितारला आहे. 'रयत' मधील अनुभव, पुणे विद्यापीठातील राजकारण व प्राध्यापक संघटनेच्या माध्यमातून काम करतानाच्या अनोख्या आठवणी यांचे ओघवते वर्णन आपण पुस्तकात केले आहे. माझ्या नावाचा अधूनमधून केलेला शिडकावा सुखद वाटला.

तुम्हाला आणि पुस्तकाला सदिच्छा!

पद्मश्री डॉ. शां.ब. मुजुमदार
सिंबायोसिस, पुणे

मा. प्राचार्य दिपा महानवर

'विमुक्ती' वाचले. आवडले. सुरवातीच्या पाच-सात पानातच पुस्तकाने पकड घेतली. त्यातील 'आईनं साखर वाढल्याचा बहाणा आवडायचा, नकार मात्र नको वाटायचा' अशी वाक्ये छान वाटली.

जातीयतेचे चटके बसले त्याबद्दल आक्रोश न करता, आपली लेखणी संयत राहिली याचे समाधान वाटते.

पुस्तकाची भट्टी एकूणच चांगली जमली आहे. आपले लेखन परिचित होते, पण त्यात इतके लालित्य प्रथमच दिसले. त्याचा आनंद झाला. विवेचनात ओघ चांगला आहे. तो रेंगाळत नाही आणि धांदलही करीत नाही. आपली कार्यपद्धती तशीच होती हे लक्षात आहे. भाषा पूर्णत: नागर चालली असती, असे मला वाटते.

मेहतांनी निर्मिती छान केली आहे. एक चांगली कलाकृती त्यांनी वाचकांपुढे आणली त्याचे समाधान आहे.

मन:पूर्वक अभिनंदन!

वसंत आपटे
संपादक, 'आपले जग',किर्लोस्करवाडी

श्री. अशोक कोळी

सविनय सस्नेह

आपला 'आसूड' कथासंग्रह विकत घेऊन वाचला. 'कूड' या कथासंग्रहामुळे आपलं नाव ऐकून होतो. नव्वद नंतरच्या पिढीत ग्रामीण कथेत आपण आपला एक आगळा वेगळा ठसा निर्माण केला आहे. कापूस, केळी प्रश्नांची इतक्या अस्सलपणे फारशी कोणी मांडणी केली नाही. आपले हे धाडस महत्त्वाचे वाटते. शेती, शेतकरी आणि ग्रामीण वास्तवाची अचूक जाण नी वर्तमानाचे भान यामुळे सर्वच कथा वाचनीय झाल्या आहेत. दु:ख, दैन्य आणि शोषणाची विदारकता आपल्या कथेतून अविस्कृत झाली आहे. या अर्थाने भूमिका घेऊन लिहिणारे ग्रामिण साहित्यिक आणि खरे ग्रामीण साहित्य लिहिण्यास आपण पात्र ठरला आहात. खान्देशी बोली भाषा, प्रभावी व्यक्तिचित्रण, वास्तवाचा ठाव घेणारी शैली त्यामुळे 'आसूड' लक्षवेधी झाला आहे.

आपल्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा!

प्रा. शिवाजी हुसे
'शिवार', मु.पो.ता. कन्नड,जि. औरंगाबाद
फोन:-९४२३७२३४९१

# श्रद्धांजली

*** दिलीप पुरुषोत्तम चित्रे**

दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या निधनाने साठोत्तरी मराठी साहित्यक्षेत्रातील आधुनिक मानसिकतेचा एक अग्रगण्य प्रवक्ता आणि पुरस्कर्ता अंतर्धान पावला आहे.

एकोणसाठ सालापासून त्यांचा माझा परिचय. आम्ही समकालीन. समवयस्क.

त्या सुमारास सत्यकथेतील त्यांच्या 'आधुनिक कवितेचे सात छेद' या लेखमालेने पाश्चात्य कवितेच्या क्रांतदर्शी नवप्रवाहाचे दर्शन घडवले. आत्मिक एकाकीपण, अस्तित्वाचा निरर्थकपणा, जीवनव्यवहारातील विसंगती, व्यक्तिमत्त्वातील दुभंगलेपणा, जगापासून तुटलेपणाची सतत सतावणारी भावना, वगैरे संकल्पनांचे दिलीप चित्रे यांनी केलेले विश्लेषण पारंपरिक मराठी साहित्यातून प्रकट होणाऱ्या साचेबंद मध्यमवर्गीय अनुभवविश्वाला उथळ आणि कालबाह्य ठरवणार होते. ते वाचताना मराठी मर्ढेकर - मुक्तिबोध - गंगाधर गाडगीळ यांच्या नवसाहित्यावर होणारी तत्कालीन समीक्षकांची टीका कशी एकांगी आणि पूर्वग्रहदूषित आहे याचेही भान येत होते. त्यामुळे दिलीप चित्रे यांच्याबद्दलची आपुलकी आणि आत्मीयता एक समानधर्मी समकालीन म्हणून मनावर अधोरेखित होत होती. तशात मुंबईला एम.ए.साठी मी रुइया कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि प्रा. श्री. पु. भागवत, विंदा करंदीकर वगैरेंशी संपर्क आला. दिलीप चित्रे हेही रुइयाचेच विद्यार्थी. श्रीपु-विंदा यांना या चाकोरीबाहेरच्या हुशार तरुणाची प्रतिभा जाणवलेली... त्यांच्याकडून मिळणाऱ्या प्रोत्साहनाने ती काही अंशी बहरलेली... 'शब्द' सारख्या अनियतकालिकातून तिची अफलातून झलक लोकांपुढे आलेली.. त्यामुळे प्रत्यक्षात दिलीप चित्रे यांची ओळख झाल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातले वेगळेपण, त्यांच्या संवेदनशीलतेचे वेगळेपण, त्यांच्या स्वभावातले वेगळेपण हे अफलातून असल्याचे दिसून आले. त्यांच्याशी फार जवळीक साधणे जमणार नाही हेही जाणवले. कारण मी काहीसा नेमस्त प्रवृत्तीचा! चित्र्यांचा आवेश आणि आक्रमकपणा, अभिव्यक्तीतला भन्नाटपणा आपल्या अभिरुचीच्या सौजन्यशील कक्षांना भेदून जाणारा आहे हे लक्षात घेऊनच त्यांच्याशी मैत्री शक्य आहे हे मनोमन ठसले. त्यावेळी अधूनमधून आमच्या भेटी होत राहिल्या. कधी पाडगावकरांच्या घरी. कधी सदानंद रेगे यांच्याबरोबर. कधी अन्यत्र.

बीए झाल्यावर दिलीप चित्रे १९६० साली 'इथियोपिया' या देशात गेले. तेथील शाळेत शिक्षक म्हणून त्यांना असाइनमेंट मिळाली. त्या देशातील तीनचार वर्षांच्या वास्तव्यातील अनुभव त्यांनी 'शिबा राणीच्या देशात' या पुस्तकात दिले आहेत. ते परत आल्यावर 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये रविवार पुरवणीचा संपादक या नात्याने मी त्यांनी काही ना काही लिहावे असा आग्रह केला. १९६६ मध्ये 'चालू पिढीच्या कविता' म्हणून काव्यात नवे प्रयोग करणाऱ्या तरुण कवींच्या निवडक कविता दोन अंकात प्रसिद्ध केल्या. त्या कवितांवर भाष्य करणारा एक लेख डॉ. व. दि. कुलकर्णी यांना लिहायला सांगितला. दुसरा लेख नव्या पिढीचा प्रवक्ता म्हणून दिलीप चित्रे यांना लिहायला सांगितला... वेगळ्या वाटेने जाणाऱ्या तरुण कवींच्या मानसिकतेचे दर्शन घडवण्याचा हा उपक्रम वाचकांना आवडला. विशेष म्हणजे त्यावेळचे संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांनाही खूप महत्त्वाचा वाटला. तसे त्यांनी प्रत्यक्ष भेटीत मला सांगितले.

दिलीप चित्रे यांनी आयुष्यात आणि साहित्यक्षेत्रात आपली वेगळी वाट चोखाळली. रूढ चाकोरीतली सुरक्षित नोकरी करण्यात त्यांनी स्वत:ला कधी गुंतवले नाही. तसेच मराठीपुरते स्वत:ला सीमित ठेवले नाही. मराठी कवितांचे इंग्रजी अनुवाद करण्याची हातोटी जमल्याने 'ॲन अँथॉलॉजी ऑफ मराठी पोएट्री' हा प्रातिनिधिक संग्रह १९६७ साली त्यांनी प्रसिद्ध केला. 'ट्रॅव्हलिंग इन ए केज' हा त्यांच्या कवितांचा संग्रहही १९८० मध्ये निघाला. प्रयोगशील वृत्तीमुळे आपल्या अनुभूतिविश्वाच्या प्रकटीकरणासाठी ते वेगवेगळी माध्यमे शोधत राहिले. त्यांची संवेदनाधिष्ठित प्रतिमासृष्टी कविवर्य विंदा करंदीकरांसारख्या कवीलाही भूल पाडणारी ठरली. विंदा करंदीकरांनी दिलीप चित्रे यांच्या कवितांच्या संदर्भात मोठी मार्मिक प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ''संग्रह अद्भुत आहे. पण अद्भुत हा शब्द महाभूतांपैकी एक आहे. मला तो समजला नाही. म्हणजे एखाद्या चांगल्या समीक्षकाला समजतो त्या अर्थाने समजला नाही. पण भावला. मनस्वी भावला.'' विंदांनी 'अद्भुत नव्हे तर भूत आहे' आणि 'मला काही तो समजला नाही' या शब्दयोजनेद्वारे दिलीप चित्रे यांच्या काव्यातील अतिरिक्त आत्मनिष्ठेकडे, प्रतिमायोजनेकडे आणि दुर्बोधतेकडे लक्ष वेधले आहे.

दिलीप चित्रे यांनी आपल्या आयुष्यातील अनेक घटना, आपण पाहिलेली शहरे, प्रवासातले अनुभव, आयुष्यात आलेले स्त्री-पुरुष यांच्याबद्दल मोकळेपणाने लिहिले आहे. 'त्या स्त्रिया ज्यांचं अंग मी शोधलं, ज्यांचं मन मी धुंडलं रिकामा होऊन'. त्यांची जवळीक कधी फुली मारण्यासारख्या शब्दांतून तर कधी शारीर प्रतिमांतून प्रकट होते. ''कवी म्हणजे सुसंस्कृत श्वापद. शेपटीवर निसर्गाची सर्जरी. त्याची मज्जा इतरांपेक्षा भर्जरी'' अशा आत्मविश्वासाने आपल्या आदिम भावभावनांचा वेध घेण्याची प्रांजळ ओढ आणि धिटाई चित्रे यांच्या सर्वच कवितांमधून दिसते. त्यांच्या कथाकवितांच्या संदर्भातील प्रतिक्रिया सर्वच काही सकारात्मक नसत, परंतु त्यांच्या

निखळ वाङ्मयीन प्रयोगशीलतेबद्दल सर्वांनाच कुतूहल होते. त्यांनी कवितांबरोबर कथा लिहिल्या, लघुकादंबऱ्या लिहिल्या. एकांकिका लिहिल्या. प्रवासवर्णन लिहिले. स्तंभलेखन केले. 'गोदाम'सारख्या चित्रपट काढला. शेवटी शेवटी तर पेंटिंग्जही केली. तुकारामावर 'लास्ट कीर्तन ऑफ तुकाराम' हा चित्रपट निर्माण करण्याची योजनाही त्यांच्या मनात दीर्घकाळ होती. भोपाळच्या भारत भवन या सांस्कृतिक केंद्रात त्यांनी काही वर्षे वाङ्मयीन उपक्रम राबवले. विविध जाहिरात कंपन्यांसाठी कॉपी रायटिंगचे कामही केले. संत तुकाराम हे त्यांना मराठीतले सर्वश्रेष्ठ कवी व साहित्यकार वाटत. पाश्चात्य जगाला या 'आधुनिक' संतकवीचा समकालीन परिभाषेत परिचय करून देण्याचे महत्कार्य त्यांनी केले.

'एकूण कविता'च्या तीन भागात मिळून त्यांच्या हजारेक कवितांचे संकलन 'पॉप्युलर प्रकाशन'ने काढून त्यांच्या काव्यक्षेत्रातील योगदानाचे महत्त्व रसिकांच्या मनावर ठसवले आहे.

वाङ्मयक्षेत्रात अनेक गोष्टी अनेक पातळ्यांवर चालू असतात. त्यात यश आणि अपयश ठरवण्याचे निकषही वेगवेगळे असतात. समकालीनांकडून होणारे कौतुक वा मूल्यमापन कधीच निखळ किंवा पूर्ण नसते. उपेक्षेपासून अत्यंत भावभक्तिपूर्ण समर्पणशीलता यांच्या अनेक पातळ्या दिसून येतात. आपल्याला समजून घेणारे, आपल्या कार्याचे आणि निर्मितीचे मोल जपणारे सुहृद, समानधर्मी क्वचितच भेटतात. ते मोजकेच असतात. तरीही आपण घेतलेला वसा हा शेवटपर्यंत व्रतस्थपणे, निष्ठापूर्वक, स्वत:च्या अंत:प्रेरणेशी प्रामाणिक राहून जपायचा असतो... दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी तो अखेरपर्यंत जपला. त्यांचा साहित्यकलाक्षेत्रातला वावर हा त्यांच्या प्रतिभाधर्माशी अखेरपर्यंत प्रामाणिक होता.

एखाद्या समकालीन स्नेह्याचा निरोप घ्यावा लागणे हा आपल्या जीवनाचाही अंशत: अन्तच असतो. आपणही त्याच अनंताच्या वाटेवरचे प्रवासी आहोत, अशी आठवण तो करून देतो. आपले काय व्हायचे ते मूल्यमापन होवो, न होवो, आपण जाणार हे निश्चित असते. त्या दूरवरच्या घंटांचा आवाज साद घालत असतो. कुठलाही लेखक हा आपल्या नैतिक, सामाजिक, मानसिक आणि सांस्कृतिक मर्मस्थानांवर आघात करून आपले स्वयंभू अस्तित्वभान जागृत करीत असतो. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनीही साठोत्तरी काळात हे अस्तित्वभान देण्यासाठी अविरतपणे सृजनाचे प्रयोग जारी ठेवले होते. त्यांच्या या योगदानाचे महत्त्व कालदृष्ट्या अधिकाधिक अलिप्त होणाऱ्या पुढच्या पिढ्यांना उमगत जाईल.

**शंकर सारडा**

ई १० पाटील रिजन्सी, हॉटेल कलिंगामागे, १५ एरंडवणे, पुणे ४

फोन २५४२२२२३, ९८२३२६१०२३

*** लेखिका सुशीलाबाई गुप्ते**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या थोरल्या भगिनी सुशीलाबाई गुप्ते (वय ९१) यांचे ६ डिसेंबर रोजी वांद्रे पूर्व येथील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. त्यांच्या मागे त्यांचे पुत्र पंकज, सून आणि नातू असा परिवार आहे.

शिवसेनेचे कार्यकारी अध्यक्ष उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे, महापौर श्रद्धा जाधव, शिवसेना नेते सुभाष देसाई, आमदार प्रकाश (बाळा) सावंत यांनी गुप्ते यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.

सुशीला गुप्ते यांनी 'महाराष्ट्र टाइम्स', 'सामना', 'सकाळ' आदी वृत्तपत्रांतून विपुल लेखन केले. 'अर्ध्यावरती डाव मोडला', 'आई तुझी आठवण येते' या त्यांच्या दोन कादंबऱ्याही प्रसिद्ध झाल्या आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी मृणाल गोरे आणि अहिल्या रांगणेकर यांच्यासोबत सक्रिय सहभाग घेतला होता. शिवसेनेच्या स्थापनेनंतर शिवसेनेची महिला आघाडी वाढविण्यातही त्यांचा मोलाचा वाटा होता.

*** प्रा. भगवंतराव देशमुख**

भगवंतराव देशमुख यांच्या निधनाने मराठी भाषेसंबंधी मूलभूत धारणा असणारा आणि ही धारणा आयुष्यभर व्रतस्थपणे जपणारा  साधक काळाच्या पडद्याआड गेला आहे. भगवंतराव देशमुख हे केवळ मराठीचे जाणकार नव्हते. संस्कृतवरही त्यांचे प्रभुत्व होते आणि निझामी राजवटीत शिक्षण झाल्याने उर्दू त्यांना चांगली अवगत होती. इंग्रजीचा त्यांचा व्यासंगही थक्क करणारा होता. एकूणच मराठी, उर्दू, इंग्रजी आणि संस्कृतचे मर्मज्ञ जाणकार म्हणूनच भगवंतराव आयुष्यभर वावरले. भाषा म्हणजे केवळ काही शब्दांचा समुच्चय अशी त्यांची धारणा कधीच नव्हती. भाषा गांभीर्याने घेण्याची गरज असते आणि या गांभीर्याला व्याकरण-व्युत्पत्ती-उच्चार आणि दोष अशा विविध शास्त्रांचा आधार असतो, असेच त्यांचे ठाम मत होते. या मताच्या प्रतिपादनासाठी व्याकरण आणि व्युत्पत्तीशास्त्राचा सखोल, शास्त्रोक्त अभ्यास त्यांनी केला. या शास्त्रातला प्रमाण शब्द म्हणून भगवंतरावांना सर्वमान्यता मिळाली. मराठी भाषेचे पुरस्कर्तेपण म्हणजे अन्य भाषांचा दुस्वास किंवा तिरस्कार असेही भगवंतरावांना कधीही वाटले नाही. भाषा संवादासाठी आहे, विसंवाद निर्माण करण्यासाठी नाही, असे त्यांचे प्रतिपादन असे. भाषेच्या मूलभूततेच्या संशोधनात आयुष्याची अनेक वर्षे खर्ची पडल्यानेच 'लोकप्रिय' किंवा 'मनोरंजनात्मक' लेखन करणारा लेखक, अशी भगवंतराव देशमुख यांची प्रतिमा नव्हती. 'आलोक' हा एकमेव ललित लघुनिबंधाचा संग्रह वगळता भगवंतराव देशमुख यांची अन्य ग्रंथनिर्मिती मराठी भाषेच्या मूलभूततेचा शोध घेणारी किंवा प्रकाशित साहित्याची व्यासंगी समीक्षा करणारी आहे. प्रसिद्धीपासून दूर राहणारा विद्वान अशी प्रतिमा

असली तरी व्यासपीठीय भगवंतराव सुबोध आणि रसाळ असत. त्यांचे वक्तृत्व मोहिनी टाकणारे असे. 'चांगले आणि शुद्ध बोलावे तसेच लिहावे' असा त्यांचा आग्रह असे आणि त्यासाठी ते मनापासून प्रयत्न करत असत. भाषेसंबंधी आस्था असणाऱ्या मराठी पत्रकारांसाठी नियतकालिकातील शुद्धलेखन कसे असावे याचे वर्गच भगवंतराव घेत असत. यातूनच 'मराठी वृत्तपत्रीय विटंबना' हा लेख त्यांनी लिहिला. शिक्षक आणि माणूस म्हणून भगवंतरावांमध्ये प्राचीन आणि आधुनिकतेचा सुरेख मेळ होता. त्यामुळे 'जुने ते सोने' अशा झापडबंद फूटपट्ट्या त्यांच्याकडे नव्हत्या. ज्ञानेश्वरी ते जितक्या रसाळपणे शिकवत असत तितक्याच तन्मयतेने ते मर्ढेकर शिकवत. त्यामुळे हैदराबाद, गुलबर्गा, औरंगाबाद, कोल्हापूर अशा विविध ठिकाणी त्यांना मराठी विद्यार्थीवर्गात मान्यता लाभली. मराठवाड्यातील साहित्य चळवळीचे ते एक प्रमुख संवर्धक होते.


*** प्रसिद्ध बालसाहित्यकार आशा भाजेकर यांचे निधन**

प्रसिद्ध बालसाहित्यकार आशा भाजेकर (वय ८३) यांचे ३० नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगा, सून आणि नातू असा परिवार आहे. भाजेकर यांच्या पार्थिवावर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

आशाताईंचा जन्म २१ नोव्हेंबर १९२६ रोजी सोलापूर येथे झाला. बी.ए. पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी लेखनास सुरवात केली. मुलांसाठी हाती लेखणी घेऊन कथा, कादंबरी, चरित्र, नाटक असे विविध साहित्यप्रकार हाताळत बालवाङ्मयाच्या क्षेत्रात भाजेकर यांनी आपले स्थान निर्माण केले. 'उमलायला हवी होती कळी', 'चाफा', 'गंधवेडी', 'सांगाती', 'दरवळ', 'चंद्र सूर्याला चोरतो' हे कथासंग्रह, 'मदर तेरेसाची गोष्ट' हे चरित्र आणि 'अजब गजब मंडळ' ही कादंबरी प्रसिद्ध आहे.

सोलापूर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलनात त्यांना 'दिनकर लोखंडे बालसाहित्य जत्रा गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला होता. प्रसिद्ध साहित्यिक व. पु. काळे यांच्यासमवेत त्यांनी कथाकथनाचे अनेक कार्यक्रम केले होते.

❐



# बालनगरी

## अनुक्रमणिका

शेतकरी आणि वीज १०९

# सम्यक बाफनाचा प्रकल्प

अहमदनगर जिल्ह्यातील राहुरीत राहणाऱ्या सम्यक संजय बाफना या विद्यार्थ्यानं आगळावेगळा प्रकल्प केला आहे. तो सध्या आठवीत आहे. तो म्हणतो, की मी अकरा हजारांपेक्षा जास्त रुपयांची रक्कम जमविली आहे. ती पुस्तकांच्या खरेदीसाठीच उपयोगात आणणार आहे. ''माझ्या दहाव्या वाढदिवसाला माझ्या वडिलांनी एक कानमंत्र दिला. ते म्हणाले की तू चहा-कॉफी पीत नाहीस. दिवसभरात तुझे सरासरी दहा रुपये यात खर्च झाले असते. तेवढे पैसे वाचतात. ते तू जमवायला लाग.'' मी दररोज दहा रुपये बाजूला ठेवू लागलो. सहा ऑक्टोबर रोजी ही रक्कम अकरा हजारांपेक्षाही जास्त झाली. या रकमेची मला पुस्तके खरेदी करायची आहेत. मला सध्या व भावी काळातही उपयोगी पडतील, अशी पुस्तकं घ्यायची आहेत.''

सध्या त्याच्याकडे तीनशे पुस्तकं आहेत. त्यात 'चंपक', 'चांदोबा', व 'युगंधर'सारखी बालमासिकंही आहेत. 'चिंटू', 'पंचतंत्र', 'बिरबलाच्या गोष्टी', 'विज्ञानातील गमतीजमती', व 'चिल्ड्रन्स नॉलेज बँक' यासारखी पुस्तकं आहेत. 'अत्र्यांचे निवडक विनोद', 'आणखी एक चिमणराव', 'अस्वल', 'ज्वाला आणि फुले', 'झाडाझडती', 'बलुतं', 'महानायक', 'आमचा बाप अन् आम्ही', 'युगान्त', 'योगी अरविंद' व 'नापास मुलांची गोष्ट' यांसारखी अनेक पुस्तकं त्याने जमविली आहेत. सम्यकचं अभिनंदन.

# तुम्ही अन तुमची मुलं!

एका शालेय दोस्तामुळे मला हे पुस्तक वाचावयास मिळाले, आणि एक सुंदर पुस्तक वाचायला मिळाल्याचा आनंद झाला.

नॉर्थकोट पार्किन्सन आणि एम. के. रुस्तुमजी यांनी मुलांवर संस्कार करण्यासाठी हे पुस्तक लिहिले. विविध भाषांत अनेक आवृत्त्या निघत असलेले व गाजलेले हे पुस्तक श्री. अविनाश भोमे यांनी भाषांतरित केले आहे.

पालक - शिक्षकांनी बालक-पाल्य यांच्याशी कसे वागावे किंवा वागू नये याविषयी या पुस्तकात उपयुक्त माहिती आहे. मुलांवर योग्य ते संस्कार अगदी सहजपणे झाले पाहिजेत ही कळकळ यात दिसून येते.

प्रत्येक पानावर सुंदर सुंदर चित्रे दिलेली आहेत आणि त्याद्वारे 'बालकांशी कसे वागावं' या विषयी हितगुज केलेले आहे. चित्रांमुळे अवघड विषय सोप्या भाषेत उत्तम समजतो. लहान मुलांना घडवणं, त्यांना मोठं बनविणं व मुलांना समजून घेणं याविषयी खूपच छान मार्गदर्शन आहे.

१. पालक मुलांशी चुकीचे वागलेतर मुलांच्या मनावर परिणाम होतो. मुले एकलकोंडी व चिडचिडी होतात. मुलांशी चांगले, सकारात्मक वागल्याने त्यांचा विकास होतो.

२. मुलांना उपदेश करण्याअगोदर त्यांना समजावून घ्यावे आणि मगच त्यांना वागण्याबाबत योग्य सूचना द्याव्या असा संदेश या पुस्तकातून मिळतो.

३. आपल्या मुलांनी टी.व्ही. (इडियट बॉक्स) समोर खूप वेळ

बसू नये असे वाटत असेल तर त्यासाठी काय करावे हेही सुचवले आहे.

४. बालकिशोर अवस्थेतून युवक अवस्थेत जाताना होणारे विविध बदल, पडणारे प्रश्न कसे हाताळावे याचे उत्तम विवेचन यात आहे.

५. पालक व मुले यांच्यातील वादविवादांचे विषय कसे हाताळावेत, याविषयी सुंदर माहिती आहे.

६. पालकांनी रागावर संयम ठेवावा नाहीतर मुलांवर वाईट परिणाम होतो, इतरांच्या देखत आणि एकटी असतील तेव्हाही मुलांचा अपमान करू नये, त्यांना टोमणे मारू नयेत.

७. शारीरिक शिक्षेमुळे मुलांच्या अंतर्मनावर वाईट परिणाम होतो. मुलांच्या चुका झाल्यास आदळआपट न करता शांततेने समजवावे.

८. प्रत्येकालाच आपले कौतुक व्हावे असे वाटत असते, चांगल्या गोष्टी केल्याबद्दल शाबासकी दिल्यामुळे मुलांचा विकास होतो.

अशा अनेक गोष्टी यात आलेल्या आहेत.

'मुलांचे मूलपण जपा व मुलांना मनासारखं जगू द्या' हा मूलमंत्र या पुस्तकांतून मिळतो.


पालकांनी तसे वागण्याचा प्रयत्न केला तर कोमजलेल्या मुलांचे टवटवीत फुलांत रूपातंर होण्यास वेळ लागणार नाही.

अशा सुंदर पुस्तकाचे प्रकाशन केल्याबद्दल प्रकाशकांचे आम्ही ऋणी आहोत.

प्रकाशक - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
किंमत : ८०रु. पोस्टेज : २५रु.

सम्यक संजय बाफना (इयत्ता आठवी)
सावित्रीबाई फुले माध्य. विद्यालय, कृषी विद्यापीठ, राहुरी.

# चित्र रंगवा



## सुविचार


नवीन काहीतरी शिकण्यासाठी मिळालेला वेळ म्हणजे सुट्टी

# शेतकरी आणि वीज

एक लहानसं गाव होतं. त्या गावात साहेबराव आणि सगुणाबाई नावाचे नवराबायको राहत होते. दोघंही मेहनती शेतकरी होते. दिवसरात्र खपून दोघांनी शेत चांगलं मोठं करून वाढवलं, जोपासलं होतं. चांगला पैसा जमवून मोठा मळा खरेदी करून त्यात एक लहानसं घर बांधलं होतं. त्यांना चार मुलं होती. त्यांची लग्नं करून त्यांनी चार सुनाही घरी आणल्या होत्या. सगळेच वावरात खपायचे.

पण सुनांचं काही पटेना. त्यामुळे मुलांचंही आपापसात वाजायला लागलं. चौघंजण वाटण्या करा, म्हणून वडिलांच्या मागे कटकट करायला लागले. पण साहेबरावानं दाद लागू दिली नव्हती. पण आता दोघं नवराबायको थकत चालले होते. हातून काम होईनासं झालं होतं. मुलं विचारायला तयार नव्हती. त्यांना फक्त आपला वाटा हवा होता. म्हाताऱ्या आई-वडिलांचा सांभाळ करायला कुणीच तयार नव्हतं. दोघंजण त्यामुळे दु:खी असायचे.

एके दिवशी जोरदार पाऊस आला. पाऊस कसला? वादळच होतं ते! ढग जोरजोरात गडगडत होते. सुसाट वारं सुटलं होतं. विजा कडाडत होत्या. पाऊस तर वेडावाकडा पडत होता.



सगळेजण काम थांबवून शेतातल्या लहानशा घरात भयचकित होऊन बसलेले होते.

तेवढ्यात वीज जोरात कडाडली. विजेचा एक मोठ्ठा लोळ घरापर्यंत आला आणि परत गेला. काही क्षणांनी पुन्हा तसंच झालं. चार-पाच वेळा असंच झाल्यावर सगळीजण भीतीनं गारठली.

थोरला मुलगा म्हणाला, ''आपल्यापैकी कुणाचा तरी काळ आलाय जणू. आणि बाकीच्यांचा जीव वाचवण्यासाठी परत जातोय.''



''मग कसं करावं?'' दुसरा भाऊ म्हणाला.

मधला म्हणाला, ''मला विचाराल, तर एकापायी बाकीच्यांनी का प्राण गमवावा? त्यापेक्षा एकेकानं त्या समोरच्या आंब्याच्या झाडापर्यंत जाऊन यावं. ज्याची वेळ भरली असेल, तो मरेल. पर बाकीची तरी वाचतील. काय म्हणता, बोला.''

''होय, होय, खरं आहे,'' बाकीच्या सगळ्यांनी मान्यता दिली.


मग चार मुलं आणि चारही सुना एकेकटी आंब्यापर्यंत जाऊन परत आली. पण त्यांच्यापैकी कुणीच मेलं नाही. त्या सगळ्यांना खूप आनंद झाला.

मोठा भाऊ वडिलांना म्हणाला, ''आबा, आता तम्ही जा. पिकलं पान तम्हीच आहात. तुमचीच वेळ भरली असेल. जा.



तुमच्यामुळे बाकीच्यांचे वांधे नकोत.''

त्याचं ते बोलणं ऐकून साहेबरावाला वाईट वाटलं. तो उठून लटपटत बाहेर जायला लागला. त्याबरोबर सगुणाबाईपण उठून त्याच्या बरोबर बाहेर जायला निघाली. म्हणाली, ''तुमच्या माघारी जिवंत राहून मी काय करू? इतकी वर्षं एकत्र राहिलो. आता मरण पण एकत्रच येऊ दे.''



दोघांना आंब्याच्या झाडाकडे जाताना बघून मुलं आणि सुनांना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. आता दोघांची पीडा गेली की प्रत्येकाला आपला मार्ग मोकळा होणार होता.

साहेबराव आणि सगुणाबाई आंब्याच्या झाडाजवळ पोहोचले. वीज पुन्हा कडाडली. आणि विजेचा एक मोठ्ठा लोळ घरावरती जाऊन पडला. घरात थांबलेल्या आठांपैकी एकहीजण वाचलं नाही. आणि इकडे साहेबराव आणि सगुणाबाई आऽ वासून बघतच राहिले.

❒

## संस्मिता गुप्ते

प्राणी, पक्षी, खेळणी आणि जादू हे विषय सगळ्याच मुलांना आवडतात. या पुस्तकात या सगळ्याच विषयांवरच्या मजेदार गोष्टी आहेत.

या गोष्टींत प्राणी, पक्षी आणि खेळण्यांची मजा तर आहेच, पण त्यातून चांगलं कसं वागावं हेही कळतं. आपल्या आजूबाजूच्या गोष्टींची काळजी घ्यावी, दुसऱ्यांना मदत करावी, कोणालाही त्रास देऊ नये अशा अनेक गोष्टी या 'मजेदार गोष्टी'तून शिकायला मिळतात. या गोष्टींत प्राणी, पक्षी आणि खेळणीसुद्धा बोलतात, त्यामुळे या सगळ्या गोष्टी खऱ्या अर्थाने 'मजेदार' झाल्या आहेत.

**किंमत प्रत्येकी ५०रु. | एकत्रित पोस्टेज ४० रु.**










## अरुंधती महाम्बरे

छोट्टे-मोट्ठे, प्राणी-पक्षी रुसवा-फुगवा, भांडण-मैत्री सारं काही
तुमच्यासारखं तिथेच जाऊन पहायला हवं चटकन् चला,
पाहूया गंमत दोस्तांना दाखवू जंगल जंमत...






**किंमत प्रत्येकी ५०रु.**
**एकत्रित पोस्टेज २५रु.**

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

The Secret Seven

# द सीक्रेट सेव्हन

धडाकेबाज छोट्या सात गुप्तहेरांची
१५ पुस्तकांची साहसपूर्ण मालिका...

- द सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम
- शाब्बास, सीक्रेट सेव्हन
- रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन
- आगे बढो, सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी
- सीक्रेट सेव्हनची सरशी
- सीक्रेट सेव्हन झिंदाबाद



- सीक्रेट सेव्हन आणि रहस्य
- सीक्रेट सेव्हन समोर कोडं
- सीक्रेट सेव्हनची आतषबाजी
- 'गुणवान' सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनला धक्का
- सावधान! सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत

**एनिड ब्लायटन | अनु. प्रियंका कुलकर्णी**

**किंमत प्रत्येकी ८०रु. | संपूर्ण सेटची किंमत ९९९रु.**
**एकत्रित पोस्टेज ४० रु.**

# ओळखा पाहू



१९५० ते १९८० या काळातील
गाजलेला पार्श्वगायक

विजेत्यास रु. १०१ चे रोख
पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक ५ फेब्रुवारी २०१० पर्यंत आम्हाला मिळायला हवीत. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल. निकाल मार्च २०१०च्या अंकात जाहीर होईल.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
मेहता पब्लिशिंग हाऊस, माडीवाले कॉलनी, १९४१ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

डिसेंबर अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

टिंग्या या चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार विजेता
बालकलाकार - शरद गोयेकर

स्पर्धेचे विजेते - **श्यामराव मोटघरे, पुणे**

नीरज जोशी, रामचंद्र आवटे, अमृत ढुमणे,
सुरेश मांजरीकर - पुणे, सुशिला पाटील, वैशाली कुऱ्हेकर,
गिरीजा कंठे - अमरावती, श्रीकृष्ण ऐवळे - गोवा,

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,
**साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी**
टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल २००९ पासून वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत

एक वर्षाला २०% तीन वर्षांना २५% पाच वर्षांना ३०%

## वर्गणीचे नूतनीकरण करा.

| एक वर्षाची | तीन वर्षांची | पाच वर्षांची |
|---|---|---|
| वर्गणी १५०रु. | वर्गणी ३५०रु. | वर्गणी ५००रु. |

## तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट




३ वर्षांची वर्गणी पाठविल्यास 'सभेत कसे बोलावे' श्याम भुर्के हे ६०रु.चे पुस्तक भेट! पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठविल्यास 'धुमारे' माधवी देसाई हे ७०रु.चे पुस्तक भेट! पोस्टेज २०रु.




**भेट पुस्तके - प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ L.NO.LWP-50/Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 January 2010

# आगामी

## उधाण वारा

**तसलिमा नासरिन ■ अनु. विलास गीते**




तसलिमा नासरिन यांच्या १९९९ साली प्रकाशित झालेल्या 'आमार मेयेबेला' (माझं कुवारपण) या आत्मकथनाने बंगाली साहित्यविश्वात खळबळ माजवली. एक अविस्मरणीय आत्मकथन म्हणून आता ते पुस्तक मान्यता पावले आहे.

'उतोल हवा' (उधाण वारा) हा त्याच आत्मकथनाचा दुसरा भाग आहे. या भागात तसलिमांच्या सोळा ते सव्वीस वर्षापर्यंतच्या काळाची कहाणी आहे. पण आता तसलिमा अनुभवाने प्रगल्भ झाल्या आहेत. त्यांची भोवतालाकडे पाहण्याची दृष्टी आणखी तीक्ष्ण झाली आहे. अनुभवांचा परीघ विस्तृत झाला आहे. एका मागासलेल्या समाजात आणि कुटुंबात मोठ्या झालेल्या युवतीने कशा प्रकारे पुराणमतवादाची बंधने तोडून टाकली हे या पुस्तकात दिसते. त्यांचे प्रेमप्रकरण, त्यामधील आनंद-वेदना, संबंधामधले चढउतार आणि शेवटी त्यातून बाहेर पडणे— हे सारे अंतर्मुख करणारे आहे. तसलिमांचे गद्य काव्याच्या तेजाने झळाळणारे आहे.

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोनभवन समोर, पुणे - ३०. फोन - (०२०) २४४७६९२४.

प्रति, ____________________

____________________

____________________

____________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६,अ गणेश पेठ, पुणे २.